ज्ञानदीप लावू जगी

# पुणे नगर वाचन मंदिर

स्थापना : ७ फेब्रुवारी १८४८

email : pnvm1848@gmail.com
www.punenagarvachan.org

पुस्तकाचे नाव : मोहोर (विविध विषय संग्रह)

लेखक : विश्वनाथ विनायक भागवत

प्रकाशक : विश्वनाथ विनायक भागवत, चाळीसगाव

प्रकाशन वर्ष : १९३७

मूळ ग्रंथ प्रत : शिक्षण प्रसारक मंडळी, पुणे

पुणे नगर वाचन मंदिर

अंकेक्षण (डिजीटायझेशन) प्रकल्प
अंकेक्षण रूपांतर - २०२१

कै. म. म. द. वा. पोतदार
ग्रंथ संग्रह

864
Bha
6063

D.V.POTDAR LIBRARY
S P COLLEGE
D00970

# मो हो र.

( विविध विषय संग्रह )

लेखक

विश्वनाथ विनायक भागवत:

बी. ए. एलएल्. बी.

किंमत १२ आणे.

परदेश १ शिलिंग.

प्रकाशक
वि. वि. भागवत.
बी. ए. एल्एल्. बी.
चाळीसगांव, ( पूर्वखानदेश. )

मा। ६६३४

सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन.
आवृति पहिली.

मुद्रक
ना. ह. आपटे.
श्रीनिवास छापखाना, कोरेगांव.

मातृचरणीं

सप्रेम समर्पण.

# निवेदन

माझ्या लेखांचा पहिला संग्रह वाचकांच्या हातीं देतांना मला फार आनंद व समाधान वाटत आहे. या संग्रहांत माझे वडील ती. वि. प. भागवत व भगिनी कमल यांच्याही लेखांचा समावेश केलेला आहे. आमच्या कौटुंबिक वाङ्मयोद्यानांत बहरलेल्या या ' मोहोरा ' चा सुगंध दशदिशा पसरून सर्वांचे चित्त प्रसन्न करील अशी मी आशा बाळगतो.

ती. तात्यांनीं बालपणापासून दिलेल्या प्रेमळ प्रोत्साहनामुळें मला लेखनाची आवड निर्माण झाली. अर्थात् या वाङ्मयसेवेचें सर्व श्रेय त्यांनांच आहे. तसेच माझे प्रेमळ चुलते ती. शिवराम काशिनाथ ऊर्फ आण्णासाहेब भागवत, बडोदें व ती. विष्णुपंत काशिनाथ ऊर्फ बाळुकाका भागवत, अमळेनर यांच्याकडूनही माझ्या लेखनाचें कौतुक झालेले असून माझ्या वाङ्मय प्रेमाच्या अंकुरास जीवन मिळालेलें आहे. हा लेखसंग्रह प्रसिध्द करतांना त्यांच्या थोर, उदार व प्रेमळ हृदयाची मला आठवण होते. ते आज विद्यमान नाहींत ही दुर्दैवाची गोष्ट होय.

श्री शारदादेवीच्या भव्य दरबारांत या ' मोहोरा 'चें उपायन घेऊन प्रथमच प्रवेश करतांना माझे चित्त बावरून गेलें होतें, म्हणून कोणातरी श्रेष्ठ व अनुभवी साहित्यिकाच्या बरोबर या मंदिरांत प्रवेश करावा असें मी ठरविलें. लो. ना. बापूजी अणे यांनीं असेंब्लीच्या अधिवेशनाच्या कामाची ऐन गर्दी असतांनाही माझी विनंति मान्य करून या पुस्तकाला विस्तृत

विवेचक व मार्मिक प्रस्तावना लिहून दिली याबद्दल मी त्यांचा सदैव ऋणी आहे.

या पुस्तकाच्या प्रकाशनाच्या कामीं माझ्या अनेक सुहृदांचे मला सहाय्य झालें आहे. त्या सर्वांचा नामोच्चारपूर्वक उल्लेख करणें अशक्य आहे. कांहींनीं आपल्या साहाय्याचा उल्लेख न करण्याची आग्रहपूर्वक सूचना केली आहे. त्यांचा मी अक्षरशः ऋणी आहे.

या पुस्तकाचें बाबतींत माझे मित्र श्री. नारायण हरी आपटे यांनीं ज्या बहुमोल सूचना वेळोवेळीं केल्या व श्रीनिवास छापखान्याचे मेहेनती व कुशल व्यवस्थापक श्री. वा. रा. पेंडसे यांनीं या पुस्तकाचें मुद्रण सुबक करून दिलें याबद्दल मी त्या उभयतांचा आभारी आहे.

तसेंच चाळीसगांव येथील सुप्रसिध्द वकील श्री. हरि विनायक पाटसकर एम्. एल्. ए. व धुळ्याचे सुप्रसिध्द समर्थभक्त श्री. शंकर श्रीकृष्ण देव यांनीं माझे कार्य सुकर होण्यासाठीं मला जें सहाय्य केलें त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो.

शेवटीं ज्याच्या कृपाप्रसादानें हें कार्य कालावधी न लागता तडीस गेलें त्या विघ्नहर्त्या 'विनायका'चें सादर स्मरण करून हें निवेदन संपवितो.

**बलिप्रतिपदा शके १८५९**
ता. ३-११-१९३७
**चाळीसगांव.**

**वि. वि. भागवत.**

दाखल अंक 6063
बोधांक 8641 Bha
किंमत ........ तारीख 4/5/93

# प्रस्तावना

प्रस्तुत ग्रंथांत एकाच कुटुंबांतील तीन लेखकाच्या लेखांचा संग्रह करण्यांत आला आहे. पिता पुत्र व कन्या यांच्या लेखांचा मनोवेधक त्रिवेणी संगम या पुस्तकांत असल्यामुळें या कौटुंबिक लेखसंग्रहाला प्रस्तावना लिहिण्यांत मला विशेष आनंद वाटतो.

श्री. वि. वि. भागवत यांच्याच लेखांचा विशेष भरणा या पुस्तकांत आहे. ते तरुण वकील असून हौशी व होतकरू लेखक आहेत. या ग्रंथांत त्यांनीं आजपर्यंत लिहिलेल्या कांहीं प्रकाशित व अप्रकाशित गद्यपद्यात्मक लेखांचा समावेश केलेला आहे. या संग्रहास त्यांनीं "मोहोर" हें मनोहर व मोहक नांव दिलें आहे. सुगंध, सौंदर्य व सुकुमारपणा या तीन गुणांचें नितांतरम्य एकीकरण म्हणजेच मोहोर. मोहोर दृष्टीस पडतांच विपत्तिकाल संपून सौख्यकाल समीप आला असें वाटावयास लागून पाहाणाऱ्याच्या अंतःकरणांत भावि सौख्याचे आशांकूर उत्पन्न होतात. कोकिल हा ज्याप्रमाणें वसंताचा सुरेल बंदीजन आहे त्याचप्रमाणें मोहोर हा वसंताचा ध्वज आहे. शिशिराच्या तीव्र शैत्याचा कठोर जुलुम संपून वसंताच्या शुभागमनाचें मंगल वर्तमान संत्रस्त दृष्टीस कळविण्यासाठीं आम्रवृक्ष हा मोहोररुपी ध्वज आपल्या हातांनीं उंच उचलून धरीत असतो. मोहोर ज्याप्रमाणें सृष्टिस वसंतागमनाचे वृत्त सुचवून सुखवितो त्याचप्रमाणें आम्रवृक्षाला लवकरच अमृततुल्य स्वादिष्ट–मिष्ट फळें येणार आहेत याचीही सूचना देत असतो. मोहोर मागील दुःखांचा विसर पाडतो. वातावरणांत सौंदर्य व सुगंध भरून निर्जन वनाचें नंदनवन बनवितो आणि भावि सौख्याच्या मोहक अभिवचनानें सृष्टीस प्रसन्न स्थितींत ठेवतो. आम्रवृक्षावरील हिरव्या पल्लवांच्या आंत बसून सृष्टीचा कारागीर मोहोराच्या सुंदर तुऱ्यांचा किरीट तयार करावयास लागला आहे असें दृष्टीस पडतांच शिशीर ऋतु त्रासून निघून जातो. तो किरीट आपल्या शिरावर धारण करण्यासाठीं वसंत हा मंदवायू व सुंदर फुलें यांच्यासह मोठ्या आनंदानें व हसतमुखानें प्राप्त होतो आणि ग्रीष्म सुरस

फलाचें वायन वनदेवीचे ओटींत घालून सर्व सृष्टीवर आम्ररसरूप अमृतवृष्टी करण्याचे उद्योगास लागतो. ज्या वृक्षास मोहोर येतो त्यालाच सुरस फळें येतात. त्याचप्रमाणें ज्या बुद्धीरूप वृक्षास पूर्ववयांत प्रतिभेचा 'मोहोर' येतो, तोच यथाकाल शारदोद्यानांत सद्ग्रंथरूपी फळास धारण करता व रसिकांस आपल्या सरस कृतींनीं संतुष्ट करतो.

आपल्या ग्रंथास 'मोहोर' हें नांव देऊन लेखकानें रसिक वाचकाचें अंतःकरणांत भावि सद्ग्रंथ निष्पत्तीची आशा उत्पन्न केली आहे यांत संशय नाहीं.

या लहानशा प्रस्तावनेंत वाचकांचे अंतःकरणांत सहज उत्पन्न होणाऱ्या आशेच्या पूर्ततेची शक्यता या ग्रंथांतील लेखांच्या स्वरूपावरून कितपत सिध्द होते व वाङ्मयाच्या कोणत्या प्रदेशांत प्रस्तुत लेखकास यश मिळण्याची चिन्हें दृष्टीस पडतात त्याचें सामान्य दिग्दर्शन करण्याचा माझा विचार आहे.

'मोहोर' हा विविध विषयांचा संग्रह आहे. त्यांत 'नूतनबालकास' 'फैझपूर कॉंग्रेस' 'गरूडा घेइं भरारी!' व 'सुभाषबाबूंचें स्वागत' हीं प्रकरणें पद्यात्मक आहेत. व बाकीचे सर्व लेख गद्यात्मक आहेत. या गद्यलेखांचे वर्गीकरण निबंध, चरित्रविषयक, लघुकथा व स्फूर्तविचार या चार प्रकारांत करतां येईल. या सर्व प्रकारच्या लिहिण्यांत लेखकाच्या मनावर राष्ट्रीय वृत्तीची दृढ छाप असलेली दिसून येते. प्रस्तुत संग्रहांत प्रसिध्द झालेल्या चार कवितांचे विषयावरुन सुध्दां ही गोष्ट वाचकांचे सहज लक्षांत येण्यासारखी आहे. देशाकरतां ज्या तरूणांनी आपल्या संसाराची राखरांगोळी केली त्यांच्या विषयींच्या आदरानें लेखकाचे अंतःकरण पूर्णपणें भरलें आहे.

'नूतन बालकास' झोप येण्यासाठीं प्रेमळ माता अंगाई गात असतां

**'देशोद्धार करावयासि झटले सर्वस्वही अर्पुनी,**
**त्या थोरांसम मान्य होइ जगतीं इच्छा असे मन्मनीं.'**

अशी इच्छा गीतात प्रकट करून त्याला थोपटीत आहे असें कवियित्रीनें वर्णन केलें आहे तें तिच्या अंतःचक्षूसमोर असलेल्या ध्येयाचेंच प्रतिचित्र आहे असें वाटतें.

'फैजपूर काँग्रेस' 'सुभाषबाबूंचे स्वागत' व 'गरुडा, घेइं भरारी!' या तिन्ही कवितांतून एकच राष्ट्रीय भावना प्रामुख्यानें प्रकट झाली आहे. स्वातंत्र्यप्राप्त्यर्थ्य दिव्य त्याग करणाऱ्या थोर विभूतींच्या वर्णनांतच तिला आनंद वाटतो. 'गरुडा, घेइं भरारी!' या सुंदर कवितेंत स्वातंत्र्यशाहीर बॅ. विनायकराव सावरकर यांच्या मुक्ततेविषयींचा आनंद कवीनें व्यक्त केला आहे. एकंदर कविता शाहिरी पद्धतीची आहे. परंतु अलीकडे कांहीं कवींनीं पोवाडे लिहून व गाऊन आपला शाहिरी बाणा जगाचें निदर्शनास आणला तसा प्रकार प्रस्तुत लेखकाचा नाहीं. मोरोपंताच्या आर्यावृत्ताची पकड कवीच्या मनावर अजून कायम आहे. छंदःशास्त्रोक्त वृत्तांच्या आवडीमुळें स्वच्छंदी रचनेची बेबंदशाही त्यांत नाहीं. तथापी कांहीं ठिकाणीं 'संयोगे गुरुः' या छंदःशास्त्रांतील नियमांचे उल्लंघन लेखकाकडून झाल्याचें दिसून येते. उदाहरणार्थ 'सुभाषबाबूंचे स्वागत' या कवितेंत 'सत्ताधीश समर्था भानूपरि तव प्रताप ताप करी' यांत प्रतापांतील 'प्र' या जोडाक्षरामुळें तव मधील 'व' ला दीर्घत्व येते. व द्वितीय चरणांतील मात्रा १८ न राहतां वाढतात. हाच दोष 'फैजपूर काँग्रेस' या कवितेंतील चवथ्या आर्येतील 'इत्यादि प्रमुख झुंजार' या चरणांत झाला आहे. व 'नूतन बालकास' या कवितेंतील 'होतो मोद प्रति प्रभात समयीं तैसे गमे मन्मना' या चरणांतही छंदोभंगामुळें सदोष रचना झालेली दिसून येईल.

ज्याप्रमाणें गद्यलेखकानें आपल्या लेखांत अलंकार व रस आणण्यापूर्वी त्यांतील शब्दयोजना व वाक्यरचना ही व्याकरणशुद्ध ठेवण्याची काळजी घेणें अवश्य; त्याचप्रमाणें काव्यरचनेतही रसालंकारादिकापेक्षाही काकणभर अधिक दक्षता छंदःशास्त्रदृष्टया पद्यें निर्दोष ठेवण्यांत दाखविणें अवश्य आहे. कोणताही मनुष्य आपणाकडे भेटीस आला असतां त्यासंबंधी आपला पहिला ग्रह त्याचे पोषाखांतील स्वच्छता व नीटनेटकेपणा यावरून होतो; त्याचप्रमाणें कवीच्या काव्याचीही गोष्ट आहे. छंद व व्याकरण हीं लेखास अब्रूदार बनविणारी महावस्त्रें आहेत. ती वस्त्रें ज्या लेखांतून व्यवस्थित वापरलेली दृष्टीस पडणार नाहींत त्याविषयीं सकृत्दर्शनीच दूषित पूर्वग्रह निर्माण होतो. व त्यांतील गुणांचें ग्रहण करण्याचा वाचकांचा कल पुष्कळअंशी कलंकित होऊन जातो. यासाठीं होतकरू लेखकांनीं व कवींनीं शुध्द लेखनाची बाब

दुर्लक्ष करण्यासारखी समजून त्याची उपेक्षा करणें धोक्याचे होईल. प्राचीन पध्दतीनें पंचकाव्यव्युत्पन्न झालेल्या पंडितवर्गांत ‘ अपि माषं मषं कुर्यात् छंदोभंगं न कारयेत् ’ हें वचन फार प्रचलित होते. त्यावरून छंदोभंगाच्या दोषापासून आपली रचना अलिप्त ठेवण्यासाठीं ते किती दक्ष असत याची कल्पना येतें.

प्रस्तुत संग्रहांत ग्रथित झालेल्या वेंच्यावरून रा. भागवत यांची लेखणी पद्यरचनेस जरी अगदींच अपरिचित नसली तरी तिचा स्वाभाविक कल गद्यरचनेकडेच अधिक आहे असे अनुमान करावयास कांहीं हरकत नाहीं. व या वाङ्मयक्षेत्रांत यश प्राप्त होण्यास त्यांस फार अवकाशही लागणार नाहीं असें मला वाटतें.

कै. लोकमान्य टिळक, पं. मोतीलाल नेहरू, सेनापती बापट व डी व्हॅलेरा या चार प्रसिध्द देशभक्तांच्या चरितांचे सिंहावलोकन या संग्रहांत केलेलें वाचकांस आढळून येईल. डी व्हॅलेरावरील लेख अनुवादरूप आहे. तो अनुवाद उत्तम साधला आहे. पण त्यावरून लेखकाच्या आवडीविषयीं सयुक्तिक अनुमान काढतां आले तरी त्याच्या विवेचन पद्धतीचें श्रेय व प्रतिपाद्य विचारसरणीबद्दलची जबाबदारी ही मूळ त्यांची नाहीं. परंतु लो. टिळक, पं. नेहरू व से. बापट यांचेविषयीं त्यांनी केलेले विवेचन वाचकांना पटल्याशिवाय राहाणार नाहीं व त्यांनीं प्रगट केलेल्या मार्मिकपणाबद्दल कोणासही कौतुक वाटेल असा माझा विश्वास आहे. पं. मोतीलाल नेहरू यांना गृहस्थाश्रमांत प्राप्त होणाऱ्या सर्व सुखांचा उपभोग घ्यावयास मिळाला.

**यदि रामा यदि च रमा यदि तनयो विनयधीगुणोपेतः ।**
**तनये तनयोत्पत्तिः सुरवरनगरे किमाधिक्यम् ॥**

या भर्तृहरीच्या उक्तीत जी ऐहिक सौख्याची पराकाष्टा वर्णिलेली आहे त्या पराकाष्टेच्या सुखांत पं. मोतिलाल हे सन१९१९पर्यंत होते. परंतु जालियन बागेतील अधिकाऱ्यांनीं केलेल्या अनन्वित अत्याचारांची चौकशी करतां करतां त्यांना असें आढळून आले कीं देशांत परकीय सत्ता धुडगूस घालीत असता आपण ऐहिक सौख्यांत व ऐष आरामांत आयुष्य घालविणें हा अन्याय आहे. गारोड्याचे खेळांत ज्याप्रमाणें जादूच्या कांडीचे दहापांच

वळसे दिल्याबरोबर आंब्याचे कोयीपासून वृक्ष उत्पन्न होतो; त्याला मोहार येतो; व लगेच आंबेही लागतात. त्याचप्रमाणें म. गांधीच्या दृष्टीच्या वळशानें कै. मोतीलालजींच्या अंतःकरणांत बीजावस्थेंत असलेल्या देशभक्तीच्या विचारास अंकुर फुटला, तो पल्लवित झाला; व लगेच त्याला वैराग्याचें फळही आलें. वरील दृष्टांतांतील गारोड्याचे खेळांतील वृक्ष व आंबा खेळ संपतांच स्वप्नसृष्टींत दिसणाऱ्या मायावी सृष्टीप्रमाणें आपोआप नष्ट होतें; परंतु पंडितजींच्या देशभक्तीची फळें आज या देशांतील आबालवृध्दांस चाखावयास मिळत आहेत.

याचे उलट लो. टिळक हे अत्यंत बुध्दिमान व विद्वान असूनही त्यांनी ऐहिक उत्कर्षाच्या व सुखोपभोगाच्या मार्गाकडे प्रथमपासूनच पाठ वळविली व लोकशिक्षणाच्या कार्यास वाहून घेतले. त्यांतूनच पुढें क्रमाक्रमानें त्यांनीं राजकारणाचें बिकट प्रदेशांत प्रवेश केला व आयुष्याचें अंतांपर्यंत त्या राजकारणास लौकिकशक्तिचें पाठबळ मिळवून देऊन तें अधिक व्यापक, तेजस्वी व परिणामकारक करण्यांत त्यांनीं आपलें सर्व आयुष्य वेचिलें. अलौकिक बुध्दिमत्ता, अगाध विद्वत्ता, अलोट स्वार्थत्याग, अपरंपार दातृत्व, अनिर्वचनीय धैर्य, उज्वल देशभक्ती, असामान्य उद्योग, आणि निष्कलंक चारिव्य हें त्यांचे सद्गुण त्यांनीं एकाच कार्यांत लावले आणि म्हणूनच त्यांना इंग्रज सत्तेच्या क्रोधास अनेकवार पात्र होऊन दुर्धर देहदंड सोसावा लागला !

**विपदि धैर्यमथाभ्युदये क्षमा ।**
**सदसि वाक्पटुता युधि विक्रमः ॥**
**यशसि चाभिरुचिर्व्यसनं श्रुतौ ।**
**प्रकृतिसिद्धमिदं हि महात्मनाम् ॥**

ही भर्तृहरीनें वर्णिलेली महात्म्याची म्हणजे लोकोत्तर विभूतीची लक्षणें लो. टिळकांना तंतोतंत लागू पडतात. ते भरतखंडातील अर्वाचीन कालांतले सर्वांत श्रेष्ठ कर्मयोगी होत. ‘ कर्मण्यवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन । मा कर्मफल हेतुर्भूः मा ते संगोऽस्त्वकर्माणि ’ या त्यांनी विस्तारानें विवेचिलेल्या गीता सिध्दांताचे दिव्य व उत्कृष्ट उदाहरण त्यांनीं आपल्या निरपवाद चारित्र्याचें रूपानें जनतेसमोर ठेवलें होतें.

मागील पिढींतील या दोन देशभक्तांच्या चारित्राबरोबरच ग्रंथकर्त्यानें से. बापट यांचें चारित्रावर प्रकाश पाडणारा एक छोटा पण मार्मिक लेख या ग्रंथांत संग्रहित केला आहे. से. बापटांच्या वैराग्याशीं पुराणांतून वर्णिलेल्या शुकाचार्यांचे वैराग्याचीच तुलना करता येईल. कोणताही मोह किंवा अन्य विकार या विरक्त देशभक्ताचें अंतःकरणास स्पर्श करूं शकत नाहीं. श्रीहरीनें दिलेल्या प्रेरणेनुसार जो मार्ग त्यांचे बुध्दीस प्रगट झाला त्याच मार्गानें चालण्याचा त्यांचा कृतनिश्चय आहे. व त्यार्प्रीत्यर्थ त्यांनीं आपल्या जीवाचें रान केलें आहे. त्यांनीं 'प्राणयज्ञदला' ची प्राणप्रतिष्ठा केली असून देशांत ऐक्य घडवून आणण्याचा निस्सीम निर्धार करणाऱ्या व त्या प्रतिज्ञापूर्तीस्तव निर्वाणास्त्र म्हणून प्राणार्पण करण्यास तयार असलेल्या सैनिकांचें दल उभें करण्याच्या महान् उद्योगास त्यांनीं प्रारंभ केला आहे. या सर्व देशभक्तांचें अंतःकरणांत जरी एकाच देशभक्तीची प्रबळ भावना उचंबळत असली तरी प्रकृति भिन्नत्वानें तिचें कार्यरूपांत एकाच तऱ्हेनें परिणत होणें शक्य नव्हते. त्यामुळें त्या तिघांच्या चरित्राचें विवेचन करतांना लेखकास त्यांच्या मार्गांतील भेद वाचकांचें नजरेस फार कुशलतेनें आणून द्यावें लागतात. हे तिन्ही लेख मार्मिकतेनें वाचणारास त्यांत या दृष्टीनें केलेलें विवेचन अपूर्ण आहे असे वाटल्यावाचून राहात नाहीं.

या संग्रहांत 'भारतीय पुढाऱ्यांचें आध्यात्मिक अधिष्ठान' हा एकच विवेचनात्मक निबंध आहे. हिंदुस्थान ही धर्मभूमि असून अध्यात्मविद्येची जननी आहे. म्हणूनच येथील देशभक्तांची प्रेरणा ही अध्यात्मविचारावर अधिष्ठित आहे असा सिध्दांत प्रतिपादन करण्याकडे लेखकाची प्रवृत्ति आहे. अलीकडे युरोपांत जी नवीन विचारांची लाट उसळली आहे, तींत मनुष्याचें वैयक्तिक अथवा सामुदायिक उद्योग हे सुखप्राप्त्यर्थ असून त्यांचा उगम स्वार्थबुध्दींतच असतो असें प्रतिपादन करणारा तत्ववेत्त्यांचा एक वर्ग आहे हें बहुश्रुत वाचकांना परिचित आहे. याचे उलट भरतखंडांत अनादिकाला-पासून राजनीति वा दंडनीति हें धर्मशास्त्राचें अंग मानण्यांत येत असून त्याचा उद्देश चतुर्विध पुरुषार्थाची प्राप्ति आहे असें समजलें जातें. "वारां-गनेव नृपनीतिरनेकरूपा" हें वर्णन कुटिल व नीतिभ्रष्ट राजनीतिच्या निंदेकरतां कवीनें केलेलें आहे. भारतीयांच्या आदर्शभूत राजनीतिचें लक्षण

म्हणून तें दिलेले नाहीं. हिंदुस्थानांत राजनीतिचा पाया जनतेचें श्रेष्ठ कल्याण व न्याय यावरच असला पाहिजे म्हणून सर्व देशभक्त आग्रहानें प्रतिपादित आले आहेत. व त्या दृष्टीनें सर्व भारतीय राजकारण अध्यात्माचें पायावर उभे आहे असे म्हणण्यास हरकत नाहीं. परंतु या विषयासंबंधीं योग्य समज जर उत्पन्न करावयाची असली तर प्रस्तुत लेखापेक्षां अधिक विस्तृत विवेचनाची आवश्यकता आहे.

वरील लेखाशिवाय ज्यांची कलाविषयक वाङ्मयांत गणना करतां येईल अशा सात लघुकथा व दहा स्फूर्त विचारतरंग या ग्रंथांत आहेत. या सर्व लघुकथांतून एक स्पृहणीय विशेष दृष्टीस पडतो; तो हा कीं लेखकानें युवयुवति प्रणयकथा व तदनुषंगिक शृंगारवर्णन या पासून आपल्या कथा अलित ठेविल्या आहेत. त्यामुळें त्या आबाल स्त्री–पुरुषांच्या हातीं द्यावयास कांहींच हरकत नाहीं. दुसरा विशेष हा कीं, प्रस्तुत समाजस्थितीच्या निष्कारण व निरंकुश निंदेचा गंधही यांत नाहीं. नवमतवादाचें वेड एखाद्या स्पर्शजन्यरोगाप्रमाणें आधुनिक लेखकवर्गांत पसरू पाहात आहे. त्यानें जे झडपले नाहींत त्यांच्या स्थिरप्रज्ञेची प्रशंसा करावी तेवढी थोडीच आहे. कारण आज स्वसमाजनिंदा हें निस्पृहतेचें लक्षण होऊं पाहात आहे.

हिंदुस्थानांतील प्रगल्भ भाषांपैकीं मराठी भाषेंतून या नवीन विचारांचा फैलाव जितक्या झपाट्यानें होत आहे इतका तो बंगाली, हिंदी प्रभृति भाषांतून होत नाहीं असें मला विश्वसनीय विद्वानांकडून कळलेलें आहे. हें जर बरोबर असेल तर महाराष्ट्राचें बुद्धिमत्तेस कीड लागू पाहात आहे कीं काय याचा साहित्यिकांनीं अवश्य विचार केला पाहिजे. प्रस्तुत ग्रंथांतील लघुकथांतून हा प्रकार यत्किंचितही दृष्टीस पडत नाहीं हें पाहून रसिक वाचकांस खात्रीनें समाधान वाटेल.

पण याहीपेक्षा तिसरा विशेष म्हणजे ग्रंथकर्त्याचा प्राचीन परंपरागत आचार व प्रस्तुत कालपेक्षी आचरण यामध्यें समन्वय घडवून आणण्याचा स्तुत्य उद्देश व उद्योग हा होय. ‘ रौप्यतुलादान ’ ‘ प्राजक्ताचा लक्ष ’ ‘ आजिबाईचे आचारविचार ’ आणि ‘ चोखामेळ्याची विहीर ’ या कथामधून लेखकाच्या मनाचा कल कसा आहे हे वाचकांच्या स्पष्ट लक्षांत आल्यावाचून राहात नाहीं. त्याचप्रमाणें ‘ पहिला परोपकार ’ ‘ अनुतापाचे

अश्रू ' व ' गहाळ झालेली भेट ' या गोष्टीही मनोरंजक व बोधप्रद वाटतात.

ग्रंथकर्त्यांची लेखनशैली चित्ताकर्षक असल्यामुळें गोष्टी वाचतांना करमणूक व बोध या दोघांचाही अनुभव वाचकांस एकसमयावच्छेदे-करून येतो.

परंतु मला जर या सर्व पुस्तकांत अधिक मनोवेधकता व स्फूर्तिची चमक कोणत्या तऱ्हेच्या लेखांत आढळली असेल तर ती अभ्यर्थना, हुतात्मा, प्रतीक्षा, घटिका यंत्राचा संदेश, सीमारेषेवर, विकास, विलास कीं विनाश ? शरदृतूचें स्वागत, भरती ओहोटी, चुकामूक आणि वाढदिवस या स्फूर्तविचार-तरंगरूप संकीर्ण लेखांत दिसून आली. एखाद्या जवाहिऱ्याचें दुकानीं गेलें असतां कांही बारीक मोत्यांच्या माळा, तर कांहीं जडावांचे दागिने, तर कांहीं ठळक मोत्यांचे दाणे असे निरनिराळ्या तऱ्हेनें कुशलतेनें मांडलेले दृष्टीस पडतात. प्रस्तुत संग्रहातील कविता या जडावाच्या दागिन्याप्रमाणें आहेत. लघुकथा बारीक मोत्यांच्या माळेप्रमाणें वाटतात. पण स्फूर्तविचारतरंग हे पाणीदार व टपोर मोत्यांच्या दाण्याप्रमाणें खुलून दिसतात. त्यांतील प्रत्येक मोतीं निरनिराळें परीक्षावें लागतें व आवडीप्रमाणें वापरावें लागतें.

या स्फूर्तविचारतरंगांची भाषा काव्यमय व ओघवती असल्यामुळें ते वाचतांना वाचकांचे अंतःकरण त्यांत लीलेनें तरंगावयास लागतें. लेखकाचे प्रतिभेचा ओघ व वाचकाचें रसिकतेचा ओघ याचा हृदयंगम संगम होऊन जो आनंद वाटतो त्याची कल्पना देता येणें शक्य नाहीं. त्याचा अनुभव स्वतः वाचकांनीच घेतला पाहिजे. म्हणून हे लेख सर्व वाचकांनीं एकदा अवश्य वाचून पाहावे अशी त्यांस मी अगत्याची शिफारस करतो.

हा लेखन प्रकार मराठींत अगदींच नवीन नसला तरी फारसा रूढ नाहीं. ' अमृत तुषार ' वगैरे कांहीं लिखाण या प्रकारचे आहे. तथापि श्री. भागवत यांचें ' मोहोरा ' ला या स्फूर्ततरंगांनीं विशेष मधुर सुगंध प्राप्त झाल्यामुळें त्याकडे रसिक भृंगांचें चित्त वेधलें जाईल अशी मला बळकट आशा वाटते. व महाराष्ट्र सारस्वताची सेवा करण्याचा त्यांचा छंद वाढीस लागून त्यांचे हातून यापुढें याहून श्रेष्ठ प्रतीची ग्रंथरचना होवो अशी मी भगवंताजवळ भक्तिपुरःसर प्रार्थना करतों.

रा. भागवत यांचा माझा पूर्व परिचय नसतां व साहित्यक्षेत्रांत माझे-कडून कोणतीही विशेष कामगिरी घडलेली नसतां त्यांनीं मला आपल्या सुंदर प्रथमप्रतिभापत्याचें प्रकाशन संस्काराचें वेळीं उपाध्यायाचें कार्य करण्याची 'वरणी' दिली व अशा रीतीनें माझा गौरव केला याबद्दल मी त्यांचे आभार मानून उपाध्यायकर्मांची विधियुक्त समाप्ति करण्याकरतां व सर्व प्रमाद परि-हारार्थ सुप्रसिध्द अच्युत स्मरणात्मक श्लोकाचे पठन करून हा प्रस्तावना लेख समाप्त करतों.

**यस्य स्मृत्याच नामोक्त्या तपोयज्ञक्रियादिषु ।**
**न्यूनम् संपूर्णतां याति सद्यो वंदे तमच्युतम् ॥**

इतिशम् ।

अलमति विस्तरेण.

**सिमला.**
**शनिवार भाद्रपद वद्य १३**
**ता. २–१०–१९३७.**

**माधव श्रीहरी अणे.**

(१)

# तीन निवडक अभिप्राय.

## प्रो. दत्तो वामन पोतदार

एम्. ए. पुणें.

‘ मोहोर ’—हा एकाच झाडाच्या तीन खांद्याना फुटलेला आहे. ही यांत जरा मौज आहे. पूर्वी मराठी वाङ्मयांत असेंच एका घरांतून ‘श्रीखंड’ आलें होतें. आज हा मोहोर आपणांस दिसत आहे. त्याग, देशभक्ति, सेवा व आपली संस्कृति यांचा सुवास या मोहोरांत आढळून येतो; व त्यामुळें मन प्रफुल्लित होतें.

काव्य—गोष्टी, निबंध इत्यादि विविधप्रकार यांत आढळतात त्यामुळें रुचिपालट हि होतो. बापट, व्हॅलेरा, सुभाष, टिळक, नेहरू व राजवाडे या त्यागमूर्तींचा जयजयकार हि वाचावयास मिळून मन उत्साहित होते.

घड्याळ्याच्या दोन कांट्यांत बंधुप्रीतीबरोबर केवढी कर्तव्यप्रीति आढळते तें लक्ष्यांत येऊन शांतपणें विचार केल्यास या जगांत रोज घडणाऱ्या गोष्टीपासूनच कितीतरी उत्तम उपदेशाचे धडे आपणांस शिकतां येतील याचें उदाहरण मिळतें. एका तरुण मुलीनें या पुस्तकांत ‘आजीबाईंचे आचारविचार’ मांडून अनुभवानें शहाणपण अंगीं कसें येतें तें सुचविलें आहे त्याचें कौतुक वाटतें. असो, आज मोहोर मिळाला. यांतला पुष्कळ गळेल परंतु तो जोवर फुटत राहील तोंवर एक दिवस यांतूनच पिकलेला आंबा खचित दिसेल !

आश्विन शुद्ध २ शके १८५९
ता. ६–१०–१९३७. } (सही) **दत्तो वामन पोतदार.**

(२)

## प्रख्यात साहित्यिक, श्री. ना. गो. चाफेकर

**बी. ए. एल्‌एल्. बी. बदलापूर.**

श्रीखंडे कुटुंबानें ज्याप्रमाणें मराठी भाषासागराचें मन्थन करून श्रीखंड बाहेर काढलें त्याप्रमाणें ही भागवत कुटुंबाची मंथनक्रिया मोहोर-रुपानें बाहेर पडत आहे. अशा ह्या कुटुंब पुष्पांची माला बनवून ती शारदा देवीला कोणी समर्पण केल्यास महाराष्ट्राच्या प्रगतीचें तें एक निश्चित गमक म्हणून समजलें जाईल. पिता, पुत्र व कन्या ह्या तिघांच्या मिळून २६ कृतींचा प्रस्तुत मोहोर बहरला आहे. ह्या पुढची पायरी ह्या मोहोराचें नामांकित, पौष्टिक व रुचिर फलांमध्यें रूपांतर होणें ही होय. मोहोराचे परीक्षण केल्यास तो वांझ न ठरतां सुफलदायी होईल अशी कोणासहि ग्वाही देतां येईल. कविता, चुटके, कथा, चरित्रें कांहींहि घ्या सर्व बोधप्रद व वाचनीय अशींच आहेत. नेहमी घडणाऱ्या साध्या गोष्टी अगर घटना विवेकी माणसावर कसा परिणाम करतात व त्यामुळें सर्व जीवन कसें आनंदमय होतें ह्याचा प्रत्यय मोहोर वाचून येण्यासारखा आहे. रुक्ष दिसणाऱ्या घटनेंतून दिव्य दृष्टीचा माणूस रस निर्माण करूं शकतो. अशी ही दिव्य दृष्टी प्राप्त करून घेतल्याबद्दल श्रीयुत भागवतांच्या कन्यापुत्रांचें मी मनःपूर्वक अभिनंदन करतो.

**आश्वीन शु॥३ शके १८५९.**<br>**ता. ७–१०–३७.** } (सही) **ना. गो. चाफेकर.**

(३)

# श्री. साने गुरुजी

एम्. ए.

‘ मोहोर ’ हें सुंदर पुस्तक चाळीसगांवचे तरुण वकील श्री. वि. वि. भागवत यांनीं मजजवळ अभिप्रायार्थ दिलें. या पुस्तकांतील बहुतेक सारें लेखन त्यांचेच आहे. दोन लेख त्यांचे वडील श्री. वि. प. भागवत यांचे आहेत व दोन लेख त्यांच्या भगिनी कु. कमलाताई यांचे आहेत. या पुस्तकांत लेखनाचा एकच प्रकार नाहीं. फुलांच्या गुच्छांत ज्याप्रमाणें नाना रंगांचीं व गंधांचीं फुलें असतात. आणि एकप्रकारचा संमिश्र आनंद त्यामुळें होतो, तसाच प्रकार प्रस्तुत पुस्तक वाचून होतो. या संग्रहांत कविता आहेत; चरित्रात्मक निबंध आहेत, लघुकथा आहेत, विचारतरंग किंवा गद्य-भावगीतें आहेत. असा हा त्रिविध मोहोर आहे व तो मनमोहक आहे.

चरित्रात्मक निबंध उत्कृष्ट आहेत. त्यांत पाल्हाळ नाहीं. कुशल कर्णधार या निबंधांत लोकमान्यांचें अमोघ नेतृत्व सोदाहरण सिध्द केलेलें आहे. पंडित मोतीलाल नेहरू, सेनापति बापट, डी व्हॅलेरा हे निबंधहि माहितीपूर्ण असें आहेत. सहृदयतेनें व उत्कटतेनें ते लिहिलेले आहेत. भारतीय पुढाऱ्याचें आध्यात्मिक अधिष्टान हा निबंध फार सरस उतरला आहे. भारतीय पुढाऱ्यांची आध्यात्मिक भूमिका प्रथम मांडली आहे. नंतरचे श्रीकृष्णाच्या मूर्तीसमोर ध्यानस्थ बसणें, चिंतन करतां करतां विचारांचीं होणारीं आंदोलनें, आणि त्या आंदोलनांतून जनसेवा म्हणजेच जनार्दनसेवा या तत्वावर स्थिर होणें—वगैरे वर्णन फारच सहृदय व सुंदर आहे. पूजेचें पावित्र्य या निबंधात भरून राहिलें आहे.

या पुस्तकांत चारच कविता आहेत. ‘ नूतन बालकास ’ ही कु. कमलाताईंची कविता गोड आहे. मला ती आवडली. ‘ गरुडा, घेई भरारी ’ ही स्वातंत्र्यशाहीर देशभक्त बॅ. सावरकर यांच्या मुक्ततेनंतर केलेली कविता फार स्फूर्तीप्रद उतरली आहे. दे. भ. सुभाषचंद्रावरची कविता शब्दार्थालंकारांनीं नटली आहे. फैजपूरच्या कांग्रेसवरची कविताहि चांगली आहे. महात्माजी, जवाहीरलाल, व पं. मदनमोहन मालवीय यांचीं वर्णनें थोडक्यांत सुंदर आहेत. प्राणांची पर्वा न करतां झेंडा फडकवणाऱ्या युवकवीर किसनसिंग यांचें पवित्र कीर्तनहि त्या कवितेंत आहे.

या संग्रहांतील 'रौप्यतुलादान' या लेखास कथा म्हणू की निबंध म्हणूं कीं चरित्र म्हणूं तें कळत नाहीं. परंतु त्यांतील विचार व भाव उदात्त आहेत हें मात्र खरें. 'आजीबाईचे आचारविचार' हा एक प्रश्नोत्तरात्मक सुंदरसा निबंध आहे. संसारांत सुख पाहिजे असेल तर स्त्रियांनीं काळाप्रमाणें कल्पना बदलल्या पाहिजेत ही गोष्ट आजीबाईच्याच तोंडून कु. कमलाताईंनीं वदविली आहे.

मोहोरांतील लघुकथांपैकी पहिला परोपकार, अनुतापाचे अश्रु व चोखामळ्याची विहीर या गोष्टी हृदयाला भिडतात. 'पहिला परोपकार' या गोष्टींत मृत्यूच्या स्मरणानें एकदम कर्तव्यजागृति कशी येते तें सुंदर रीतीनें दाखविलें आहे, एखादा शब्द विशिष्ट क्षणीं कानावर पडला तर जीवनांत क्रांति होते. हा अनुभव या गोष्टींत आहे. 'अनुतापाचे अश्रु' या गोष्टींत माणसाच्या सहनशीलतेसहि कांहीं सीमा असते हें दाखविलें आहे. जन्मभर केलेल्या सेवेच्या सुगंधी कर्पूरराशीला एखाद्या वेळच्या संतापांतील केलेल्या अनुचित कृत्यानें कशी काडी लागते आणि आपलें हृदय त्यामुळें पुढें कसें अखंड जळत राहातें, रडत राहातें तें या गोष्टीत फारच उत्कृष्टपणें दाखविलें आहे. हजारों लोकांना असा हा अनुभव प्रत्यहींच्या जीवनांत येत असतो आणि चोखामेळ्याची विहीर ही गोष्ट तर फारच परिणामकारक आहे. ही गोष्ट सर्व गोष्टींच्या शिरोभागीं शोभेल. पाणी पिण्यास येणाऱ्या सनातनीस हरिजन म्हणतो "ही चोखामेळ्याची विहीर आहे!" ही महारांची-अस्पृश्यांची विहीर आहे असें तो म्हणत नाहीं. चोखामेळ्याची विहीर असें तो म्हणतो. ही संतांची विहीर आहे. पवित्र चोखामेळा आमच्यांत झाला तरीही आम्ही अस्पृश्यच आहोंत. वगैरे कितीतरी भाव त्या उत्तरांत आहेत. ही गोष्ट माझ्या हृदयाला झोंबली. ही चोखामेळ्याची विहीर हे शब्द हृदयांत बाणाप्रमाणें घुसले.

परंतु मोहोर या पुस्तकांत सर्वांत अधिक आकर्षक जर कोणता भाग असेल तर तो गद्यगीतांचा होय. या गद्यमय भावगीतांनीं माझ्या मनाला चटका लावला. बुद्धीच्या तंबोऱ्याला भावनांच्या तारा बांधून काढलेले हे बोल आहेत. हे विचारतरंग, हे हृदयाचे बोल मला पुन्हांपुन्हां वाचावेसे वाटलें. वाचलेलें जेव्हां पुन्हां वाचावेंसें वाटतें, तेव्हां लगेच खूणगांठ बांधावी कीं हें लिखाण जिवंत आहे. जीवनाचें स्वच्छ प्रतिबिंब तेथें पडलेलें आढळतें. श्री. भागवत यांच्या भेटीगांठींत त्यांची सहास्य प्रसन्नता, विशाल दृष्टि, व्यापक सहानुभूति हे गुण दिसल्याशिवाय राहात नाहींत. त्यांच्या डोळ्यांत

एक प्रकारची गोड चिंतनाची छाया दिसते. त्यांचे डोळे कांहींतरी अ-ज्ञात शोधीत आहेत असें वाटतें. त्यांच्या आंतरिक जीवनाचें हें स्वरूप या गद्य भावगीतांत दृग्गोचर होतें.

'अभ्यर्थना' या गद्यगीतांत मजजवळ कोणतीही कला नाहीं परंतु हृदयाचें बोबडे बोल आहेत असें लेखकानें म्हटलें आहे. हृदयाच्या बोबड्या बोलांतच माधुर्यसागर उचंबळत असतो. ज्याला हृदय आहे त्याला सारें कांहीं आहे. "घटिकायंत्राचा संदेश" हें गद्यगीत फारच मनोहर आहे. घड्याळाच्या दोन कांट्यांचें वर्णन हृदयास उचंबळवून सोडतें. मी हें गद्यगीत कितीदां तरी वाचलें. 'भरती ओहोटी' हें गद्यगीतहि असेंच नितांतसुंदर आहे. हुतात्मा, प्रतीक्षा, सीनारेषेवर, वाढदिवस वगैरे गद्यगीतें मुळांतच वाचावींत. हृदयातील खळबळ मोजक्या शब्दांत मांडण्याची हातोटी श्री. भागवत यांना चांगली साधली आहे. ही गद्य भावगीतें लिहिण्याचा प्रकार जर त्यांनीं पुढें चालविला तर मराठींत उत्कृष्ट प्रकारची अशी विशेष भर ते घालूं शकतील असें मला वाटतें.

या संग्रहांत सर्वत्र उदार दृष्टि आहे. कोठेही कोणावर शिव्याशाप नाहींत. हें पाहून आनंद होतो. भाषाही सरळ व साधी आहे. साधेपणाच्या सौंदर्याला उत्कटत्वाची जोड मिळाल्यामुळें विशेषच माधुर्य आलें आहे. कोठें कोठें फार सुंदर उपमा आहेत. दुःखमिश्र आनंदाला खळें पडलेल्या चंद्राची दिलेली उपमा किती सहृदय आहे! ग्रंथांत भावना व विचार दोहोंचा रमणीय संगम दिसून येतो. विचारांना भावनांची ऊब आहे व भावनांना विचारांचे निर्मळ डोळे दिलेले आहेत. सुबोध, सहज सुंदर, उत्कट भाषा, उदार भावना व निर्मळ विचार यामुळें हा मोहोर सर्वांची मनें मोहिल्यावांचून राहाणार नाहीं. ही शुद्ध व सरसवाङ्मयसेवा उत्तरोत्तर वाढत जावो व श्री. भागवत खानदेशाची कीर्ति अधिकाधिक वाढवोत अशी मी आशा करतों.

**आश्विन शुद्ध ९ शके १८५९**
ता. १३-१०-३७.

(सही) **पां. स. साने.**

# विषयानुक्रम.


| | | | |
|---|---|---|---|
| १ | नूतन बालकास (कविता) | कमल भागवत. | पान १ |
| २ | राष्ट्रनौकेचा कुशल कर्णधार | वि. प. भागवत. | ३ |
| ३ | अभ्यर्थना | वि. त्रि. भागवत. | १० |
| ४ | हुतात्मा | ,, | १२ |
| ५ | प. मोतीलाल नेहरू | ,, | १३ |
| ६ | पहिला परोपकार | ,, | २० |
| ७ | रौप्यतुलादान | वि. प. भागवत. | २५ |
| ८ | गरुडा, घेई भरारी ! (कविता) | वि. वि. भागवत. | ३५ |
| ९ | प्रतीक्षा | ,, | ३७ |
| १० | सीमारेषेवर | ,, | ३९ |
| ११ | जनसेवा हीच ईश्वरसेवा | ,, | ४० |
| १२ | फैजपूर काँग्रेस (कविता) | ,, | ४७ |
| १३ | घटिकायंत्राचा संदेश | ,, | ४९ |
| १४ | विकास, विलास कीं विनाश ? | ,, | ५१ |
| १५ | प्राजक्ताचा लक्ष | ,, | ५२ |
| १६ | चोखामेळ्याची विहीर | ,, | ५८ |
| १७ | शरदृतूचें स्वागत | ,, | ६१ |
| १८ | सुभाषबाबूंचें स्वागत (कविता) | ,, | ६२ |
| १९ | एक निष्ठावंत कर्मवीर | ,, | ६३ |
| २० | आर्जाबाईचे आचारविचार | कमल भागवत. | ६९ |
| २१ | भरती ओहोटी | वि. वि. भागवत. | ७४ |
| २२ | गहाळ झालेली 'भेट' | ,, | ७७ |
| २३ | चुकामूक | ,, | ८२ |
| २४ | अनुतापाचे अश्रू | ,, | ८४ |
| २५ | वाढदिवस | ,, | ९० |
| २६ | इमॉन डी व्हॅलेरा | ,, | ९२ |

प्रस्तावना लेखक.



लोकनायक माधव श्रीहरि अणे.

# मो हो र.

( अनेकविध विषयांचा संग्रह )

## नूतन बालकास.

[ कु. कमल भागवत. ]

बीजेची नव कोर जेवि खुलते नीलांबरीं मोहक ।
आशा-दीप गमे निराश-तिमिरीं हा बाल आश्वासक ॥
उद्यानांस फुलें, तळ्यास कमलें, शोभा जशी आणिती ।
संसारोपवनांत बाळ रिझवी उत्फुल्ल पुष्पाप्रती ॥ १ ॥

वाढे चंद्रकला तसा प्रतिदिनीं संतोष हो सागरा ।
प्रेमाच्या लहरी मनीं उसळती पाहोनिया सुंदरा ॥
अंकीं पूर्व दिशेचिया बघुनिया बालार्क जेवी जना ।
होतो मोद प्रतिप्रभातसमयीं तैसे गमे मन्मना ॥ २ ॥

पाहोनी शिशुच्या सुहास्यवदना माता वदे पाडसा ।
“ घेई संप्रति झोंप, कार्य पुढतीं आहे तुला राजसा ॥
देशोद्धार करावयास झटले सर्वस्वही अर्पुनी ।
त्या थोरासम मान्य होइं जगतीं इच्छा असे मन्मनीं ” ॥३॥
स्फूर्तीच्या नव वाटिकेंत सुमनें मी संभ्रमें वेंचिलीं ।
त्यांची गुंफुनि काव्यमाळ तुजला अर्पावया आणिली ॥
नाहीं त्यांत जरी प्रसाद अथवा माधुर्य शब्दांतलें ।
श्रीरामा शबरी, उपायन तसें हें मीं तुला अर्पिलें ॥४॥

[ वसंततिलका. ]

पूर्णेंदु जेविं सुखवी अखिला जनाला ।
होवो ‘ सुधाकर ’ तसा निज मातृभूला ॥
दीर्घायुषी प्रभु करा नव बालकाला ।
प्रार्थी ‘ सरस्वतिसुता ’ पदपंकजाला ॥५॥

**प्रबोध**, धुळें. १५ मार्च १९३५.

[ या पुस्तकरूपी नूतन बालकाकडे रसिक वाचकवर्ग अशाच दृष्टीनें पाहील अशी मला आशा आहे. संपादक. ]

# राष्ट्र-नौकेचा कुशल कर्णधार.

लेखकः-वि. प. भागवत. वकील, चाळीसगांव.

"राष्ट्रीय झटापटींत वेळोवेळीं जे अनेक प्रश्न उद्भवतात, त्यांचा कार्यकारणभाव व अंतर्गत उद्देश समजला पाहिजे; व ज्या मुत्सद्यांना या गोष्टी चांगल्या समजतात, तेच आपल्या राष्ट्राचें तारूं खडकावर आपटूं न देतां सुरळीतपणें उद्दिष्ट स्थळीं नेतात." लोकमान्य टिळक.

एखाद्या सिद्धांताचें तात्त्विक विवेचन करीत असतां थोर पुरुष आपल्याच आचरणाचें मर्म लेखनाच्या ओघांत अभावितपणें व्यक्त करितात. लोकमान्यांनी स्वतःच्याच मुत्सद्देगिरीचें वर्णन वरील उताऱ्यांत केलें नाही काय? त्यांच्या जीवनांतील महत्तम प्रसंगाचे अनुरोधाने राष्ट्रनौकेच्या कर्णधाराचें काम त्यांनी किती कौशल्याने केलें हें सूत्ररूपाने दाखविण्याचा या लेखांत प्रयत्न केला आहे.

### राजकीय स्वातंत्र्याचें श्रेष्ठत्व.

लो. टिळकांनी डे. ए. सोसायटीचा राजीनामा दिल्यावर केसरीच्या द्वारें लोकशिक्षणाचें कार्य सुरूं केलें. त्यावेळीं आपलीं मतें जनतेला पटविण्याचें कार्य 'सुधारक' पक्षानें जोराने आरंभिलें होतें. सामाजिक सुधारणेचें योग्य महत्त्व टिळकांना पटलें होतें. समाजसुधारणेच्या ध्येयाला टिळकांचा विरोध नव्हता. पण सुधारकांची हिंदुधर्माविषयी, संस्कृतीविषयी, चालीरीतींविषयी असलेली दोषैक दृष्टि टिळकांना तिरस्करणीय वाटे. सामाजिक सुधारणेचे पुरस्कर्ते, हिंदु-समाजाचें बिंब पाश्चात्त्य कल्पनेच्या [ Convex ] बहिर्गोल

आरशांत पाहत होते. अर्थात् त्यांच्या दृष्टीला तें प्रतिबिंब विकृत स्वरूपांत दिसलें असल्यास नवल काय? पण टिळकांनी प्राचीन धर्मशास्त्राचा खोल अभ्यास केला असल्यामुळे रूढीने विकृत झालेल्या हिंदुधर्माचें सत्यस्वरूप व सामर्थ्य यांचा अंदाज त्यांना होता. शिवाय त्यांनी असेंहि जाणलें होतें कीं, समाजसुधारणेला अंत नाही. ब्रम्हदेशाच्या उदाहरणावरून त्यांना अशी खात्री पटली होती कीं, आपल्या अवनतीचें मूळकारण सामाजिक सुधारणेचा अभाव हें नाही, तर राजकीय स्वातंत्र्याचा अभाव हेंच आपल्या अवदशेचें मूळ आहे. राजकीय सत्तेसाठी राजकारणाचा अवलंब केल्याशिवाय जनतेला गत्यंतर नाही असें जाणून, राजकारणाचें पात्र विस्तृत व त्याचा प्रवाह प्रबल करण्यासाठी त्यांनी चंग बांधला. केसरी पत्राच्या साहाय्यानें जनतेंत जागृति करून राजकारणाची हौस असणारा अनुयायी वर्ग निर्माण केला. गणेशोत्सवासारख्या धार्मिक व शिवाजीउत्सवासारख्या ऐतिहासिक उत्सवांचा पाया घालून राष्ट्र-जागृतीचें काम जोराने चालविलें. त्यावेळीं राष्ट्रनौका समाजकारणाच्या अरुंद उथळ व आडवळणाच्या प्रवाहांत आत्मोद्धाराच्या आशेनें लोटली जात होती; ती लो. टिळकांनी राजकारणाच्या विस्तृत, खोल व स्वातंत्र्योन्मुख प्रवाहांत आणून सोडली. ही टिळकांच्या धोरणाची पहिली श्रेष्ठ कामगिरी होय.

## चळवळीची पद्धत.

लो. टिळकांनी भारतीय व पाश्चिमात्त्य इतिहासाचें सूक्ष्म अवलोकन करून आपल्या राजकीय चळवळीची दिशा ठरविली. इंग्रज लोकांच्या स्वभावाचे व त्यांनी स्थापन केलेल्या राज्यपद्धतीचे गुणदोष त्यांना पूर्णपणें माहीत होते. कायदा हा इंग्रजी राज्यपद्धतीचा मूळ आधार आहे हें जाणून, व राजकीय चळवळीची बाल्यावस्था ध्यानीं आणून, त्यांनी कायद्याचे काटेकोर मर्यादेंत राहून आपली चळवळ चालविली. “ कायदेशीर रीतीनें सरकारशीं भांडावयास रयतेस कसें शिकवावें, ही विद्या आमच्या पुढारी लोकांस शिकावयाची आहे व ती जेव्हां ते शिकतील, तेव्हांच सरकारी अधिकाऱ्यांचा उर्मटपणा उतरेल व रयतेस कांही फायदा होईल. ” असें त्यांचें मत होतें व त्या विद्येंत ते स्वतः अगदी निष्णात होते. इंग्रजांच्या “ फोडा व झोडा ” या राजनीतीचा अवलंब त्यांनी त्यांच्या विरुद्धच केला, व इंग्लंडमधील राजा

व हिंदुस्थानांतील सनदी नोकरशाही यांची त्यांनी प्रथम भिन्नता दाखविली. व नोकरशाहीच्या अन्यायाविरुद्ध टीका करून दाद मागणें कायदेशीर आहे, असें त्यांनी ठरवून घेतलें. " हिंदुस्थानचे आम्ही ट्रस्टी आहों " या इंग्रजांच्या बढाईचा त्यांनी पुरेपूर उपयोग करून घेतला, आणि कायदेपांडित्यानें शब्दांचे सूक्ष्म श्लेष काढून आपल्या चळवळीची मर्यादा कायद्याच्या अंतिम सीमेपर्यंत नेऊन भिडविली. चळवळ करण्याची त्यांची पद्धत इतकी परिणामकारक असे कीं, कायद्याच्या शब्दार्थांची ओढाताण करूनहि सरकारनें त्यांस संकटात घालण्यास कमी केलें नाही !

पूज्यवर दादाभाईंनी ' स्वराज्य ' शब्द कलकत्ता कांग्रेसमध्यें प्रथम उच्चारला त्याचा टिळकांनी पूर्ण फायदा घेऊन ' स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे व मी तो मिळविणार ' हें आपल्या चळवळीचें ब्रीदवाक्य ठरविलें. इंग्रज लोकांचें मर्म त्यांचे वणिग्वृत्तींत आहे हें जाणून स्वदेशी व बहिष्कार इत्यादि प्रभावी साधनांनी राजकारणाला उग्र स्वरूप प्राप्त करून दिलें.

## सुरत येथील प्रसंग.

नामदार गोपाळराव गोखले व सर फेरोजशहा मेथा यांचे नेतृत्वाखाली राष्ट्रीय सभेला विचारविनिमय करणाऱ्या संस्थेचें स्वरूप होतें. बंगालची फाळणी झाल्यावर बंगालच्या विशिष्ट चळवळीचे पडसाद उठविण्यास लो. टिळक मुख्यतः कारणीभूत झाले. कलकत्त्याचे सभेंत मान्य केलेल्या स्वदेशी बहिष्काराच्या प्रगतिपर ठरावांस पायबंद घालण्यासाठी अनेक कारस्थानें करून फेरोझशहांनी राष्ट्रीय-सभा नागपुरास न भरवितां सुरतेस आपल्या बालेकिल्ल्यांत भरविली. सुरतेस झालेला रणसंग्राम महशूरच आहे. राष्ट्रीय सभेचें तें संस्मरणीय अधिवेशन पाहण्याचें भाग्य मला लाभलें होतें. राष्ट्रीयसभेला आरंभ होण्यापूर्वी आपलें खरें भांडण सरकारशीं आहे, हें जाणून वैयक्तिक अपमानाची पर्वा न करितां टिळकांनी मवाळाशीं समेट करण्याचे अनेक प्रयत्न केले. सुरतेची सर्वच परिस्थिती त्यांना प्रतिकूल; त्यामुळे अध्यक्षाच्या निवडणुकीला विरोध करण्याचें ठरवून त्यांनी भर अधिवेशनांत विपक्षीय क्षोभाची पर्वा न करितां जें धीरोदात्तपणाचें वर्तन केलें, तें तेथे हजर असलेल्या लोकांच्या मनःपटलावरून पुसून जाणें शक्य

नाही. भर सभेंत त्यांनी आपल्या असामान्य धैर्याची चुणूक दाखविली, तर पुढें झालेल्या कन्टिन्युएशन कॉंग्रेसमध्ये त्यांचा मुत्सद्दीपणा जगाच्या प्रत्ययास आला. अलौकिक धैर्य, निश्चल बुद्धि व दृढ आत्मविश्वास इत्यादि गुणांमुळे सुरतेच्या अधिवेशनापासून ते अखिल भारताचे पुढारी बनले.

## चिरोल खटल्याची मीमांसा.

चिरोलवर खटला करण्यांत टिळकांनी चूक केली, असा कित्येक लोक त्यांचेवर वृथा दोषारोप करतात. लो. टिळकांनी आंतरराष्ट्रीय धोरण संभाळूनच फार धोरणाने डाव टाकला होता. 'महाराष्ट्रा' चे संपादक श्रीयुत गोपाळराव यांनी या संबंधांत दिलेली आठवण बोधप्रद असून शंकानिवृत्ति करणारी आहे. चिरोलचे खटल्यांत विलायतेस तरी न्याय मिळेल, असें आपणांस वाटत होतें काय? या ओगल्यांचे प्रश्नास उत्तर देतांना टिळक म्हणाले, "अहो, चिरोलवर मीं खटला केला, तो महायुद्ध सुरू झालें म्हणून केला! विलायतेंतील जज्ज न्याय देतील, या आशेने केला नाही! परंतु युद्ध चालूं आहे—आणि इंग्रजसरकारला हिंदुस्थानच्या मदतीची जरूर आहे, तोंपर्यंत धडधडीत अन्याय करून हिंदुस्थानच्या असंतोषांत आणखी भर घालण्याची ब्रिटिश मुत्सद्यांची छाती होणार नाही, या अंदाजाने मीं चिरोलवर फिर्याद केली. चिरोलनें पुस्तक लिहिलें, तें मुंबईसरकारच्या बड्या बड्या गोऱ्या कामदारांनी दिलेल्या माहितीवरून. तेव्हां चिरोल हरला तर मुंबई सरकारची फटफजिती होणार, ती होऊं नये म्हणून हिंदुस्थान सरकार आटोकाट प्रयत्न करील, हें मला माहीत होतें. कारण हा खटला दिसावयास चिरोलविरुद्ध असला, तरी तो वस्तुतः सरकारविरुद्धच होता! महायुद्ध सुरू असेपर्यंत त्याचा निकाल लागेल, असा माझा अंदाज होता. पण......त्यांनी हा खटला मुद्दाम युध्द संपेपर्यंत लांबविला! आम्ही विलायतेस जाऊन पोंचतों न पोंचतों तोंच 'आर्मिस्टिस' [ युद्ध तहकुबी ] झाल्याची बातमी आली! मीं दादासाहेब करंदीकरांस तेव्हांच म्हटलें कीं, खटला आमचेवर उलटणार व आमच्या डेप्युटेशनचेहि बारा वाजणार! 'गरज सरो आणि वैद्य मरो!' युध्द संपल्यावर कोण हिंदुस्थानच्या असंतोषाची पर्वा करतो?" लो. टिळकांचा खुलासा वाचून जग त्यांच्या धोरणाची तारीफ करील. रशियाच्या मोहिमेंत आकस्मिकपणें थंडी पडून नेपोलियनची

दुर्दशा झाल्याबद्दल त्याला जितका दोष देतां येईल, तितकेंच चिरोल-प्रकरणांत अपयश आल्याबद्दल टिळकांना दोष देणें योग्य होईल !

## परदेशीय प्रचार.

परदेशी राजकारणाचें महत्त्व टिळकांनी उत्तम रीतीनें जाणलें होतें. हिंदुस्थानांतील परिस्थितीची माहिती इंग्लड, अमेरिका इत्यादि देशांतील लोकांस पुरवून हिंदी राजकीय आकांक्षांबद्दल त्यांची सहानुभूति मिळविणें फार मोठें कार्य आहे, असें ते मानीत. याच हेतूने ते विलायतेंत असतां त्यांनी व्याख्यानें देऊन प्रचारकार्य केलें.'इंडिया' पत्र आपल्या हातांत घेण्याचा खटाटोप करून कायमचें प्रचारकार्य व्हावें अशी योजना केली. लाला लजपतराय यांना त्यांच्या अमेरिकेंतील प्रचार कार्यासाठी टिळकांनी जी बहुमोल आर्थिक मदत केली,त्यांतील रहस्य हेंच आहे.कविवर्य रविंद्रनाथ टागोर यांनी अमेरिकेंत जाऊन हिंदी संस्कृतीवर व्याख्यानें द्यावीं म्हणून त्यांचा प्रयत्न होता. मिस् मेयोच्या उपद्यापावरून बलाढ्य राष्ट्रेंहि हिंदुस्थानाविषयीं जगाचें मत कलुषित व्हावें म्हणून काय खटाटोप करतात, हें सर्वांच्या निदर्शनास आलें आहे. अर्थात् या कारवाईमुळे हिंदुस्थानची तरफदारी करणाऱ्या प्रचारकांची नेमणूक करणें, अत्यावश्यक आहे, असें परदेशनिवासाचा अनुभव घेतलेले सुभाषबाबूसारखे देशभक्त आता आग्रहाने सांगत आहेत !

## हिंदु-मुसलमांनाचा प्रश्न.

हिंदुमुसलमान दंग्याचे वेळीं टिळकांनी हिंदूंची बाजू फार चांगल्या रीतीने उचलून धरली. हिंदुपक्षाचे जरी ते पुढारी असले, तरी राष्ट्रीय हितासाठी मुसलमानांशीं समेट करण्यास ते केव्हांहि तयार असत. पण सार्वत्रिक हितासाठीसुध्दा एखाद्या जातीला शेफारून ठेवण्यास त्यांची कबुली नसे. लखनौचा करार त्यांनी किती धोरणाने घडवून आणला, हें पाहिलें म्हणजे त्यांच्या दूरदर्शीपणाबद्दल अत्यंत कौतुक वाटतें. हिंदु-मुसलमान प्रश्नासंबंधी एकंदर पूर्वेतिहासाचा विचार करून त्यांनी जें मत ठरविलें होतें, तें किती बिनचूक होतें, हें सद्यः-स्थितीवरून सहज लक्षांत येईल. त्यांनी त्यावेळीं या विषयाबद्दल दिलेला इषारा आजहि हिंदुसमाजाला बोधप्रद होईल. लोकमान्य लिहितातः- " आमच्यांपैकी कांही मंडळी अशी

आहेत कीं, मुसलमानांनी कितीहि आगळिकी केल्या तरी भावी परिणामावर नजर देऊन, बंधुत्वाचे नात्याने आम्हीं त्यांस आलिंगन द्यावें, आणि क्षमा व शांति हे ब्रम्हगुण प्रकट करावे, असें ते प्रतिपादन करीत असतात. आजची स्थिती लक्षांत आणतां हा पक्ष आम्हांस बिलकुल मान्य नाही; इतकेंच नव्हे तर सरकारनें तो मान्य करूं नये, अशी आमची समजूत आहे."

## कसोटीचा प्रसंग.

त्यांच्या मुत्सद्देगिरीच्या कसोटीचा प्रसंग १९१४ सालीं ते सुटून आल्यावर आला. त्यावेळीं राष्ट्रीय पक्षानें कोणतें धोरण स्वीकारावें हा फार वादग्रस्त प्रश्न होता. सहा वर्षांच्या दीर्घकालांत राजकीय चळवळ लुप्तप्राय झाली असल्यामुळे ती पुन्हा सुरू करणें अवश्य होतें. युरोपांत महायुध्दाचा वणवा नुकताच पेटला होता. अशा बिकट परिस्थितींत लोकपक्षाची घडी नीट बसवून राजकारणाचा गाडा नेटाने चालविण्यासाठी त्यांनी राजनिष्ठेचा जाहीरनामा काढला. या त्यांच्या दर्शनी पिछेहाटीबद्दल त्यांचे कित्येक भक्तहि नाखूष झाले! पण टिळकांचें धोरणच शेवटीं यशस्वी ठरलें. महायुध्दांत सरकारला मदत करण्याची टिळकांनी तयारी दाखविली. पण ती एका अटीवर. निदान सैन्यांतील कमिशण्ड ऑफिसरच्या जागा मिळतील, असें सरकारकडून आश्वासन मिळालें तर. या बाबतींत श्री. दा. वि. गोखले यांनी एक मजेदार आठवण दिली आहे. सैन्यभरतीचे बाबतींत सरकारी धोरणाबद्दल महात्माजी व लोकमान्य यांचा मतभेद होता. म. गांधी म्हणत, 'मदत करावी व सरकार या जागा तरी निदान खास देईल.' 'सरकार आश्वासन देण्यास तयार असलें तर मी खास ५००० पांच हजार सैन्य महाराष्ट्रांत उभें करतों. आपण वरील प्रकारचें आश्वासन सरकारकडून आणवावें' असें लोकमान्य म्हणाले. 'सैन्य इतकें जमणें शक्य नाहीं. सरकार आश्वासन मात्र खास देईल' असें महात्माजी म्हणाले. त्याबरोबर लोकमान्यांनी त्यांना सांगितलें कीं, "ठीक आहे. आपण आश्वासन मिळवा. मी सैन्य देतों. व सैन्य उभारणें शक्य झालें नाही, तर प्रत्येक शिपायाकरितां सरकार दहा रुपये खर्च करतें, त्याप्रमाणे ५००० करितां ५०००० पन्नास हजार रुपये आपल्याजवळ जामिनकी ठेवतों; आपण तो

हक्क मिळवून द्या. ” म. गांधी उठून गेले व लोकमान्यांनी त्याच दिवशीं सायंकाळीं ५०,००० रुपयांची डिपॉझिट रिसीट त्यांच्याकडे पाठवून दिली. सरकारनें असें आश्वासन देण्याचें नाकबूल केलें ही गोष्ट सुप्रसिध्द आहे !

याप्रमाणे आपल्या अचाट बुद्धिसामर्थ्यानें व लोकोत्तर धैर्यानें त्यांनी अनेक बिकट प्रसंगांतून हिंदीराष्ट्राला वांचविलें.‘राज्यकारभार हा कांही नेहमी उदात्त तत्त्वांच्या जोरावर चालत नसतो. आणि राजकारणांत मुत्सद्देगिरीचा अवलंब करणें म्हणजे असत्याचा अवलंब करणें नव्हे. ’ असें त्यांचें तत्त्वज्ञान होतें. अलौकिक भाग्यामुळे त्यांच्या लोकप्रियतेला कधींहि ओहोटी लागली नाही. स्वपक्षाचें कमींत कमी नुकसान होऊन शत्रुपक्षाचें अपरंपार नुकसान व्हावें असें त्यांचें धोरण असे. त्यांच्या दीर्घकालीन राष्ट्रकार्याकडे व त्यात मिळविलेल्या मुत्सद्दीपणाकडे लक्ष देतां कवि गोविंदानें लिहिलेल्या खालील ओळी सार्थ वाटतात.

‘ कार्यकुशलता, नीतिचतुरता श्रीहरिची जन्मते ॥
टिळकमिषें । श्रीहरिची जन्मते ।
विघ्नांशीं झुंजते, मांडिते, डावावरि डाव ते ’ ॥

मुत्सद्दीपणांत श्रीकृष्णचरित्राशीं साम्य पावणाऱ्या राष्ट्रनौकेच्या या कुशल कर्णधारास त्याच्या पुण्यतिथीनिमित्त शतशः सादर अभिवादन करून वाचकांची रजा घेतों. ( केसरी. ३ आगष्ट १९३४ )

# अभ्यर्थना.

[ ले. वि. वि. भागवत. ]

गायनाची मला माहिती नाही. व माझा आवाजहि मधुर नाही. नाहीतर माझ्या मनाची ही तळमळ मी सुरेल गायनांत व्यक्त केली असती. काट्याचें दुःख कमी होण्यासाठी बुल्बुलानें प्रथम गाणें गाइलें. त्या गायनाने त्याचें दुःख कमी झालेंच व मनहि अनिर्वचनीय आनंदांत तल्लीन झालें. त्यालाच त्याचें गाणें फार आवडलें. दुसऱ्या दिवशीं तो पुन्हां गाऊं लागला. पण आत्यंतिक शारिरिक वेदनामुळे उत्पन्न झालेले ते करुण आलाप पुन्हा येईनात. त्या करुण आलापांनी त्याच्या मनाला मोह पाडला होता. म्हणून आपलें गायन मधुर होण्यासाठी तो दररोज काटा टोचून घेऊं लागला, असा फारशी कविसंकेत आहे. पण बुल्बुलाचें अनुकरण करून गाणें गाण्याचा अट्टाहास करणें योग्य होणार नाही, याची मला जाणीव आहे.

मला वादनाचाहि नाद नाही. नाहीतर सारंगीचा किंवा मुरलीचा करुण-कोमल स्वर काढून मीं माझें मन स्वर्गीय आनंदांत मग्न करून टाकलें असतें किंवा माझ्या भावनेला संवादी असलेला राग वाजवून मी शाश्वत आनंद उपभोगिला असता. पण ती वादनपटुताहि माझे अंगीं नाही.

रंगकलेनेंहि आपला वरदहस्त माझ्या मस्तकावर ठेवलेला नाही. नाहीतर निसर्गदेवतेच्या विविध स्वरूपाचें निरीक्षण करून आलेखन करण्यांत मीं माझ्या जीविताची कृतार्थता मानली असती.

मला काव्यदेवता प्रसन्न नाही. मजजवळ स्फूर्तीचा अभाव आहे, प्रतिभेची व माझी ओळख नाही व प्रसाद तर मजपासून नेहमी लांब असतो. नाहीतर पारध्याच्या क्रौर्याने क्षुब्ध झालेल्या वाल्मिकीप्रमाणे मी माझी शोकाकुलता काव्यांत गोवून रंगून गेलों असतों.

माझ्या अपूर्णतेची मला पूर्ण जाणीव आहे. आणि म्हणून माझी भावना माझ्या समाधानासाठी मी साध्या शब्दांत व्यक्त करीत आहें. मला गायन, वादन, चित्रकला किंवा काव्यलेखन साधत नाही. म्हणून मी स्वतःला अभागी समजत नाही. कारण बालकाचे अस्फुट बोबडे बोल ऐकून आई त्याचा अर्थ लावते व त्या बोलांचें कौतुक करते. तसेंच माझ्या हृदयाचे बोल मीं कसेहि व्यक्त केले तरी रसिकांना त्याचें मर्म कळल्याशिवाय कसें राहील?

अप्रकाशित

# हुतात्मा.

[ ले. वि. वि. भागवत. ]

आज तो तेजस्वी परमाणू अनंत आकाशांत विरून गेला. आकांक्षा अपेक्षा, भावना वासना, आकार विकार, स्थल व काल इत्यादिकांचीं बंधनें तोडून तो आज स्वतंत्र झाला.

जा. खुशाल जा. अनेक जड व निस्तेज परमाणूंमध्ये चेतना उत्पन्न करण्याचें तुझें कार्य संपलें. त्याचा उपयोग जेव्हां व्हावयाचा तेव्हां होवो. तुला त्याच्याशीं काय करावयाचें आहे ?

तुझा नाश झाला असें कित्येकांना वाटतें. व त्याबद्दल ते दुःख करतात. पण हा त्यांचा भ्रम आहे. शेतकरी भूमींत जें बी पेरतो, त्याचा कधी नाश होतो काय ?

तुझ्या स्थित्यंतराचें मर्मच त्यांना कळलें नाही. विनाश हा या सृष्टीचा एक अपरिहार्य घटक आहे, हें त्यांना मान्य आहे. तरीहि त्याच्यापासून शक्य तेवढे दूर राहण्याची ते फार खबरदारी घेतात. पण विनाशाला आव्हान देत सामोरे जाण्यांत जी मौज आहे, त्याची त्यांना कल्पनाहि सहन होत नाही.

निदान मला ती कल्पना करतां येते. म्हणून तुझ्या स्वातंत्र्यमय स्थित्यंतराबद्दल मी तुझें अभिनंदन करतों.

सह्याद्रि. फेब्रुवारी, १९३६

# पं. मोतीलाल नेहरू.

लेखकः—वि. वि. भागवत.

पं. मोतीलाल नेहरू यांचा जन्म ता. ६ मे १८६१ रोजीं झाला. त्यांच्या बालपणचे दिवस त्यांना गरिबींतच काढावे लागले. कारण पितृनिधनानंतर कांही महिन्यांनी त्यांचा जन्म झाला. पं. मोतीलाल यांनी पुढे गजान्त लक्ष्मी मिळविली. ती केवळ स्वतःच्या बुद्धिमत्तेच्या व कर्तृत्वाच्या जोरावर. वडिलार्जित संपत्तीचा पाठिंबा त्यांना मुळीच लाभला नव्हता. स्वतःच्या कर्तृत्वाविषयी आत्मविश्वास असलेल्या परंतु दारिद्र्यामुळे गांजलेल्या पुष्कळ लोकांना पंडितजींच्या चरित्रावरून आशावादाचा धडा शिकतां देण्यासारखा आहे.

पं. मोतीलाल यांना गरिबीमुळे शिक्षण अर्धवट सोडावें लागलें. विश्वविद्यालयाची पदवी मिळण्यापूर्वीच त्यांना कॉलेजला रामराम ठोकावा लागला. ते पदवीधर नव्हते, म्हणून त्यांना पुढील आयुष्यक्रमांत कसलीहि उणीव भासली नाहीं. त्यांनी आपल्या कुशाग्र बुद्धीच्या जोरावर अलोट संपत्ति व दिगंत कीर्ति मिळविली. ते स्वयंप्रकाशित तेजोभास्कर होते. विश्वविद्यालयाच्या बिरुदावलीची त्यांना काय जरूर ! खऱ्या कर्तृत्वाला पदवीच्या अक्षरांच्या मालिकेची आवश्यकता भासत नाही, जग गुणांचे चहाते आहे. यासाठी आपल्याला उच्च शिक्षणाचा लाभ नाही, म्हणून हळहळत न बसतां आपली वृत्ति व शक्ति अजमावून योग्य कार्यक्षेत्रांत निष्ठापूर्वक प्रयत्न केल्यास उत्तम यश प्राप्त होऊं शकतें, हाच बोध पंडितजींच्या चरित्रावरून निघत नाही काय ?

विश्वविद्यालयाचें शिक्षण अपुरें टाकून त्यांनी हायकोर्ट वकिलीची

परीक्षा दिली. व त्या कठीण समजल्या जाणाऱ्या परिक्षेंत पहिला नंबर व सुवर्णपदक मिळविलें. प्रथम कानपूरला पांच वर्षे वकिली केल्यावर तें कार्यक्षेत्र अपुरें वाटून ते अलाहाबाद येथे आले. त्यावेळीं सर तेजबहादूर सप्रू, पं. मदनमोहन मालवीय, पं. अयोध्यानाथ, सर अलि इमाम वगैरे बुध्दिमान् कायदेपंडित तेथे वकिली करीत होते. पण पं. मोतीलाल यांनी बुध्दिमत्ता, कायद्यांतील सूक्ष्म व समर्पक ज्ञान, प्रतिपक्षास निरुत्तर करणारा समर्पक कोटिक्रम, हजरजबाबीपणा, रुबाबदार भाषणशैली इत्यादि अलौकिक गुणांनी त्या सर्वांना मागें टाकले. व अल्पावधींतच ते अलाहाबाद हायकोर्टांतील वकिलांचे प्रमुख अग्रणी बनले. यावेळींच त्यांनी आता सुप्रसिध्द झालेल्या आनंदभवनाचा पाया घातला.

यावेळीं त्यांना पांचसहा लाखावर वार्षिक प्राप्ति होऊं लागली. कोर्टात एक दिवस काम चालविण्याबद्दल ते हजार रुपये घेत. त्यांच्याभोंवतीं जहागिरदार, बडे व्यापारी व संस्थानिक इत्यादि श्रीमान् पक्षकारांची गर्दी असे. कोणत्याहि महत्त्वाच्या खटल्यांत त्यांना एका बाजूचें वकीलपत्र हटकून मिळावयाचेंच ! कोणताहि भानगडीचा खटला ते अत्यंत कुशलतेने चालवीत. या त्यांच्या प्राविण्याबद्दल हायकोर्टानें लवकरच त्यांना ॲडव्होकेट केले.

आपल्या असामान्य कर्तृत्वानें वकिलीचा जम बसवून त्यांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात केली. पण हा त्यांच्या वैभवाचा केवळ अरुणोदय होत होता. त्यांनी भारतवर्षाला दोन बहुमोल देणग्या दिल्या. या दोन देणग्या त्यांना या उदयकालांतच प्राप्त झाल्या. पहिली त्यांनी स्वकष्टाने मिळविली व दुसरी त्यांना परमेश्वरकृपेने प्राप्त झाली. या दोन देणग्या सुप्रसिध्दच आहेत. पहिली "आनंदभवन" व दुसरी त्यांचे एकुलते एक पुत्र **पं. जवाहरलाल**. पं. जवाहरलाल यांचा जन्म ता. १४ नोव्हेंबर १८८९ रोजीं झाला आहे.

पं. मोतीलाल यांनी वयाच्या ५९ व्या वर्षापर्यंत वकिली केली. त्या कालांत त्यांनी लाखों रुपये मिळविले. मोठमोठ्या राजामहाराजांना हेवा वाटावा, असे त्यांचें वैभव होतें. त्यांचा 'आनंदभवन' अनेक प्रकारच्या

उपभोगाच्या साधनांनी समृद्ध असे. गव्हर्नरांसारखे बडे प्रांताधिकारी त्यांचे मित्र असत. मेजवान्या, नाचरंग, शिकारीचा शोक, परदेश पर्यटन इत्यादि अनेक विलासांत त्यांनी आपलें आयुष्य सुखाने घालविलें. पं. जवाहरलाल नेहरूंचा लग्नसमारंभ त्यांनी आपल्या ऐश्वर्याला साजेल अशा अपूर्व थाटाने केला. पण त्यांच्या वैभवाची कला एवढ्याने पूर्ण होणार नव्हती. त्यांच्या ऐहिक वैभवाला देशभक्तीची जोड मिळाली नसती, तर त्यांच्या चरित्राला इतकी आकर्षकता लाभली असती काय ?

पं. मोतीलाल ऐहिक सुखोपभोगाच्या मोहनिद्रेंत आनंदाने मग्न झाले होते. त्या गाढ निद्रेंत अनेक गोड स्वप्नें त्यांना पडत होतीं. वकिलींत मिळणाऱ्या अलोट संपत्तीवर नानाप्रकारचे सुखोपभोग घ्यावे, गव्हर्नर व्हॉइसरॉयसारख्या बड्या सरकारी अधिकाऱ्यांचें आतिथ्य करावें, त्यांची प्रतिआमंत्रणें स्वीकारावीं, नेमस्तपणें राजकारण करावें, आपल्या कुशाग्रबुद्धीने प्रतिपक्षाच्या पुराव्याचीं वर्मे बाहेर काढून त्याला 'दे माय धरणी ठाय' करण्यांतच बुद्धिमत्तेचा प्रकर्ष मानावा, अनेक भानगडीच्या खटल्यांत डळमळीत पक्षाची वकिली करून विजय संपादन करावा, एवढ्यांतच त्यांना आपल्या जीवनाची कृतार्थता वाटत होती.

" I slept and drempt, that life is Beauty,
I woke and found, that life is Duty. "

या कवितेच्या पूर्वार्धांतच ते यावेळपर्यंत रंगून गेले होते. पण तें स्वप्न संपलें. पंजाब प्रकरणाच्या अमानुष अत्याचारांनी त्या गोड स्वप्नाची परिसमाप्ति केली. त्या कठोर आघाताने त्यांना आढळून आलें कीं, आपण आतापर्यंत घालविल्याप्रमाणे आयुष्य हें गोड स्वप्न नाही तर तें एक पवित्र व कठोर कर्तव्य आहे.

आतापर्यंत त्यांचें चरित्र पैलू न पाडलेल्या हिऱ्याप्रमाणे किंवा वेज न पाडलेल्या मोत्याप्रमाणे होतें. संपत्ति, बुध्दिमत्ता, कायदेपांडित्य इत्यादि गुणांनी हा आयुष्याचा पूर्वार्ध मौल्यवान होता हें खरें. पण कर्तव्याच्या सहाणेवर घासलें गेल्यानंतर त्याचें मोल शतगुणित झालें. सन१९१९ते१९३१ हा कालखंड त्यांच्या आयुष्यांतून वगळल्यास या विधानाच्या सत्यतेची

प्रचीति येईल. वर वर्णन केलेले असामान्य गुण ज्यावेळीं व्यक्तिविशेषापेक्षा सर्व देशाच्या उपयोगीं पडूं लागले, एखाद्या तालुकदाराऐवजी अखिल भारताची जगाच्या न्यायमंदिरांत जेव्हां ते वकिली करूं लागले, गव्हर्नरसाहेबांचें मित्रत्व स्वीकारून त्यांचें आतिथ्य करण्याऐवजी ते जेव्हां त्यांचे प्रतिस्पर्धी बनून सरकारच्या अन्यायी धोरणाचा प्रतिकार करूं लागले, त्याच वेळीं भारतभूमीचे कंठमणी होण्याचा मान त्यांना मिळाला !

अलौकिक भोग व असामान्य त्याग यांचें मधुर मीलन पं. मोतीलाल यांच्या चरित्रांत झालेलें आहे. हिरव्यागार पर्णासह असलेलें गुलाबाचें फूल ज्याप्रमाणे अधिक खुलून दिसतें, तसेंच त्यांच्या लोकोत्तर वैभवानंतर त्यांनी केलेला विलक्षण स्वार्थत्याग उत्कटपणे दृष्टींत भरतो. आतांपर्यंतच्या त्यांच्या चरित्राला गुलाबाचें सौंदर्य होतें. त्याच्या प्रत्येक पाकळीचा नाजूक रंग मनोहर होता. त्या पाकळ्यांचीं कौशल्यपूर्ण रचना कौतुकास्पद होती. पण विलासाच्या रंगाची मोहक छटा असलेल्या या पुष्पाला उदात्त देशभक्तीचा दिव्य सुगंध नव्हता. तो महात्मा गांधींच्या प्रेरणेमुळे उत्पन्न झाला. त्यांच्या उदात्त देशभक्तीमुळे आज त्यांच्या कीर्तिपरिमलाने अखिल भारताचें वातावरण दरवळून गेलें आहे !

या अभ्दुत परिवर्तनानें त्यांच्या चरित्राला फारच तेजस्वी स्वरूप प्राप्त झालें आहे. या परिवर्तनांत विद्युल्लतेची चमक, ज्वालामुखीचा स्फोट व समुद्रावरील प्रचंड वादळाने निर्माण होणारी विलक्षण खळबळ आहे. पण ही लोकोत्तर क्रांति त्यांनी आपल्या निग्रही स्वभावाने आत्मसात् करून टाकली. त्यांचे पाणीदार नेत्र ज्याप्रमाणे बुध्दिमत्ता व मुत्सद्दीपणा यांचे निदर्शक आहेत, त्याचप्रमाणे त्यांच्या ओंठाची ठेवण ही करारीपणाची व अहंभावाची साक्ष पटविते. एखादी गोष्ट हातीं घेतल्यावर ती आपलें सर्वस्व वेंचून सिध्दीस न्यावयाची, असा त्यांचा बाणा असे. १९२० सालीं असहकारितेचा स्वीकार केल्यावर हजारों रुपयांच्या प्रातीवर त्यांनी लाथ मारली. परदेशी तलम वस्त्रांचा त्याग करून जाडीभरडी खादी परिधान केली व संयुक्त प्रांतांतील चळवळीला आपल्या कुशल नेतृत्वाखाली इतकें उग्र स्वरूप प्राप्त करून दिलें कीं, त्यांना पकडून तुरुंगांत टाकण्याशिवाय सरकारला गत्यंतर उरलें नाही. गतवर्षी लाहोरच्या कॉंग्रेसनें स्वातंत्र्याच्या ध्येयाचा पुकारा केल्याव

र झालेल्या कायदेभंगाच्या शांति–संग्रामांत पं. नेहरू यांच्या सर्व कुटुंबीयांनी केलेला निरुपम त्याग सर्वांच्या स्मरणांत ताजा आहे. त्या प्रखर संग्रामांत उडी घेतांना या वृध्द देशभक्ताने खाली वर्णन केल्याप्रमाणे परमेश्वराची प्रार्थना केली असली पाहिजे—

" God we enter our last fight
Thou dost know our cause is right.
Make us march now in thy light
On to Victory !
Let us not thy wrath deserve
In the sacred cause we serve.
Let us not from danger swerve
Teach us how to die ! "

या प्रार्थनापूर्तीसाठी त्यांनी आपल्या जरा–जर्जर देहाचा, प्राणप्रिय पुत्राचा, कमलादेवीच्या कोमल देहलतेचा, घरादाराचा, किंबहुना सर्वस्वाचा बळी भारत मातेच्या स्वातंत्र्यार्थ मोठ्या आनंदाने अर्पण केला !

१९१९ते१९३१ हा त्यांच्या तपश्चर्येचा, देशसेवेचा व सर्वस्वत्यागाचा काल होय. या कालांतील अनेक गोष्टी विचार करण्यासारख्या आहेत. कौन्सिल बहिष्काराच्या बाबतींत म. गांधीशीं मतभेद झाल्याबरोबर त्यांनी स्वराज्यपक्ष स्थापण्याच्या कामीं देशबंधु दासांना साहाय्य केलें. असेंब्लींत स्वराज्यपक्षाचें पुढारीपण स्वीकारून आपल्या संघटनाचातुर्याने सरकारचा अनेक वेळां पराभव केला. लोकहितविघातक ठराव हाणून पाडले. विशेष म्हणजे सरकारपक्षाचें आव्हान स्वीकारून " नेहरू रिपोर्ट " म्हणून प्रसिद्धी पावलेली " हिंदी लोकांच्या स्वराज्याची रूपरेषा " तयार केली. त्या रिपोर्टा-वरून त्यांच्या सूक्ष्म, समतोल, व सर्वग्राही बुध्दीची, अनेक गुंतागुंतीच्या प्रश्नाचा समन्वय लावण्याच्या हातोटीची व अश्रांत परिश्रमाची कल्पना येईल. पण आश्चर्याची गोष्ट ही कीं, स्वातंत्र्याची घोषणा करण्याची राष्ट्राची तयारी दिसतांच इतक्या मेहेनतीने केलेला रिपोर्ट किंचितुहि दुःख न करतां

त्यांनी बाजूला सारला ! राष्ट्राच्या प्रगतिपर महत्त्वाकांक्षेला पायबंद घालण्याचा प्रयत्न त्यांनी केला नाही !

आजपर्यंत झालेल्या अखिल भारतीय पुढाऱ्यांत पं. मोतीलाल नेहरू हे सर्वांत भाग्यशाली होते, यांत शंका नाही. कारण मानवाने इच्छिलेलें, पण त्याला अप्राप्य असलेलें प्रत्येक सुख पंडितजींच्या पायाशीं लोळण घेत होतें. संपत्ति, संतति, सौंदर्य, सत्ता, विद्वत्ता, वैभव व कीर्ति हीं एकेक निराळी प्राप्त झालीं तरी सुखाचें साधन म्हणून मानण्यांत येतें. मग त्या सर्वांचा यथायोग्य व इच्छिलेल्या वेळीं ज्याला लाभ झाला, त्याच्या सुखाचें वर्णन काय करावें ? संपत्ति असते तेथे संतति नसते, किंवा तेथे सरस्वती वास करीत नाही, असाच अनुभव आपण जगांत नेहमी पाहतों. पण त्यांच्या भाग्याने सर्व अलौकिक आणि निसर्गभिन्न गुणांना एकत्र आणलें. त्यांच्या संकटकालींहि—बंदिवासांत—सुखाचीं साधनें आपण होऊन त्यांच्या पाठोपाठ जात. व बंदिशालेच्या कोठडीलाहि रम्य स्वरूप प्राप्त होत असे. कॉंग्रेसच्या अध्यक्षाची अत्यंत जबाबदारीची व बहुमानाची जागा त्यांना दोनदां मिळाली. यांत त्यांच्या गुणांचाच गौरव झाला. पण आपण उतरलेला राष्ट्रसभापतीचा मुकुट आपल्या पुत्राच्या मस्तकावर घालण्याचें अतुल भाग्य विशेषतः या लोकशाहीच्या कालांत ज्याला लाभलें त्याच्या भाग्याला सीमा नाही असेंच म्हटलें पाहिजे ! शिवाय आपला भाग्य—भानू परमोत्कर्षाच्या बिंदूला क्षणभर थांबला असतांना तो खालीं कलण्यापूर्वीच व पं. जवाहिरलाल सारखा राष्ट्रनेता पुत्र, म. गांधीसारखा जगद्वंद्य मित्र, पत्नी, स्नुषा, कन्या, जामात व प्रेमळ नात इत्यादि आप्तस्वकीय निकट असतांना, व सर्व राष्ट्रचें राष्ट्र आपल्या प्रकृतीविषयी सामुदायिक प्रार्थना अंतःकरणपूर्वक करीत असतां ज्यांना मृत्यूहि लाभला, त्यांच्या भाग्याचें शब्दांनी वर्णन करणें अशक्य आहे !

या जगांत अत्युच्च पदावर विराजमान असतां मरण येणें हें अपूर्व पूर्वपुण्याईचें फळ असतें असें आम्हांला वाटतें. कारण एखाद्याला कीर्तिशैलाच्या शिखरावर चढवून नंतर त्याला अवमानाच्या व विस्मृतीच्या खोल दरींत फेंकून देण्यांत या जगाच्या सूत्रधाराला मोठी मौज वाटत असावी

असें जगाच्या इतिहासावरून दिसतें. चक्रवर्ती नेपोलिअनचें उदाहरण पाहा! टुलरीजच्या भव्य राजवाड्यांत नंदनवनासारखीं सुखें भोगणारा हा मानवेंद्र आयुष्याच्या अखेरीला सेंट हेलीना बेटांतील एक सामान्य बंदिवान् झाला! स्वदेश व स्वजन शेंकडों कोस दूर राहिले; पण सर्व युरोपखंडहि ज्याच्या भव्य महत्त्वाकांक्षेला व विजेसारख्या भरारीला अपुरा वाटला, त्याला एका निर्जन बेटाच्या टीचभर बंदिशाळेच्या कोठडींतील एकांतवास किती दुःसह झाला असेल! लो. टिळकांनी आपल्या आयुष्यांत अनेक संकटें व दुःखें सोसलीं. पण त्यांच्या असामान्य लोकप्रियतेला कधीहि आहोटी लागली नाही. त्यांची मान्यता मृत्यूच्या वेळेपर्यंत तुफान सागराच्या पर्वतप्राय लाटे-प्रमाणें आकाशाशीं स्पर्धा करीत होती! या भाग्यशाली पुढाऱ्यानें आपल्या आयुष्याची अखेरी जिंकली यांत शंका नाही!

गंगा, यमुना व सरस्वतीच्या त्रिवेणीसंगमावर असलेल्या प्रयागच्या पवित्र क्षेत्रांतील या विख्यात राजर्षीच्या जीवनांत लक्ष्मी, सरस्वती व देश-भक्ति या तीन गुणांचा संगम घडून यावा हा योग अपूर्व होय! आपल्या उत्पन्नावरील तीस हजार रुपयांचा कर देण्याचें नाकारून पूर्वीपेक्षाहि महान् त्याग करण्याची त्यांची इच्छा होती. त्यांच्याविषयी लोकांनी केलेल्या अपेक्षेपेक्षाहि त्यांची उडी नेहमी मोठी असे. तप, त्याग व देशसेवा या तीन शब्दांतच त्यांच्या विजयी जीवनाचें रहस्य सांठविलें आहे, हें सूज्ञ वाचकांस वेगळें सांगावयास पाहिजे काय?

प्रबोध. ता. १५।३।१९३१.

# पहिला परोपकार.

[ ले. वि. वि. भागवत. ]

सदाशिव पेठेंतील आपल्या दिवाणखान्यांत डॉ. सुधाकर आपल्या लाडक्या कुसूमबरोबर गप्पा मारीत होते. रात्रीं ८–८।।चा सुमार होता. भोजनोत्तर सुपारी खात डॉक्टरसाहेब आरामखुर्चीवर पहुडले होते. दिवाणखाना चांगला प्रशस्त होता. त्यांतील खुर्च्या, टेबलें, बाकें, कपाटें, चित्रें, कॅलेंडरें, औषधाच्या सचित्र जाहिराती वगैरे सर्व सामान अगदी टापटिपीने ठेवलें होतें. कपाटांतील औषधांच्या बाटल्यांची मांडणी आकर्षक होती. सर्व फर्निचर सुबक घडणीचें असून पॉलिश दिलेलें होतें. दिवाणखान्यांतील एकंदर सामानावरून व त्याच्या सुंदर मांडणीवरून डॉ. सुधाकरांची सुस्थिति व सौंदर्यासक्ति सहज लक्षांत येत असे.

डॉ. सुधाकरांना प्रॅक्टीस सुरू करून पांच सहा वर्षांच्यावर अवधि लोटला नव्हता. पण आपल्या नियमितपणाने, गोड बोलण्याने, काळजीपूर्वक काम करण्याने, हंसतमुख चेहऱ्याने व चेष्टेखोर स्वभावाने ते सर्वांना प्रिय झाले होते. त्यांच्या हाताला गुणहि चांगला असे. आपला धंदा यशस्वी होण्यासाठी आधुनिक युगांत अवश्य असणाऱ्या सर्व साधनांचा त्यांनी चांगला उपयोग करून घेतला होता. श्रीमंत गिऱ्हाइकांना खूष कसें ठेवावयाचें, याची कला ते चांगली जाणत. त्यांच्या नेहमीच्या बोलण्यांत आत्मस्तुतीची झालर इतकी बेमालूम लावलेली असे कीं, ऐकणाऱ्यांवर त्याचा इष्ट परिणाम झाल्याविना राहत नसे. त्याचबरोबर इतर डॉक्टरांचीं व्यगें ते इतक्या गमतीने गोंवून देत कीं, आपण इतरांची प्रच्छन्न निंदा ऐकतों आहों असें ऐकणाराला कधीच वाटत नसे.

जग भपक्याला भुलतें, गोड बोलण्याला भाळतें, स्तुतीला वश होतें, हें मर्म त्यांनी चांगलें ओळखलें होतें. त्यामुळे त्यांचा धंदा हल्लीच्या मंदीच्या दिवसांतसुद्धां जोरांत चालला होता. त्यांनी आपल्या दवाखान्याची एक शाखा कँपमध्ये नुकतीच सुरू केली होती. व सायकलऐवजी मोटारसायकल त्यांच्या घरीं आली होती.

डॉ. सुधाकरांची कुसुम भारी खेळकर, चपल व बडबडी पोर. आपल्या दादांना नाना प्रकारचे प्रश्न विचारून ती अगदी भंडावून सोडीत असे.

" दादा ! आतां मला तिचाकीवर चांगलं बसतां येतं बरं कां ! मी गेनूला बरोबर घेऊन हौदापर्यंत जाऊन येतें आतां. पण दादा, शेजारच्या मुकुंदला आणली तशी दुचाकी तुम्ही मला कधी आणणार ? मला भारी हौस आहे त्या दुचाकीची. तशा सायकलवर बसून मला खूप लांब जातां येईल."

" माझी शहाणी पोर ती." डॉ. साहेब कुसुमला कुरवाळून म्हणाले. " तूं जरा मोठी हो. इंग्रजी शिकायला लाग, म्हणजे घेईन हो !"

" दादा ! आज संध्याकाळीं तो म्हातारा तुमची किती वेळ तरी वाट पाहत होता. मी त्याच्याशीं किती वेळ तरी बोलत होतें. त्यानें कितीतरी गमतीच्या गोष्टी सांगितल्या. किनी त्याची नात माझ्याएवढीच आहे. माझ्यासारखाच खेळ आहे तिच्याजवळ. पण तिची चूल बोळकीं सगळीं मातीचीं आहेत. माझ्या सारखीं रंगीत नाही कांही ! आणि माझा कपबशांचा सेट आहे ना, तसाहि तिच्याजवळ नाही. मीं बोलावली आहें तिला मजजवळ चूलचूल खेळायला. पण तो म्हणाला, " तिला ' मांदगी ' झाली आहे. ' मांदगी ' म्हणजे हो काय दादा ?"

" अग ती आजारी आहे. तिला ताप येतो आहे."

" मग तुम्ही त्या म्हाताऱ्यावर रागावलात कां हो ! त्याला हाकलून कां हो दिलंत ? तो आतां पुन्हा येणार नाही कां हो !"

" अग त्या नातीला औषध घेण्यासाठी तो आला होता. पण त्यानें पैसे नव्हते आणले. म्हणून दिला घालवून."

" मग तो रुपये आणायला गेला होय ? पण दादा तो तुम्हांला व्हिजिटला नेत होता ना ? तुम्ही कां नाही हो गेला ? म्हंजे मीहि आलें असतें तुमच्या बरोबर. त्या मुलीला कपबशा दाखवण्याचं कबूल केलं आहे मी त्याला. दादा, उद्या जाऊं आपण त्याच्या घरीं. तुम्ही तिला लवकर बरं करा बरं कां ! "

" अग पोरी, पण पैसे कुठं आहेत त्याच्याजवळ ? "

" नसेनात ! आपल्याला काय करायचे पैसे ? खेळ आणि खाऊ असला म्हंजे झालं ! "

" अग पण तुला दुचाकी आणायची ना ? "

" होय. "

" मग दुचाकी विकत घ्यायला पैसे नकोत कां ? म्हणून तर मी त्याच्याजवळ पैसे मागतों आहें. " कुसुमला जरा विचार पडला. मग थोड्या वेळाने ती म्हणाली, " दादा, मला दुचाकी नसली तरी चालेल. पण त्या मुलीला आपण खेळायला घरीं घेऊन येऊं या. आपल्याकडे आली म्हणजे ती आत्तां बरी होईल ! "

" बाळ, किती बडबड करशील. नीज जा आतां. नऊ वाजले बघ. "

कुसुमवर डॉक्टरांचा फार जीव. तिच्या आधीचीं एक दोन मुलें अकालीं वारल्यामुळे तिचा त्यांना विशेष लळा होता. ती पोरगी होतीच तशी गोड. ५।६ वर्षांची असली तरी भारी चौकस व बडबडी. त्यामुळे सर्वांनाच ती आवडे.

कुसुमला हां हां म्हणतां त्यांच्या मांडीवर झोप लागली. म्हणून त्यांनी तिला अलगत शेजारच्या बाकावर ठेवली.

कुसुम समोरच निजली असल्याने तिच्याविषयीच त्यांचे विचार चालले होते. तिची कोणतीहि हौस पुरविण्याला डॉक्टर कधीहि मागे घेत नसत. तिच्याविषयी त्यांच्या मनांत केवढी तरी मनोराज्यें चालत असत. हिला आपण पुष्कळ शिकवूं. व तिला डॉक्टर करूं. आज तिला सायकलची इच्छा आहे. मोठेपणीं तिला मोटारची हौस वाटणारच. तिला स्वरूपाची देणगी आहेच. पण एखादा आय्. सी. एस्. पटकवण्याला नुसतं सौंदर्य

किंवा शिक्षण उपयोगी पडत नाही. तर त्याला हुंडा देण्याला पैशाचं पाठबळ लागतं. तेवढी ऐपत यायला सपाटून पैसा मिळवला पाहिजे. बस् बस्. पोरी तुला खूप सुखांत ठेवायची.

पण या बेटीची आवड काय विचित्र आहे ? मी तिला शंभरदा सुचवितों कीं, माझ्याकडे येणाऱ्या पेशंटांशीं तूं फार सलगी करूं नको. तरी ती कांही ऐकत नाही. त्या म्हाताऱ्याला मी आज हाकलून दिला. लागलं पोरीच्या मनाला वाईट. आणि म्हणतें काय कीं, त्याच्या घरीं आपण जाऊं. पण तिच्या हट्टापुढें कांही सोय नाही. बाकी ती म्हणते तें कांही अगदीच खोटं नाही. मी श्रीमंत गिऱ्हाइकांशीं जितक्या काळजीने व प्रेमाने बोलतों, तितका साधारण मध्यम गरीब लोकांशीं हल्ली बोलेनासा झालों आहें. उगीच शिंचे गयावया करतात. आमचे प्रोफेसर म्हणत तेंच खरं. आधी पैसा मग परीक्षा. आपल्या ज्ञानाचा मोबदला सपाटून मिळवला पाहिजे. सगळेच पेशंटस् पैसा नसल्याचें नुसतें सोंग करतात. पैसे नाहीत तर धर्मार्थ दवाखाने मोकळे आहेत त्यांना. त्या डॉक्टर काळोख्याची लोक उगीचच मजपुढें प्रशंसा करतात. गरिबांचा कनवाळू झाला आहे तो. अशा लोकांनीच आमच्या धंद्याची खराबी केली आहे !

अशा तऱ्हेने त्यांच्या मनांत विचार चालला होता. सिगारेट पेटवून तिचा आस्वाद घेत त्यांचे विचार चालू होते. इतक्यांत त्यांनी आपले कान टवकारले. लांबून कसला तरी गलका ऐकूं येऊं लागला. प्रथम त्यांना कांहीच उमगेना. पण पुढे तो गलका अधिक स्पष्ट येऊं लागला. सदाशिव हौदापासून लकडीपुलापर्यंतचा सर्व प्रांत भयभीत करून सोडणारा तो कोलाहल ऐकून डॉक्टरसाहेबांच्या विचारचक्राला उलटी गति मिळाली. तो गलका " राम बोलो, भाई राम " चा होता. पुण्यास ही विचित्र व भयानक पद्धत रात्रींच्या वेळीं किती त्रासदायक होते, याचें वर्णन करण्याचें कारण नाही.

त्या रात्रींच्या शांत वातावरणांतील मृत्यूच्या अधिराज्याची द्वाही फिरवणारा भयंकर कोलाहल ऐकून तोंडाच्या फुंकराने पत्त्यांचा बंगला कोलमडून पडावा तसा डॉक्टरांच्या मनोराज्यांतील कुसुमच्या भावी आयुष्याचा मंगल प्रासाद कोलमडून पडला. मृत्यु आपले कराल जबडे पसरून आपल्या पुढे उभा आहे, असा त्यांना भास झाला ! मृत्यु ! त्यांचें हृदय दुभंगून गेलें.

कुसुमचीं वडील भांवडें ज्याप्रमाणे त्या दुष्ट कालाच्या अकालीं भक्ष्य-स्थानीं पडलीं, तशी ही गोड पोरहि पडली तर ? डॉक्टरांचा जीव या भेसूर विचारांनी अगदी कासावीस झाला. त्यांच्या हृदयाचें काठिण्य क्षणमात्र पार नाहीसें झालें. आपण पैशासाठी गरीब लोकांना फार नाडतो, त्यांचे शाप आपल्याला गांजणार तर नाहीत ना ? त्यांच्या दुःखार्त हृदयांतून संतापाच्या ज्वालामुखीचा जो स्फोट होतो, त्याच्या लाव्हा रसांत आपल्या कुसुम-कोमल कन्येचा बळी पडणार नाही ना ? छे ! दीन दुबळ्यांना अडविण्यांत आपली भयंकर चूक होतें आहे !

इतक्यांत दारांत कोणाची तरी छाया पडली. " डॉक्टर साहेब ! हे रुपये आणले बघा. आता अगदी बिगी बिगी चला. माझ्या पोरीची काय दशा झाली असेल देवाला माहीत ! पैसे शोधायला गेलों तो इतका वेळ होऊन गेला. सांजपासून भटकतों आहें, पण पैसा हाताला लागेना. " म्हाताऱ्याच्या डोळ्यांतून अश्रु येऊं लागले.

डॉक्टर त्याच्याजवळ गेले व प्रेमाने त्याच्या खांद्यावर हात ठेऊन म्हणाले, " असूं दे पैसे तुजजवळ. तुझ्या पोरीला पथ्यापाण्याला उपयोगा पडतील. आणि घाबरूं नकोस. तुझ्या पोरीला काळाच्याहि तोंडून ओढून काढूं. चल. मी माझी मोटारसायकल बाहेर काढतों. "

डॉक्टरांचे ते शब्द अगदी अनपेक्षित होते. आपण स्वप्नांत तर नाही ना असें म्हाताऱ्याला वाटलें. तो आ वासून डॉक्टरांकडे पाहतच राहिला. कृतज्ञतेने त्याच्या तोंडांतून शब्दहि बाहेर पडेना. त्याच्या डोळ्यांतून आनंदाश्रू वाहूं लागले.

डॉक्टरांनी केलेला पहिला परोपकार होता तो !

सह्याद्रि,
मे १९३७

# रौप्य तुलादान.

लेखकः—वि. प. भागवत.

शतेषु जायते शूरः सहस्रेषु च पण्डितः ।
वक्ता दशसहस्रेषु दाता भवति वा न वा ॥

"कां हो ! दानशूर केशव विष्णु गोखले यांनी रौप्यतुला करून तें द्रव्य पुण्याच्या अनाथ विद्यार्थीगृहास श्रीराममंदिराकरतां दिलें, त्यापेक्षा गुप्त दान कां नाही दिलें ? किंवा तुलासमारंभाचा खर्च व खटाटोप न करतां नुसतेच पंचवीसशें रुपये दिले असते, तर चाललें नसतें कां ? " 'केसरी' च्या ताज्या अंकांतील तुलासमारंभाच्या चित्रास अनुलक्षून बापूंनी आपल्या संभाषणाचा रोख तिकडे वळविला.

संभाषणास चांगला विषय पाहिजेच होता. म्हणून 'केसरी' बाजूला टाकून त्याच विषयाचा परामर्ष घेण्याचें मीं ठरविलें.

"हजारों लोकांसमक्ष गाजावाजा करून तुला केली व स्वस्त झालेली चांदी दान केली, यांत काय विशेष ? असें तुम्ही म्हणतां. तुम्ही म्हणतां तसें पाहण्याचा एक दृष्टिकोण आहे. पण ती दृष्टि मानवस्वभावाच्या छिद्रान्वेषी बुद्धीचें द्योतक आहे, असें मला वाटतें. शिवाय गुप्त दान दिलें तरी दात्याच्या नांवाचा डांगोरा जो तो आपल्या माहितीप्रमाणे पिटतच असतो. जनतेच्या चिकित्सक जिज्ञासेमुळे उत्पन्न होणाऱ्या विपर्यासापेक्षा जाहीर रीतीनें दान देणें इष्ट नाही काय ? "

"म्हणूनच केवळ आंकडा जाहीर करून देणगी द्यावी असें मी म्हणेन. पण तुलासमारंभाचा खटाटोप करून दान देण्याचें प्रदर्शन कशाला ? "

"गेल्या महिन्यांतील स्वामी अभंगानंदांचीं प्रवचनें आपण ऐकलेलीं

दिसत नाहीत. नाहीतर असा प्रश्नच आपण विचारला नसता. त्यांनी ज्ञानाबद्दल फार उत्कृष्ट विवेचन केलें होतें. दानाची धार्मिक दृष्टि तुमच्यासारख्या सुधारकाच्या लक्षांत आली तरच आश्चर्य !

" स्वामी अभंगानंदांच्या विद्वत्तेबद्दल आपल्याइतकाच मलाहि आदर आहे. पण शास्त्रावरच दृष्टि ठेऊन बदललेल्या परिस्थितींत निभाव लागेल, असें मला वाटत नाही. दानाच्या धार्मिक पद्धतींवर त्यांचा विशेष कटाक्ष दिसतो. "

" थांबा. आपणांस धार्मिक दानाचें महत्त्व त्यांच्याच शब्दांत सांगितल्याशिवाय पटणार नाही. ' ज्ञानसुधा ' मासिकांत प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या प्रवचनांतील उताराच आपणांस वाचून दाखवितों. हा पहा 'ज्ञानसुधे'तील उतारा.–" आतापर्यंत दानाच्या माहात्म्याचें व दानाच्या त्रिविध प्रकारांचें, महाभारत व श्रीमद्भगवद्गीतेच्या आधारें विशदीकरण केलें. पूर्वपरंपरागत व धार्मिक दृष्टीने श्रेष्ठ असा दानाचा एक प्रकार हल्ली लुप्त झाला आहे. तो म्हणजे आपली तुला करून भारंभार द्रव्य-रौप्य किंवा सुवर्ण–दान करणें. तनमनबुद्धीच्या सतत परिश्रमाने बहुत द्रव्योपार्जन शक्य होत असल्याने आपल्या भारोभार द्रव्य दिल्यास शरीरसर्वस्व सत्कारणीं अर्पण केल्याचें थोर पुण्य लागतें. म्हणून तुलाविधि करून द्रव्य–यज्ञ करणें परम कल्याणकारक आहे. असें केल्याने आत्मकल्याण व परंपरारक्षण दोन्हीहि साधतें. आपल्या धर्माप्रमाणे तुला दोन कारणांकरतां करतात. एक व्याधि–देहपीडा–निवारणार्थ किंवा पापपरिहारार्थ. ही तुला गूळ धान्यें किंवा तांबें लोखंड इत्यादि धातूंची करतात. दुसरें म्हणजे पुण्यसंपादनार्थ सोन्यारुप्याची तुला करणें. अडीचशें वर्षांपूर्वी क्षत्रियकुलावतंस श्री छत्रपति शिवाजीमहाराज यांनी राज्यारोहण प्रसंगीं आपली सुवर्णतुला करून तें द्रव्य ब्राम्हणांस अर्पण केल्याची इतिहास साक्ष देतो. तुलादानासाठी शास्त्रांत सांगितलेले विधि यथासांग करून मंगल महोत्सवपूर्वक द्रव्यद्वारा शरीरार्पण करण्याचा मार्ग सर्वथैव युक्त आहे. "

अभंगानंदांची विचारसरणी बापूंना कितपत पटली हें त्यांच्या मुद्रेवरून सांगतां येणें कठीण होतें. पण स्वामींच्या युक्तिवादाची पुन्हा उजळणी झाल्याने माझ्या मनावर दानाच्या धार्मिक दृष्टीचा व विशेषतः तुलादानाचा पगडा बसला. " ज्ञानसुधें " तील सारांश वाचल्यावर ते कांहाचे बोलले

नाहीत. व थोड्याच वेळांत घड्याळांत दहाचे ठोके पडल्याने ते घाईघाईने घरीं निघून गेले.

× × ×

स्वामी अभंगानंदाचा मी एक भाविक श्रोता असल्यामुळे त्यांच्या प्रवचनांचा माझ्या श्रद्धाळू मनावर परिणाम झाला होताच. परंतु पुष्कळ वेळा अशी मजा होते कीं, आपणांस सामान्यतः पटलेलीं मतें संभाषणाच्या ओघांत दुसऱ्यांस पटवून देण्यासाठी ज्यावेळीं आपण आवेशाने पुढे मांडतों, त्यावेळीं तीं मतें आपल्या मनांत अधिक दृढमूल होतात. तसाच प्रकार यावेळीं झाला. श्री. गोखले यांच्या तुलासमारंभाने माझ्या मनांत आपणहि तुला करावी, असे विचार घोळूं लागले. झोपेंतसुद्धा 'मी तुला करण्यासाठी मोठ्या समारंभाने तराजूंत बसलों आहें' अशीं सुखस्वप्नें पडूं लागलीं. कल्पनेच्या मनोऱ्यावर चढून भविष्यकालांतील रम्य दृश्यें पाहण्यांत कांही काल आनंद वाटतो खरा. पण तीं दृश्यें सत्यसृष्टींत यावीं कशीं ?

शेक्सपिअर म्हणतोः—

If to do were as easy as to know what were good to do, chapels had been churches and poor mens' cottages princes' palaces!

किती यथार्थ सिद्धान्त आहे! माझी स्वतःची स्थितिहि अशीच होती. वडील लहानपणींच वारल्याने माझें बालपण व शिक्षण मातुलगृहींच झालें. लढाईपूर्वीच्या दिवसांत पीकपाण्याची सुबत्ता व राहणींत साधेपणा असल्यामुळे नोकरी करून मी वकील झालों व सध्या पोटापाण्याची काळजी माझ्या मागे नव्हती इतकेंच. पण संसारखर्च भागून फारशी शिल्लक राहत नसल्यामुळे भारी देणगी देण्याचें सामर्थ्यहि माझ्यामध्ये नव्हतेंच. या जगांत असें आढळून येतें कीं, श्री आणि सरस्वती, संपत्ति आणि संतति, इच्छा आणि अनुकूलता या, सवतीप्रमाणे एकमेकांशीं भांडत असतात. एके ठिकाणीं यावें असें त्यांना कधी वाटतच नाही. इच्छेचें व अनुकूलतेचें असेंच खडाष्टक असलेमुळे दाता क्वचित्च निर्माण होतो.

मला वकील होऊन बरींच वर्षें झाल्यामुळे गृहप्रपंच भागविण्याची तरी अडचण मला नव्हती. नाहीतर आमच्या एका विनोदी मित्रानें केलेलें 'नूतन वकिलाचें ( रड ) गाणें ' गाण्याचीच मला पाळी आली असती. समाधानासाठी त्याच ओळी मी गुणगुणूं लागलों—

पदवि मिळविली । पगडि चढविली ॥
पोटा ना अन्न । दोन्हि व्यर्थ जाहलीं ॥धृ०॥
आठ वाजले । हपिस उघडलें ॥
पक्षकार कोणि परी नाहि पातले ॥१॥
लांब कोट हा । बनविला नवा ॥
कोणी ना परि म्हणती वकिल हा हवा ॥२॥
वर्गणी चढे । पडति आकडे ॥
खाउं काय देउं काय भ्रांत ही पडे ॥३॥
कठिण मम दशा । उपजवी हशा ॥
धिंगाणा घोर असा घालि ग्रहदशा ॥४॥
जीव लोभला । बघुनि मृगजला ॥
तृष्णेने पांथ परी व्यर्थ भागला ॥५॥
तैशि मम स्थिती । नाहि त्या मिती ॥
स्पर्धेच्या साहाऱ्यामधीं खुंटली मती ॥६॥

त्या ओळी गुणगुणल्यामुळे मनाला समाधान न वाटतां तें अधिकच भडकलें. एखादी गोष्ट अशक्य आहे, असें कळूनसुद्धा नादी मनुष्य ज्याप्रमाणे तिच्याकडेच धाव घेतो, त्याप्रमाणे माझ्या मनाची स्थिति झाली. समाधानवृत्तीला अवकाश न देतां चिडून व अधिकच उसळून मी म्हणालों-" Where there is a will, there is a way " तर मग शोध तो मार्ग. जर तुझी सदिच्छा खरोखरच उत्कट असेल, तर तो मार्ग तुला सांपडलाच पाहिजे !

× × × ×

तुलेबद्दलचे माझे विचार सतत चालूं होते. परंतु द्रव्याभावीं काय योजना करावी, या विचारांत मी होतों. आजच्या मंदाईच्या दिवसांत कोणी कर्ज देईल,

असा संभव नव्हता. कर्ज फेडण्याची ऐपत असल्याशिवाय कोणता सावकार कर्ज देईल ? धान्याची स्वस्ताई ही एक मोठीच आपत्ति वाटत होती. तथापि आमची दिनचर्या मात्र कायम होती. रोजच्या चहाला अर्धचंद्र देण्यांत आला नव्हता. कोकिलाव्रताच्या उद्यापनाची गडबड जोराने चालू होती. उत्तम शेती, मध्यम व्यापार व कनिष्ठ नोकरी या म्हणीची उलटापालट करण्याची वेळ आली होती. शेतीच्या उत्पन्नांतून सारा भरण्याइतकासुद्धा पैसा वसूल होत नव्हता. मंदीमुळे व्यापारी हवालदील झाले होते. दरमहाचा पैसा रोखीने मिळवणारा नोकर सुस्थितींत होता. भारी व्याजाने सोनें गहाण टाकल्यास सर्व व्यवस्था झाली असती. पण सोनें तरी कोणत्या तोंडाने मागावयाचें ? लग्नकार्यासाठी, किंवा घर बांधण्यासाठी बायको अंगावरचें सोनें कदाचित् देऊं शकली असती. पण दागिने विकून देणगीसाठी पैसा उभारणाऱ्याला दागिने देणारी बायको भोळी तरी असली पाहिजे किंवा विलक्षण त्यागी तरी असली पाहिजे. पण नवऱ्याला तरी बायकोचे दागिने मागण्याचा काय अधिकार आहे असें मला वाटलें. तिचे दागिने मागण्याचा मला धीरच होईना.

नादी मनुष्यास आपल्या मनांतील गोष्टसुद्धा बोलून दाखविण्याची चोरी असते. व्यावहारिक गोष्ट सर्वांना पटते. पण तात्त्विक रुचत नाही, मग पटण्याची तर गोष्ट दूरच ! तुला करण्याचा माझा नाद अशांपैकींच होता.

या विवंचनेंत असतांना पंडित कृशोदरशास्त्री गणकभूषण यांचें आगमन झालें. ते मोठे विद्वान् ज्योतिषी होते. त्यांना पाहतांच माझ्या मनांत एक विलक्षण मधुर कल्पना आली. बहुमानपुरस्सर त्यांचें स्वागत करून त्यांच्यापुढे मीं माझी पत्रिका टाकली. आणि ‘ शास्त्रीबोवा, मला अलभ्य लाभाचा योग केव्हां आहे ? ’ असा प्रश्न मोठ्या आशाळभूतपणाने विचारला. माझ्या आशाळभूत चेहऱ्यावरून शास्त्रीबोवांना स्वतःलाच अलभ्य लाभाची आशा उत्पन्न झाल्यामुळे त्यांनी पत्रिकेकडे एकवेळ पाहून माझ्या भविष्यकाळांत दूरवर सूक्ष्म दृष्टीने पाहण्यासाठी किंचित् नेत्रसंकोच केला. कांही वेळ दृष्टि अंतर्मुख झाल्यामुळे त्यांचे डोळे नांवालाच उघडे होते. नंतर शुद्धीवर आल्यासारखे करून त्यांनी माझ्यापुढे ‘ अकरावा गुरु, चतुरस्समुद्र योग, उच्चीचे ग्रह, भ्रमणदशा, मालयोग, बलाबल, नवपंचमयोग ’ इत्यादि मला निरर्थक असलेल्या शब्दसमुच्चयाची विलक्षण धावपळ केली व त्या तारांबळीने उत्तेजित

झालेल्या मला, एका वर्षाच्या आंत अलभ्य लाभ असल्याचा निर्वाळा दिला. नंतर त्यांना माझ्या दोन्ही मुलांच्या पत्रिका दाखविल्याशिवाय कसें राहवेल? त्यांच्याहि पत्रिकेंतील ग्रह मला अलभ्य लाभ देण्याला अनुकूल आहेत, असें शास्त्रीबोवांनी ठासून आश्वासन दिलें. त्या आनंदाच्या भरांत भविष्य व त्याची पूर्ति यामधील अंतर एक आभास आहे, असें मला वाटलें. व त्या प्रियवादी पंडितजींना अपेक्षेबाहेर दक्षिणा देऊन मीं त्यांचा गौरव केला.

हा अलभ्य लाभ लॉटरींतच होणार अशी पंडितजींनी ग्वाही दिली असल्यामुळे विलायत, गोवा, कलकत्ता, डर्बी इत्यादि लॉटरींना आमच्या तिघांच्याहि नांवाने मीं उदार आश्रय दिला. शर्यतीच्या घोड्याप्रमाणे आमच्या कल्पनेचें वारू आशेच्या रिंगणांतून भरधाव पळत होतें. पण तें सर्वच सिद्धीच्या स्तंभाजवळ [ winning post ] जाऊन पोंचणार आहेत काय? कां निकालाच्या तारखेच्या अडथळ्यानेच ते उन्मळून पडणार आहेत?

× × ×

प्रियवाचक! आतापर्यंत तुला करण्याची उत्कंठा मला कां उत्पन्न झाली, हें सांगितलें. पण त्या दानाचा उपयोग कोणत्या प्रिय व उपयुक्त संस्थेला व्हावयाचा तें सांगितलें नाही. मला संपत्तीचें सुख फार नाही हें खरें; पण पूर्वपुण्याईने एका महापुरुषाचा सहवास मला दीर्घ काल लाभला. इतकेंच नव्हे, तर तो सहवास सुखदायकहि झाला. आपणांस आश्चर्य वाटेल. पण माझें लिहिणें सत्य आहे. तप, त्याग, प्रतिभा, श्रम-सातत्य, पावित्र्य इत्यादि गुणांत व्यास, वाल्मिकी, विश्वामित्र, पाणिनी, जैमिनी, विद्यारण्य इत्यादि महर्षींच्या योग्यतेचा महापुरुष होता. असा हा श्रेष्ठ तपोनिधि कोणे?

## महर्षि राजवाडे

महाराष्ट्र–व्यास महर्षि राजवाडे यांची योग्यता कळण्यास त्यांच्याशीं मतभेद असलेले विद्वान् लेखक श्री. वाकसकर व विरोधामुळे तुमुल वाग्युध्द केलेले श्री. ठाकरे यांचे उतारे पुरेसे होतील.

श्री. वाकसकर म्हणतात–" हें विद्वद्रत्न गेल्याने महाराष्ट्र–इतिहास पोरका झाला, व्याकरण अनाथ झालें, भाषा विधवा झाली, निरुक्ताला

पांगळेपणा आला, शद्बव्युत्पत्तीची धाव खुंटली, समाजशास्त्राला अंधत्व आलें. अचाट परिश्रम, अपार शद्बसंपन्नता, भेदक बुध्दिमत्ता, अफाट धारणाशक्ति, विलक्षण तुसडेपणा, प्रशंसनीय स्वाभिमान, व अवर्णनीय निस्पृहता या गुणावगुण समुच्चयांनी राजवाड्यांनी जमदग्नि, दुर्वास, भगीरथ, इत्यादि प्राचीन आर्यांची ओळख पटवून दिली. यांचेसारखा पुरुष शेंदोनशें वर्षांत एकदाच उत्पन्न होतो."

श्री. ठाकेर म्हणतातः—"मराठ्यांच्या इतिहासांचीं साधनें शोधून तीं संकलित करण्यांत राजवाडे यांनी जे परिश्रम केले व स्वार्थत्यागाची परिसीमा गांठली, ती महाराष्ट्रांत अक्षरशः अद्वितीय व अत्यंत कौतुकास्पद आहे. आम्ही तर असें म्हणतों कीं, श्री. राजवाड्यांचे खंड जर बाहेर पडले नसते, तर महाराष्ट्रेतिहासाच्या क्षेत्रांत खरोखर अंधार पडला असता. राजवाड्यांची ही कामगिरी बहुमोल. इतकेंच नव्हे, तर दुसरा राजवाडे प्रसविण्यास आणखी एकदोन शतकांचीहि तपश्चर्या अपुरी पडेल, असें आमचें प्रांजल मत आहे. जात्याच ते बेदरकार वृत्तीचे असल्याने कोणी भलेंबुरें लिहिलें बोललें, तरी त्याची त्यांना खिसगणती नसे. त्यांनी केवळ इतिहासाचेंच क्षेत्र आक्रमण केलें होतें असें नव्हे तर त्याच्या अनुषंगाने जितक्या म्हणून विषयांवर त्यांची नजर फिरली, तितक्या विषयांचा त्यांनी एखाद्या जिज्ञासू विद्यार्थ्याप्रमाणे पायाशुध्द स्वाध्याय केला. इतिहास, भाषा, समाज, इत्यादि अनेक विषयांचा स्वाध्याय करून त्यांचा आत्मविश्वास एवढा दांडगा फुरफुरलेला असे कीं, आपलीं निश्चित मतें प्रतिपादन करतांना ते लोकमताची केव्हांहि कसलीहि पर्वा बाळगीत नसत. लोकमान्यता मिळविण्यासाठी, किंवा आपल्या ग्रंथाचा सपाटून विक्रा होण्यासाठी, लोकरंजनाच्या फंदपिसाटांत ते कधीच पडले नाहीत. उलट लोकरंजनी झब्बूंची ते निरर्गल कठोर भाषेंत खरपूस झडती घेत असत. त्यांच्या अचाट व अद्वितीय इतिहासवाङ्मय तपश्चर्येने त्याना महाराष्ट्रेतिहासांत चिरंजीव करून ठेवले आहे. यांत मुळीच शंका नाही!"

इतिहासाचार्य राजवाडे दिवंगत व्हावयाला पांच वर्षें होत आलीं. त्यांचें स्मारक म्हणून धुळ्यास 'राजवाडे संशोधन मंदिर' ही संस्था स्थापन झाली.

त्या संस्थेने त्यांच्या अमूल्य हस्तलिखितांचा संग्रह सुरक्षित ठेवण्यासाठी अदाहय, प्रशस्त व सुंदर मंदिर उभारलें असून त्याची इमारत पूर्ण होत आली आहे.

राजवाड्यांचे हयातींत त्यांचेविषयीं उदासीन वृत्ति दाखविली गेली, तिचा परिणाम त्यांचे मनावर झाल्याशिवाय राहिला नाहीं. आपल्या एका निबंधांत ते म्हणतातः—

" आपला हलगर्जीपणा घोर व अक्षम्य आहे. याचा परिणाम आजपर्यंत फार घातुक झाला आहे जिचें साहित्य करण्यासाठी आपण जन्मलात त्या मराठी भाषेपासून पट्टीचा एकूण एक विद्वान् पराङ्मुख झाला. स्वदेशांत स्वभाषाद्वारा गुणग्रहण होत नाही, ही बाब कांही विसरतां येत नाही. अधिगतपरमार्थ जे पंडित त्यांचा जाणून अगर नेणून अपमान केला, अगर वेळींच परामर्ष घेतला नाही, तर केवढें भयंकर नुकसान होतें, हें महाराष्ट्राच्या ध्यानांत आजपर्यंत यावयास पाहिजे होतें. व होतकरू हातचा विद्वान् परभाषेंत अगर परलोकांत अकालीं जाऊं द्यायचा नाही, असा निश्चय आपण केला पाहिजे. तो वेळींच करण्याची बुद्धि न जाहल्याने आपलीं गेलीं शंभर वर्षे केवळ फुकट गेलीं. जणूं काय आपण मृतवत् झालों. विद्यावंत, बुद्धिमंत, व प्रतिभावंत व्यक्तींचा अपमान जसा आपल्या जुन्या धर्मशास्त्रांत, तसा नवीन समाजशास्त्रांतहि अत्यंत गर्हणीय व हानिकारक ठरला आहे. "

**" आता तरी पुढें हाचि उपदेश । नका करूं नाश प्रतिभेचा " ॥**

राजवाडे–स्मारक–मंदिर पूर्ण झालें. पण त्यांतील प्राण म्हणजे त्यांनी प्रेसकॉपीपर्यंत अतिपरिश्रमाने तयार केलेल्या धातुकोशाचें प्रकाशन होणें हें एक महत्त्वाचें कार्य आहे. वेदकालापासून मराठीभाषेच्या पूर्वपीठिकेचा इतिहास व व्युत्पत्तिशास्त्र या दृष्टीने हा ग्रंथ अमूल्य व वाङ्मयांत क्रांति घडविणारा आहे. सदर ग्रंथप्रकाशनास जवळजवळ पांच हजार रुपये लागतील.

या प्रतिभेचा प्रकाश जगाला दिसावा, म्हणूनच मला रौप्यतुलेची इच्छा झाली, हें केवळ त्यांच्या समागमाचें फळ. याप्रकाराने संस्थेस एका मुठीनें भरीव मदत मिळून पूर्वपरंपरा कायम राहील.

माझ्या कुंडलींतील ग्रहांचा पं. कृशोदरशास्त्री गणकभूषण यांच्याशीं प्रामाणिक मतभेद झाल्याने लॉटरीच्या निकालाच्या तारखा आल्या तशा गेल्या. कल्पनेचें वारूं आशेच्या रंगणांत धावतांना निकालाच्या तारखांची ठोकर लागून पडलें, तें पुन्हा उठलेंच नाही. भिकेची हंडी शिंक्यावर कधी तरी चढली आहे काय ?

तुला करण्याची उत्कंठा वाढत चालली. आकांक्षेची अतृप्त तृष्णा स्वस्थ बसूं देईना. पुढें काय या विचारांत बरेच दिवस गेले.

कर्मधर्मसंयोग असा कीं, याच वेळीं आमची पाणीदार व सुशील पत्नी परलोकवासी झाली. दैवाला दोष दिला. पण या दुर्दैवी घटनेंत माझ्या सीदच्छेची पूर्ति होती, हें मला काय माहीत ?

काळ्या मेघांच्या सैन्याने सर्व दिशा धुंद होऊन अंधःकाराचें भीषण साम्राज्य चोहीकडे पसरलें होतें. मधून मधून मेघांचा गडगडाट व चपलेचा चमचमाट चालला होता. साऱ्या रात्रभर पावसाच्या सरीवर सरी येत होत्या.

दुःखानें व अतृप्त कर्मतृष्णेच्या निराशेने हृदय व्याकूल झालें होतें. दुःखानें भारावलेल्या हृदयाला अश्रुमोचनाने किंचित् बरें वाटून डोळा लागला.

तो भास होता, स्वप्न होतें कीं सत्य होतें, कांही सांगतां येणार नाहीं.

× × × ×

त्यावेळीं एक पूर्वपरिचित स्त्री माझ्याजवळ येऊन म्हणाली— " आपण इतका विचार कसला करतां ? रौप्यतुला करणें तुम्हांला कठीण कां वाटतें ? हे घ्या माझे दागिने ! इतक्या पुण्यकार्यांत जर ते खर्च होतील, तर मला त्यांत आनंद व अभिमान वाटेल. मला त्यांचा मुळीच मोह नाही. धर्मकार्यांतच त्यांचा उपयोग झाला पाहिजे. " त्या दिव्य संदेशानें माझ्या मनाला एक नवी दृष्टि दिली.

आभासांत पुढील चित्र माझ्या दृष्टीसमोर खेळूं लागलें:

एका शुभ मुहूर्तावर विद्वान् ब्राह्मण बोलावले. धार्मिक विधि यथासांग झाले. मी तुलेंत बसलों. दुसऱ्या पारड्यांत भारंभार चांदी घालून ती दान केल्याचें जाहीर झालें.

समारंभ राजवाडे संशोधन मंदिरांत झाला. त्याच दिवशीं राजवाडे मंदिराचा प्रवेश समारंभ होता. असंख्य समाज जमला होता. त्यांत प्रमुख-स्थानीं श्री शंकराचार्य डॉ. कुर्तकोटी, धर्मभास्कार मसूरकर महाराज, श्रीमंत चंद्रोजीराव आंग्रे, धर्मवीर लक्ष्मणराव भोसले, कुलगुरु चिं. वि. वैद्य, साहित्य-सम्राट् न. चिं. केळकर, लोकनायक अणे, सरदार मेहेंदळे, डॉ. मुंजे, प्रो. दत्तो वामन पोतदार व धुळ्याचे प्रमुख नागरिक उपस्थित होते.

मनुष्यमात्रांवर देवऋण, ऋषिऋण, पितृऋण, धर्मानेंच लादलें आहे. त्यापैकी महर्षि राजवाडे यांचेबद्दल तर्पण करून एक अंजलि दिली. यायोगें मी कृतार्थ होऊन ऋषिऋणांतून मुक्त झालों, याचें मला फार समाधान वाटलें.


* * *

स्वप्नसृष्टींत माझे मनोरथ पूर्ण झाले, तसे सत्यसृष्टींत होईल, तर काय बहार होईल ?

प्रिय वाचक ! गोष्ट संपली. ही लघुकथेंत गोवलेली आत्मकथा व गुरु-कथा आहे. याच परंपरेने सार्वजनिक संस्थांना मदत व्हावी, असा ईश्वराजवळ आशिर्वाद मागून आपला निरोप घेतों.

**किर्लोस्कर.**

फेब्रुवारी, १९३२.



# गरुडा, घेईं भरारी !

[ जाति–चिमणी. ]

चालः–कवि यशवन्त यांच्या बंदिवान् गरुडाप्रमाणे.

---

सावर कर दे तारी । गरुडा घेई व्योमिं भरारी ! ॥धृ.॥

पंजर तुटला, पाश निमाले
स्थलबंधन वा विजन संपले
स्वातंत्र्याचे शुभ दिन आले
जनता प्रमुदित सारी । गरुडा, घेई व्योमिं भरारी ! ॥१॥

मायभूमिच्या स्वातंत्र्याचें
ध्येय दिव्य तव हृदयीं नाचे
अर्पण केलें सर्वस्वाचें
खडतर तप तव भारी । गरुडा, घेई व्योमिं भरारी ! ॥२॥

चैतन्याची तूं जणुं मूर्ती
नवयुवकांची पवित्र स्फूर्ती
दिगंत नेली भारत–कीर्ती
चरितसुधा तव प्यारी । गरुडा, घेई व्योमिं भरारी ! ॥३॥

हिंदु जातिच्या पराक्रमाचें
मांगल्याचें, थोर यशाचें
गान गाइलें; अपमानाचें—
उपटुनि शल्य विषारी । गरुडा, घेई व्योमिं भरारी ! ॥४॥

साहित्याच्या शांत सरोवरिं
धर्माच्या वा विशाल सागरिं
राजनीतिच्या कल्लोलिनिवरि
उज्ज्वल तव यशलहरी । गरुडा, घेई व्योमिं भरारी ! ॥५॥

मार्सेलिसच्या पराक्रमाची,
वक्तृत्वाची, चातुर्याची
स्फूर्तिप्रद तव पोवाड्यांची
स्मृति ही चेतोहारी । गरुडा, घेई व्योमिं भरारी ! ॥६॥

नभांत दिसती अनंत तारे
दिव्य दीप्तिने चमचमणारे
तेवीं भारत–सुपुत्र सारे
चमक परी तव न्यारी । गरुडा, घेई व्योमिं भरारी ! ॥७॥

तव जीवनिं ये वसंतवारा
दैन्य दुःख ते हारविणारा
अर्पुनिया मधु नव फलभारा
अद्भुत किमयाकारी । गरुडा, घेई व्योमिं भरारी ! ॥८॥

कर्णधार तूं, कुशल राष्ट्र हें
आवर्तामधिं भ्रमतें आहे.
भिर भिर भिर हा वारा वाहे
होइ विमोचनकारी । गरुडा, घेई व्योमिं भरारी ! ॥९॥

प्रबोध ता. १३।६।१९३७.

# प्रतीक्षा.

तुझ्या पत्राची आज कित्येक दिवस मी एकसारखी मार्ग-प्रतीक्षा करीत आहें. दिवसांमागून दिवस चालले आहेत. अंतःकरणाची तळमळ दिवसेंदिवस वाढत आहे. पण अजून तुझें पत्र येईना !

दररोज सकाळीं तो निष्ठुर टपालवाला माझ्या घरावरून पत्र न टाकतांच जातो त्याच्याजवळ इतकीं पत्रें असून माझ्या वाट्यास एकहि येत नाही. तो लोकांचीं पत्रें देतो, तेव्हां ते हसतात. माझ्या दुर्दैवाबद्दल ते माझा उपहास करतात असें मला वाटतें !

त्यांच्या उपहासाची मला मुळीच पर्वा नाही. पण त्या टपालवाल्याच्या पक्षपातीपणाबद्दल कधी कधी मला त्याचा फार राग येतो. तो दररोज नेमाने माझ्या खोलीवरून जातो. त्याच्या हातांतील पत्रांचा गठ्ठाहि ल्हान नसतो. तो तसा कृपणहि नाही. कारण, कित्येक वेळां इतरांना दोन दोन पत्रें देतांनासुध्दा मीं त्याला पाहिला आहें. पण तो माझ्याकडे दुर्लक्ष करतो, येवढें मात्र खरें. आज इतके दिवस झाले तरी तो मला पत्र देईना !

त्याच्या येण्याची वेळ झाली कीं, मी माझें दार सताड उघडें ठेवतों. त्याचीं पावलें वाजलीं म्हणजे तीव्र उत्कंठेमुळे माझ्या हृदयाचें स्पंदनहि जोराने सुरू होतें. पण तो माझ्या दारावरून तसाच पुढे निघून जातो. आशा–निराशेचा हा खेळ आज किती दिवस तरी एकसारखा चालला आहे !

मी मनाची दररोज कशीबशी समजूत करीत आहें. एखाद्या हट्टी मुलाप्रमाणे तें रुसून बसतें. नित्य—व्यवहाराचें आवडतें खेळणेंहि फेकून द्यावें असें त्याला वाटतें. दररोज निरनिराळीं कारणें सांगून मी त्याला 'उद्यां'ची आशा लावतों. पण उद्यां कोणतें कारण सांगावें याची मात्र मला आता पंचाईत पडली आहे !

तुझ्या मुग्धतेचें कारणहि मला कळत नाही. तुझ्या प्रेमळ हृदयांत रागाला स्थान असेल, अशी कल्पनाहि करवत नाही. मग असें कां व्हावें ? कितीहि विचार केला, तरी या विलक्षण कोड्याचा उलगडा होईना !

माझ्या तितिक्षेच्या परिक्षेची ही वेळ आहे, हें मी जाणून आहें. पण खरें सांगावयाचें म्हणजे आशेला यापुढे हा ताण सहन होणार नाही. तीव्र निराशेच्या पोटीं जमा झालेले अश्रू मी दररोज मुकाट्याने गिळतों. व एखाद्या थोर तत्त्ववेत्त्याचा आव आणून स्मितवदनाने मनाची समजूत घालतों. पण हें नाटक असें किती दिवस चालणार ?

वर्षाकाल संपून शरदाचें मंगल साम्राज्य सुरू झाल्याला बरेच दिवस झाले. ' नवरात्र येणार ' ! ' नवरात्र येणार ! ' असें म्हणतां म्हणतां विजयादशमीचें सीमोल्लंघनहि होऊन गेलें. प्रतिपदेच्या दिवशीं दृष्टींतहि न भरणारा क्षीण व निस्तेज चंद्रमा आज पौर्णिमेच्या पूर्णत्वाने व प्रकाशाने सारें विश्व आनंदमय करून टाकीत आहे ! सृष्टीमध्ये अशीं अनेक स्थित्यंतरें झालीं, पण माझ्या वृत्तींत अजून स्थित्यंतर होण्याचा रंग दिसेना. तुझ्या पत्राची प्रतीक्षा करीत दिवसांमागून दिवस तसेच जात आहेत. पण अजून तुझें पत्र येईना !

# सीमारेषेवर.

मी बुडत चाललों आहें हें मला कळतें. मदतीसाठी मी ओरडण्याचा प्रयत्न करतों. पण कंठांतून शब्दच बाहेर उमटेना.

मी हळूहळू खाली जात आहे, याची मला जाणीव आहे. पण वर राहण्याचा प्रयत्न करण्यासाठी हातपाय हलवीत असतां जें पाणी उडतें त्याने मी भांबावून गेलों आहें.

सूर्यास्त होऊन बराच वेळ झाला. तीरावर चिट पांखरूंहि दिसत नाही. या अफाट सागराच्या पृष्ठभागावर दूरवर एकहि नौका नाही. माझी हांक आता कोणाला ऐकूं जाणार ?

जीवन मरणाच्या सीमारेषेवर मी या वेळीं उभा आहे. पण मला ते दोन्ही प्रांत सारखेच वाटतात. पहिल्याचा व माझा परिचय असला तरी त्याविषयीं मला प्रेम वाटत नाही. दुसरा मला पूर्ण अज्ञात आहे. मग माझ्यासारख्या भटकणाऱ्या प्रवाशाला त्या अज्ञात प्रांतांत जाण्याचा मोह कां होऊं नये ?

पण तसा तो मोह होऊं देणें चांगलें नाही असें म्हणतात. म्हणून तुझ्यावर भार टाकून थोडीसुध्दा हालचाल न करतां मी डोळे मिटून स्वस्थ पडून राहतों. तुला जें प्रिय असेल तें तूं कर.

द. वा. पोतदार,
ग्रंथ संग्रह

# भारतीय पुढाऱ्यांचें आध्यात्मिक अधिष्ठान.

[ लेखकः—वि. वि. भागवत. ]

## जनसेवा हीच ईश्वरसेवा.

लो. टिळक, म. गांधी, से. बापट, सुभाषचंद्र बोस, अरविंद घोष आणि महर्षि आण्णासाहेब पटवर्धन यांच्या लोकोत्तर जीवनक्रमाचें अवलोकन केल्यास त्यांचें राजकीय क्षेत्रांतील कर्तृत्व त्यांच्या आध्यात्मिक विकासावर अधिष्ठित आहे, असें आढळून येईल. पाश्चात्त्य लोकांची आपल्या नेत्याकडे पाहण्याची दृष्टि आपल्याहून अगदी भिन्न आहे. पाश्चिमात्त्य जनता आपल्या पुढाऱ्यांच्या खाजगी चरित्राकडे फारसें लक्ष देणार नाही. पण आर्यावर्ताच्या धर्मभूमींतील जनता, आपल्या नेत्यांची निवड करतांना केवळ त्यांच्या कर्तृत्वाकडेच लक्ष देत नाही, तर तो नीतिमान् व ईश्वरनिष्ठ आहे कीं नाही, इकडे चिकित्सक दृष्टीने पाहते. वर निर्देश केलेल्या थोर पुढाऱ्यांपैकी **आण्णासाहेब पटवर्धन** व **सुभाषचंद्र बोस** यांच्याखेरीज सर्वांनी गीतेंतील शिकवणीचा स्वतंत्र ग्रंथ लिहून उहापोह केला आहे, व स्वतः तदनुसार आचरण केलें आहे. **सुभाषबाबू** यांनी आध्यात्मिक प्रगतीसाठी तपश्चर्या करावी, म्हणून एकदां हिमालयाकडे धाव घेतली होती. **महर्षि आण्णासाहेब पटवर्धन** यांची वैराग्यवृत्ति व कर्मनिष्ठपणा सर्वश्रुत आहे. **बाबू अरविंद घोष** यांनी राजकारणांतून आपलें अंग काढून घेतल्याला आज दोन तपें झालीं. ते पांडिचरीला ध्यानमग्न होऊन बसले आहेत ! **म. गांधी** यांनी सत्याचे प्रयोग करण्यासाठी आपलें आयुष्य अर्पण केलें. **महात्माजींनी** केलेली खडतर तपश्चर्या, व त्यामुळे प्राप्त झालेलें आत्मिक

बल, यामुळे अखिल मानवजातीला अहिंसेचा अभिनव संदेश देण्यास ते समर्थ झाले. **लो. टिळक** यांनी निष्काम कर्मयोगाचें निरंतर आचरण करून जनतेला तीच शिकवण दिली, व लोकांच्या हृदयांत कायमचें स्थान पटकावलें. **से. बापट** यांनी हृदयस्थ श्रीहरीच्या आदेशानुसार सत्यसेवा करण्याची प्रतिज्ञा केली, व त्या प्रतिज्ञापूर्तीसाठी बंदिवासांतहि खडतर तपाचरण ते करीत आहेत!

या सर्व महापुरुषांच्या आयुष्यांत चित्तक्षोभामुळे आत्यंतिक अस्वस्थतेचा क्षण केव्हां तरी आला असला पाहिजे. परमेश्वरप्राप्तीची उत्कट तळमळ व तत्सिद्ध्यर्थ तपाचरण करण्याची दृढ बुद्धि त्यांच्या प्रकृतींत स्वभावतःच होती. या स्वाभाविक प्रवृत्तीचें उगमस्थान **स्वामी विवेकानंद** यांनी आपल्या अमोघ वाणीने हिंदभूमीच्या प्रकृतीचें जें निदान केलें आहे, त्यांत असेल काय?

" माझ्या मातृभूमीचें सारें वातावरण आध्यात्मिक विचारांनी दुमदुमून गेलें आहे. नीति आणि अध्यात्म यांची जन्मदात्री हीच भूमि...... मनुष्याला त्याच्या पशुवृत्तींतून बाहेर ओढून स्वानंदसाम्राज्याच्या सिंहासनावर बसवावयाचें, हेंच तिचें इष्ट कार्य आहे. "

त्यांची स्वाभाविक प्रवृत्ति आध्यात्मिक असली, तरी त्यांच्या प्रेमळ हृदयाला देशाची विपन्नावस्थाहि तितकीच असह्य होत होती. 'देव कीं देश' या विलक्षण द्वंद्वांत ते कांही काळ भ्रमले. पण त्यांच्या निर्णायक बुद्धीनें फारच चातुर्याने या प्रश्नाचें उत्तर शोधून काढलें. या मानसिक अस्वस्थतेचें वर्णन **से. बापट** यांनी खालीलप्रमाणे केलें आहे. ते म्हणतातः—

**खळबळ बहु झाली अंतरीं मन्मनाची।**
**बघुनि अबलता ही माझिया या जनांची।**
**हरि मज गुज सांगे यत्न कांही करावा।**
**स्वजन सबल जेणें सन्मती थोर व्हावा॥**
**हरीच्या आज्ञेतें मन लववुनी पाळित असे।**
**नसे मातें इच्छा मुळिहि फलभोगीं; मज पिसें॥**
**जना सेवायाचें, झटुनि करुनी सुंदर कृती।**
**जशी मातें देई हरि सुजनतेची वर मती॥**

सामान्यतः सर्वच विरागी देशभक्तांची स्थिति वरील वर्णनांत प्रगट झाली आहे. त्यांच्या आयुष्यांतील अतिशय महत्त्वाचा कूट प्रश्न असा होता—

**देशसेवा कीं देवसेवा ?**

त्यांच्या मार्मिक निर्णायक शक्तीनें फारच चातुर्याने तडजोड काढली कीं,—

**देशसेवा हीच देवसेवा !**

या राष्ट्रपुरुषांचा स्वाभाविक कल अध्यात्माकडे असतां ते राजकारणांत कसे ओढले गेले, याविषयी विचार करतांना कल्पनाशक्तीच्या साहाय्याने त्यांच्या भूमिकेवर आरूढ होण्याचा मीं प्रयत्न केला. त्यावेळीं माझ्या कल्पनाशक्तीनें जो मनोरम चित्रपट मला दाखविला, तो वाचकांनाहि मनोरंजक वाटेल, अशी आशा आहे.

× × × ×

प्रातःकालच्या प्रशांत समयीं शीतलाने सुस्नांत होऊन मीं माझ्या ध्यानमंदिरांत प्रवेश केला. पुष्पगंधादि पुष्पसाहित्य घेतलें होतें.

भगवान् गोपालकृष्णाची सुदर मूर्ति ध्यानमंदिरांत स्थापन केली होती. शुभ्र संगमरवरी पाषाणाने घडलेल्या त्या देवमूर्तीचें ध्यान इतकें मनोरम साधलें होतें कीं, त्या सुंदर मूर्तीला पाहून कट्टया नास्तिकाचें मनहि भक्तिभावाने क्षणभर उचंबळून आलें असतें !

मीं श्रद्धायुक्त अंतःकरणाने पूजा केली. शुध्द जलाने त्या मूर्तीस स्नान घातल्यावर गंधपुष्पादि सुगंधी द्रव्यें समर्पण केलीं. धूप–धीप–नैवेद्यादि सर्व प्रकार यथाविधि झाले.

पूजा संपली. नीरांजन शांत प्रकाशाने तेवत होतें. त्याचें मंद तेज सर्वत्र पसरलें होतें. पुष्प–चंदन–उदबत्त्यांच्या मधुर सुगंधाने वातावरण दरवळून गेलें होतें.

माझें अंतःकरण उदात्त व गंभीर विचारांनी भरून गेलें. वृत्ति प्रसन्न होती. मनाला फार उत्साह वाटत होता. वाटलें, कीं आज इतक्या दिवसांचा यत्न सफल होणार !

दृष्टीसमोर दिसणारें भगवान् श्रीकृष्णाचें मनोहर ध्यान डोळे मिटल्यावर मनश्चक्षूंपुढे स्थिर व्हावें, म्हणून आज बरेच दिवस मी प्रयत्न करीत होतों. ती इच्छा आज सफल होणार, असें मला वाटलें. त्या उत्साहाच्या

भरांत तुकोबारायांचा खालील अभंग भक्तियुक्त अंतःकरणाने मी गुणगुणूं लागलों.

आवडे हें रूप साजिरें सगुण ।
पाहतां लोचन सुखावले ॥ १ ॥
आता दृष्टीपुढे असाचि तूं राहे ।
जोंवरी मी पाहें नारायणा ॥ २ ॥
लाचावलें मन लागलीसे गोडी ।
तें जीवें न सोडी ऐसें झालें ॥ ३ ॥
तुका म्हणे आम्ही मागों लडिवाळी ।
पुरवावी आळी पांडुरंगें ॥ ४ ॥

या भावपूर्ण अभंगाच्या गायनाने माझें मन उदात्त व हर्षपुलकित झालें. नंतर मी नित्याप्रमाणे पद्मासन घालून नामस्मरण करीत नेत्र मिटले. व चित्त एकाग्र करून तें जगन्मोहनध्यान मानसमंदिरांत स्थापन करण्याचा प्रयत्न करूं लागलों.

वृत्ति क्षणमात्रच एकाग्र राहिली. मानवी मनाचा नैसर्गिक चंचलपणा उसळून वर आला. विविध विचारांचीं अनेक वर्तुलें निर्माण होऊं लागलीं. चित्त मूळ हेतूवर आणण्याचा यत्न केला. पण जमेना. म्हणून नेत्र उघडले, व मन स्थिर करण्यासाठी खालील अभंग म्हणावयास सुरवात केली.

भावबळें कैसा झालासी लहान ।
मागे संतीं ध्यान वर्णियेलें ॥ १ ॥
तें मज उचित करुनीया देवा ।
दाखवी केशवा मायबापा ॥ २ ॥
पाहोनिया डोळां बोलेन मी गोठी ।
आलिंगून मिठी देईन पायीं ॥ ३ ॥
चरणीं दृष्टी, उभा राहेन समोर ।
जोडोनिया कर पुढें दोन्ही ॥ ४ ॥
तुका म्हणे उत्कंठित हे वासना ।
पुरवी नारायणा आर्त माझें ॥ ५ ॥

यांप्रमाणे माझें आर्त पुरविण्यासाठी मनोभावें प्रार्थना करून ध्यानासाठी पुन्हा नेत्र मिटले. पण हा प्रयत्नहि सफल झाला नाही. बंधनाच्या जाचामुळें अधिकच उत्तेजित झालेलें मन श्रीकृष्णचरित्राच्या विविध रंगांनी मोहित झालें. बंदिवासांतील जनन, कालिंदी पुलीनावर बाल गोपालंसमवेत केलेल्या मनसोक्त क्रीडा, चराचरास मोहित करणारें नितान्तमधुर मुरलीवादन, पूतनामावशीचा वध, कालियामर्दन, कंसकंदन इत्यादि श्रीकृष्णचरित्रांतील मनोहर व रोमांचकारी प्रसंग मनश्चक्षूंपुढे चित्रपटाप्रमाणे दिसूं लागले. गोधनावर असलेली श्रीकृष्णाची भक्ति, गोरसावरील अनिवार आसक्ति व गोरक्षण कार्यावरील त्याची प्रीति आठवली. गोरक्षणावरून सांप्रतचे गोरक्षण, कुरुक्षेत्रावरील महाभारतकालीन रणकंदनावरून गेलेलें जागतिक प्रलयाकारी महायुध्द, पूर्वकालीन धनधान्य समृध्दतेवरून आजची भीषण दुःस्थिति वगैरे तीव्रतेनें लक्षांत आल्या. याप्रमाणें एका विषयावरून दुसऱ्या विषयावर, स्वदेशांतून परदेशांत, भूतकालांतून वर्तमानकालांत, मनोवारूवर स्वार होऊन मी स्वैरावैरा धावूं लागलें. अशा रीतीनें माझें विचारभ्रमण किती चाललें असतें कोणास ठाऊक ? पण मध्यंतरीं एक चमत्कार घडला. माझ्या दृष्टीसमोर एका प्रौढ सुंदर व चिंतामग्न स्त्रीची करुण मूर्ति दिसूं लागली. मला वाटे, तिचें चित्र मीं पूर्वी कोठेतरी पाहिलें असावें तिनें आपल्या मस्तकावर पुष्पमुकुट धारण केला होता. व संध्यारंगाप्रमाणे आरक्त असलेलें वस्त्र परिधान केलें होतें.

माझें विषयांतर पुष्कळ झालें असलें, तरी मूळ उद्देशाची पुसट कल्पना मनांत होती. त्यामुळे त्या कल्पनेशीं अगदी विपर्यस्त असें दृश्य दिसल्याबरोबर मनोवारू बिचकला व जागच्याजागीं थांबला. त्या तंद्रींतून जागृतावस्था येऊन मीं डोळे उघडले.

माझ्या अपेक्षेच्या अगदी उलट प्रकार घडल्यामुळे मनाला फार वाईट वाटलें. सर्व उत्साह मावळला. डोळ्यांत अश्रू उभे राहिले !

अशा स्थितींत ध्यान केवळ अशक्य. म्हणून इतर वाचन करावें असा मीं विचार केला. जवळच गीता, ज्ञानेश्वरी, तुकोबांची अभंगगाथा, दासबोध, तुलसी रामायण, गीतांजलि, मनोबोध, इत्यादि मननीय ग्रंथसंभार ठेवला होता. त्यांपैकी माझ्या अत्यंत आवडीची काव्यपूर्ण भक्तिरसाने नटलेली

'**गीतांजलि**' (मराठी रूपांतर—गो. वा. कानिटकर) चाळण्यास प्रारंभ केला. तों खालील गीतानें चित्त वेधून घेतलें.

"हें गायन, हें भजन, हा माळेचा जप, हीं सर्व सोडून दे. देवळाची सर्व द्वारें बंद करून टाकून अंधारमय कोपऱ्यांत बसून तूं कोणाचें ध्यान करीत आहेस ? तूं नेत्र उघडून पाहा, म्हणजे तुला कळेल कीं, तूं ज्याचें ध्यान करीत आहेस, तो तुझ्यासमोर नाही."

**रवींद्रबाबूंच्या** या लिखाणाचा अर्थ तरी काय? ईश्वर जर देवमंदिरांत सांपडणार नाही, तर तो आहे तरी कोठे? आमच्या थोर संतांचा मूर्तिपूजेचा मार्ग अगदी चुकीचा कसा असेल ?...........आणि मघाशी दिसलेली ती देवता कोण ? तिच्या आगमनाचें कारण काय बरें असावें ?

वरील प्रश्नमालिका विद्युत्वेगानें क्षणार्धांत माझ्या मनांत चमकून गेली. मी पुढे वाचूं लागलों.

"ज्या ठिकाणीं शेतकरी आपली बरड व कठीण जमीन नांगरीत आहे, आणि ज्या ठिकाणीं तो मजूर रस्त्यासाठी खडी फोडीत बसला आहे, तेथ तुझा तो देव आहे. तो उन्हांत, पावसांत सदोदित त्यांच्याजवळ आहे. तुझा पवित्र पोषाख एकीकडे ठेवून दे व त्यांच्याचप्रमाणे तूंहि या धुळीने भरलेल्या जमीनीवर उभा राहून काम कर."

परमेश्वर प्राप्तिसाठी ध्यानधारणा करीत बसण्यापेक्षा दरिद्रीनारायणाच्या सेवेचा अभिनव मार्ग धरल्यास जन्ममृत्यूच्या फेऱ्यांतून साधकाची सुटका होईल काय ? पुनर्जन्माच्या यातायातींतून मुमुक्षूची सुटका होण्यास हा परोपकारधर्म खरोखरच समर्थ असेल काय ?

"मोक्ष ? हा मोक्ष कुठे प्राप्त होणार ? ही सृष्टि निर्माण करण्याच्या कामांत ज्या प्रभूने आपण होऊन आपणास वाहून घेतलें आहे, तोहि आपणा सर्वांबरोबर जन्ममृत्यूच्या चक्रांत गिरक्या घालीत आहे.

तूं ध्यानधारणा सोडून बाहेर ये, आणि तुझीं फुलें व धूप बाजूला ठेव. तुझीं वस्त्रें फाटून गेलीं किंवा मळून गेलीं तर त्यांत काय मोठेंसें नुकसान आहे ? त्याला भेट आणि त्याच्यासह तुझ्या डोक्यांतून घाम निथळेल इतके कष्ट करीत राहा."

आता माझ्या हृदयांत त्या देवतेच्या-माझ्या मातृभूमीच्या-आगमनाचा लख्ख प्रकाश पडला. ‘ जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसी ’ हें वचन मला पटलें. मातृभूमीच्या सेवेची पूर्तता होण्यापूर्वी यौवनांतच ध्यानधारणेचा मार्ग धरणें अयोग्य आहे, असें मला वाटलें. मीं पुन्हा कधीहि ध्यानमंदिरांत प्रवेश केला नाहीं. आमरण अविरत लोकसेवा करण्याची मीं प्रतिज्ञा केली.

ती प्रतिज्ञा करतांना भगवान् श्रीकृष्णाच्या मूर्तीकडे मी पाहत होतों. आपल्या आश्वासक मूळ वाणीने ते मला आशिर्वाद देत आहेत, असें मला वाटलें.

प्रबोध. १९३३

# फैजपूर काँग्रेस.

[ आर्यावृत्त. ]

अपूर्व संमेलन जें फैजपुराच्या सभांगणीं झालें ।
दृश्य तयाचें देखुनि उद्बोधक काव्य अंतरीं स्फुरलें ॥१॥
सुपुत्र भारतभूचे, ज्यांचें तप थोर, ख्यात नरवीर ।
पंडित वीर, महात्मे, नेते, त्यागी, उदार. सरदार ॥२॥
जमले फैजपुराला भारत-स्वातंत्र्य-यज्ञ साधाया ।
प्रमुदित जनता झाली, सिद्ध मुदें कार्यभार उचलाया ॥३॥
**सावरकर, 'सेनापति,' सुभाष** इत्यादि प्रमुख झुंजार ।
येऊं न शकले, याचें जनतेला शल्य बोचलें फार ॥४॥
दिन हा महोत्सवाचा, महाराष्ट्राच्या अपूर्व भाग्याचा ।
ऐक्याचा अरुणोदय, भेदोद्भव अस्तकाल दास्याचा ॥५॥
चंद्राच्या उदयानें सागर जैसा उचंबळे गगनीं ।
जनता प्रेमभरानें नमनांजलि अर्पि **गांधिंच्या** चरणीं ॥६॥
धर्म, प्रेम, अहिंसा, चरख्यानें रामराज्य स्थापावें ।
श्रद्धामय नव परिसुनि संदेशा श्रोतृवृंद हेलावे ॥७॥
नरवर नेहरू यांची मूर्ती गंभीर, उक्ति तेजाळ ।
चमके सेनानीच्या हातीं जैसी कराल करवाल ॥८॥
भेदित साम्राज्याचें मर्मस्थल वा समाजवादाचें ।

करिते मंडन, प्रांगणिं, देशहितास्तव सदैव ती नाचे ॥९॥

व्यासस्तूपावरुनी **मालवियांची** अमोघ वाग्देवी ।

स्त्रवली अमृतरस तो जनता एकाग्र मानसें सेवी ॥१०॥

स्वातंत्र्य-प्रेमाची श्रोतृवृंदांत भावना स्फुरली ।

नुरली भीती हृदयीं त्यांची ती दिव्य ऐकुनी मुरली ॥११॥

पावित्र्य, धैर्य, सेवा त्यागाची स्फूर्ति द्यावया स्वजना ।

विजयी ध्वज राष्ट्राचा स्वातंत्र्यास्तव करीत आव्हाना ॥१२॥

ध्वज हा उंच राहावा,हो न कदापी मलीन शय याचें ।

तो धन्य ‘किसन’ झाला अर्पाया सिद्ध अर्घ्य रक्ताचें ॥१३॥

हा खानदेश झाला पावन, वास्तव्य पुण्यश्लोकांचें ।

घडलें, स्वागत केलें प्रेमानें, शबरि जेवि रामाचे ॥१४॥

फैजपुराचें झालें फत्तेपुर, क्षेत्र जाहलें सत्र ।

नव यत्न सफल झाला, घूकांतरिं मात्र राहिली रात्र ॥१५॥

भारत, धुळें

९।२।३७

# घटिकायंत्राचा संदेश.

घड्याळा, तुझ्या हृदयाचें स्पंदन किती जलदीने होत आहे ? सांग, कोणाला भेटण्यासाठी तूं इतक्या उत्कंठेने मार्गप्रतीक्षा करीत आहेस ?

आणि तुझे हे दोन्ही मुलगे कोणाचा शोध करीत एकसारखे फिरत असतात ? त्या धाकट्या मुलाला अजून धड चालतांसुध्दा येत नाही. तरीहि तो आपल्या शक्तीप्रमाणे हळूहळू मार्ग आक्रमीत आहे. तो थोरला मुलगा मात्र उंच व सशक्त असून निरतिशय द्रुतगतीने एकसारखा धांवत असतो.

त्याचें धाकट्या भावावर प्रेम आहे. त्याला वारंवार भेटल्याशिवाय याला चैन पडत नाही. पण सुखदुःखाच्या गोष्टी सांगण्याकरतां ते क्षणभरसुध्दा एकत्र थांबत नाहीत. तो थोरला भाऊ धाकट्याला एकदा डोळे भरून पाहतो व प्रेमाने कुरवाळून लगेच मार्गस्थ होतो.

धाकटा भाऊसुध्दा प्रवासाचे श्रम कुरकूर न करतां आनंदाने सहन करीत आहे.त्यांची ध्येयावरील दृष्टि अचल आहे.व ध्येयनिष्ठा उज्ज्वल आहे. कारण दोघांची भेट झाल्यावरहि त्या गाढ आलिंगनांत बंधुप्रेमाने मोहित होऊन, ते क्षणभरहि विसांवा घेत

नाहीत. त्यांची ध्येयनिष्ठा व बंधुप्रेम यांत अधिक कौतुकास्पद कोणतें हें ठरविण्याचें मला खरोखर मोठें गूढ पडलें आहे.

पण दोघांची भेट झाली तरी थोडा वेळहि त्यांनी एकत्र थांबू नये, अशी कोणची उत्कंठा त्यांना लागली आहे ? सांग, कोणत्या प्रबल महत्त्वाकांक्षेने प्रेरित होऊन हा उदंड उद्योग त्यांनी अखंड चालविला आहे ? कोणाच्या भेटीसाठी त्याच्या जिवाची एवढी तारांबळ चालली आहे ?

आणि या एवढ्याशा रंगणांत ते किती वेळ फिरत राहणार ? तेंच तें करण्याचा त्यांना कंटाळा नाही कां आला ?

‘ कर्तव्य हें नेहमीच कठीण व कंटाळवाणें असतें. ’ तें घड्याळ गंभीरपणाने म्हणालें.

‘ प्रभवापासून प्रलयापर्यंत एक दमांत, न थांबतां प्रवास करण्याची अलौकिक व भव्य महत्त्वाकांक्षा त्यांनी धरली आहे. या अनंत कालाला मोजून मापून भविष्यकालाच्या स्वाधीन करण्याचें नित्यकर्तव्य त्यांनी अविरत चालविलें आहे. प्रलयाची भेट घेण्यासाठी ते अगदी उतावीळ झालें असून त्या ध्येयाची पूर्ति झाल्याशिवाय त्यांची मार्गक्रमणा एकक्षणभरहि थांबणार नाही. ’

‘ पृथ्वी—प्रदक्षिणा करणाऱ्या प्रवाशांचें अवास्तव स्तोम माजविणाऱ्या मानवाला ’ तें घड्याळ उपरोधिक स्वरांत म्हणालें, ‘ या अचाट प्रवासाचें ज्ञानहि असूं नये हें केवढें आश्चर्य ! ’

सह्याद्रि, जानेवारी १९३५.

# विकास विलास कीं विनाश ?

दिवसांमागून दिवस, आठवड्यांमागून आठवडे, ऋतूंमागून ऋतु व वर्षांमागून वर्ष असा कालाचा प्रवाह अखंड चालला आहे. आपल्या बुध्दिबलाच्या प्रभावाने अनंत आकाशांत उगवणाऱ्या असंख्य तारकांपासून तों अगाध सागराच्या तळाशीं असणाऱ्या मौल्यवान् मौक्तिकांपर्यंत जगांतील वस्तुजातांवर आपलें प्रभुत्व चालावें, निदान सर्व वस्तुजाताचें आपणांस ज्ञान व्हावें म्हणून मानवाचा प्रयत्नहि अखंड चालला आहे ! अखिल मानवजातीला स्थलकालाचीं बंधनें दुःसह होऊं नयेत, पृथ्वीच्या पाठीवर निरनिराळ्या प्रदेशांत वास्तव्य करणाऱ्या मानववंशांना एकमेकांशीं व्यवहार करतां यावे एवढ्यासाठी, दळणवळण सुखाचें, सोयींचें, व जलद व्हावें म्हणून शास्त्रज्ञांनी अनेक शोध लावले आहेत. आता वाहतुकीकरतां वाफेऐवजी विजेचा उपयोग होऊं लागला आहे. आकाशांत स्वैर संचार करणाऱ्या पक्षांचा हेवा वाटूनच कीं काय, मानवानें आकाशांत पोकळींत घिरट्या घालणारीं प्रचंड विमानें उत्पन्न केलीं आहेत. 'रेडियो' च्या प्रसाराने स्वतःच्या चिमुकल्या खोलींत बसून सर्व जगाशीं घनिष्ठ संबंध ठेवतां येण्याची सोय झाली आहे ! मानवा ! या अद्भुत शास्त्रीय शोधांमुळे तुला आपल्या बुद्धिमत्तेचा विलक्षण अभिमान वाटतो काय ? पण मानवजातीच्या विकासाला किंवा विलासाला हे शास्त्रीय शोध जितके उपकारक आहेत, तितकेच तिच्या विनाशालाहि ते कारणीभूत होणारे आहेत, हें कटु सत्य तुला दृष्टीआड करून चालणार नाही !

# प्राजक्ताचा लक्ष.

[ ले. वि. वि. भागवत. ]

पारिजातकाच्या फुलांचा मंद सुवास सकाळच्या वायुलहरींबरोबर माझ्या खोलींत येत होता. दीर्घ श्वास घेऊन मी तो सुगंध लुटीत होतों. भूतकालचीं मधुर स्मृतिचित्रें त्या दिव्य सुगंधाने जागृत होत हो ीं. माझें मन अगदी प्रसन्न झालें होतें. त्या आनंदाला कारणीभूत होणारे पारिजाताचे बाल्वृक्ष पाहावे, म्हणून मी गच्चीवर आलें.

माझ्या घराच्या मागच्या अंगणांतील छोटीशी बाग आमच्या सर्वांच्या आनंदाचें निधान होती. गुलाब, मोगरा, निशिगंध, पारिजातक वगैरे फुलझाडें तुळशीवृंदावनाच्या सभोंवती लावण्यांत आलीं होतीं. पलीकडच्या मांडवावर दोडके, तोंडलीं, चक्की, घोहळा यांचे वेल पसरले होते.एका बाजूला मेथी, कोथिंबीर, आंबटचुका यांचे वाफे तरारले होते.

या वेळचा देखावा फारच प्रेक्षणीय होता. पारिजाताचीं दोन हिझडीं फुलांनी डवरून गेलीं होतीं. त्या झाडाखाली फुलांचा नुसता सडा पडला होता. नारिंगी देठाचीं तीं शुभ्र व नाजुक फुलें पुष्कळशीं झाडाखाली पडली होतीं. कांही झाडांच्या फांद्यापानांत अडकलीं होतीं व कांही झाडावरच विराजत होतीं. एका पांढऱ्या शुभ्र फडक्यावर तीं फुलें हळुवार हाताने जमा करण्यात माझी पत्नी गुंग झाली होती. एक एक फूल देठाने हळूच उचलून व मोजून ती रुमालावर टाकीत होती. तिच्या त्या कृतीकडे मी मुग्ध होऊन पाहत होतों. इतक्यांत तिची नजर माझ्याकडे गेली. मी हसलों. ' आहे बुवा ' चा अभिप्राय माझ्या हसण्यांत व्यक्त होत होता.

प्राजक्ताचा लक्ष पुष्कळ बायका वाहतात. पण माझ्या पत्नीच्या प्रतिज्ञेला थोडा पूर्वेतिहास होता. त्याची स्मृति माझ्या मनासमोर उभी राहिली.

पत्नीच्या करारीपणाला व कर्तबगारीला मीं मनापासून धन्यवाद दिले. त्या प्रतिज्ञेची पूर्तता आज होणार म्हणून माझेंहि मन हर्षपुलकित झालें होतें. आज पारिजातकाच्या लक्षाची पूर्ति झाल्याबद्दल उद्यापन होतें. त्यामुळे विशेष गडबड होती. म्हणून मी उ॰ोगाला लागलों.

उद्यापनानिमित्त होणारा भोजनाचा मुख्य कार्यक्रम व्यवस्थित पार पडला. रात्रीं काम आटोपून व बाळाला घेऊन पत्नी माडीवर आली. मी लेखनांत गर्क होतों.

" आज काय बाई येवढं लिहिणं चाललंय ? लेखक बनण्याचा तर विचार नाहीना ? म्हणजे घरांतच चढाओढ सुरू झाली म्हणावयाची ! "

" लेख लिहिण्याचा मक्ता फक्त आपलाच आहे असा आपला समज आहे कीं काय लेखिकाबाई ? आमच्या स्फूर्तीचा झरा सुद्धा राजापूरच्या गंगेप्रमाणे कधी प्रकट होतो बरं का ! "

" पण येवढं लिहिलं आहे तरी काय ? पाहूं दे तरी. म्हटलं आज सकाळीं गच्चीवर उभं राहून एकसारखं बागेचं निरीक्षण काय चाललं होतं ? का मासिकांत प्रसिद्ध झाल्यावरच आम्हांला लेख दाखवून चकित करण्याचा विचार होता आपला ? "

" अहो लेखिकाबाई, आपलें वाङ्मयप्रेम जरा आवरून धरा. त्या बिचाऱ्या बाळाला कां विनाकारण त्रास ? त्याला नीट बिछान्यावर ठेवा' म्हणजे बोलूं आपण सावकाश. "

माझ्या लेखनाला मी अजून मथाळा दिला नव्हता. म्हणून दातांवर ' पेन ' आपटून मीं क्षणभर विचार केला. व मथळा तर लिहून टाकला.–

**" स्फूर्तिदेवता "**

सौभाग्यवतीनें बाळाला बिछान्यावर नीट निजविलें. व जवळची खुर्ची पुढे ओढून ती माझ्यासमोर बसली व उत्कंठेने मजकडे पाहूं लागली.

" हें पहा, आपल्याला तें गोष्टीचं तंत्र वगैरे कांही माहीत नाही. आम्ही आपले साधेभोळे डॉक्टर लोक. लोकांच्या प्रकृतीचें तंत्र संभाळण्याचें आम्हांला समजतें व साधतें. रोगी लोकांना आम्ही आमच्याच तंत्रानें वागावयाला भाग पाडतो. तेव्हां गोष्ट संपेपर्यंत हसायचं नाही, अशी कबुली पाहिजे.

" बर बाई ! सौभाग्यवती किंचित् हसून म्हणाली, " अगदी पुतळ्याप्रमाणे निर्विकार व निश्चल बसण्याची मी शपथ घेतें पाहिजे तर. पण मला आता शंका येते. माझी व्यर्थ स्तुति करणारं कांही लिखाण तर लिहिलं नाही ना ? तरीच एवढी संपादणी चालली आहे. आपल्या डोळ्याला झाली आहे प्रेमाची कावीळ. पण जग हसेल बरं. "

" ते कांहीहि असो. आतां तूं आधी दिलेलं वचन पाळलं पाहिजेस. मग पुढे काय करायचं तें ठरवूं. आधी तूं ऐकून तर घेशील ? "

" बरं. वाचा तर ! "

मी वाचूं लागलों.

" स्फूर्ति देवता, "

" मी पण पारिजातकाचा लक्ष वाहणार आहें. " माझी पत्नी निश्चयी स्वरांत म्हणाली.

तिच्यासारखी सुशिक्षित स्त्री अजूनहि या जुन्यापुराण्या व्रताची आराधना करण्याचा विचार करते, ही कल्पनाच मला पसंत पडली नाही. शिवाय आईने नुकत्यान वाहिलेल्या लक्षासाठी तिला किती खटाटोप पडला, व क्वचित् अपमान सोसावा लागला, याचें वर्णन सौभाग्यवतीनेंच मजजवळ केलें असल्याने तिचा निश्चय मला अगदी मूर्खपणाचा वाटला.

" अगदी खुळी आहेस झालं. " मी म्हणालों.

"पण माझं म्हणण पुरतं ऐकून तर घ्याल ? मी आपल्याला स्वतःच्याच घराच्या अंगणांत लावलेल्या पारिजाताच्या फुलांचा लक्ष वाहणार आहें. "

मी तिच्या खुलाशाने अधिकच बुचकळ्यांत पडलों. हिला वेड तर लागलें नाही ना ? मला स्वतःचें घर ना दार. डॉक्टरकीच्या धंद्याला नुकताच आरंभ केलेला. आपलें या गावांत कसें चालेल, अशी भीति मनांत अजून होतीच. इतक्यांत पत्नीने वरील शेखमहंमदी विचार करावा याची मला चीड आली. मीं तिला जरा खोचून विचारलें.

" तुझा पुनर्जन्मावर विश्वास आहे का ? "

" इतकं कांही खोचून बोलायला नको. मला पुनर्जन्म व पूर्वसंचित वगैरे गहन विचार कांही कळत नाहीत. पण एवढं मात्र सांगतें कीं, आपलें साहाय्य मिळेल तर माझी प्रतिज्ञा मी आपल्याला पुरी करून दाखवीन. मी

कांहीतरी मनोराज्य करतें असं आपण कां मनावें?" तिच्या डोळ्यांत स्वाभिमानाचें व दृढनिश्चयाचें तेज चमकत होतें.

तिचा तो आवेश, उत्साह व आत्मविश्वास पाहून मी जरा मनांत चमकलोंच. तिच्या कार्यांत मनापासून साहाय्य करण्याचें मीं तिला अभिवचन दिलें.

दोन तीन दिवस ती त्यासंबंधाने मजजवळ कांहीच बोलली नाही. कांहीतरी महत्त्वाचा विचार करण्यांत ती मग्न होती. तिसरे दिवशीं भिंतीवर, कपाटावर व प्रमुख जागेवर खडूने लिहिलेलीं खालील वाक्यें सुवाच्य व ठसठशीत अक्षरांत झळकूं लागलीं.

**'महत्त्वाकांक्षेला किल्ली दिली कीं नशिबाचे कांटेहि फिरतात'**
**क्षण क्षण मिळवा ज्ञान । कण कण साठवा धन ॥**
**मुंगीसारखा दीर्घोद्योग हेंच गजान्त लक्ष्मीचें साधन.**
**माझा मीच अर्थात् स्वावलंबन हाच यशस्वी होण्याचा गुरुमंत्र.**
**आय—व्यय = संचय.**

मी वरील वाक्यांचा खुलासा विचारण्यापूर्वीच ती मला म्हणाली, "मी प्रतिज्ञा करून तर चुकलें. आपणहि साहाय्य करण्याचें वचन दिलें. आपल्या प्रतिज्ञेच्या सफलतेसाठी या वाक्यांचा आश्रय केल्याशिवाय गत्यंतर नाही. मीं पुढील विचार मनांत योजून ठेवला आहे. तो सावकाशपणें रात्रीं बोलूं."

रात्रीं तिनें मजपुढे आपला विचार मांडला. ती म्हणाली "आय वाढविण्याचें काम आपलें, व्यय कमी करण्याचें काम माझें. आपण त्याबद्दल पूर्ण विचार करून कांहीतरी नवीन कार्यक्रम आंखलाच पाहिजे. आज आपल्याला पोटापुरतें मिळतें. पण महिनाअखेरीस आपल्या गांठीला एक पैहि राहत नाही. मला ही स्थिति अगदी लाजीरवाणी वाटते. परवा शेजारच्या सुशिलाबाईकडे बसावयास गेलें होतें. त्यांच्या शरयूनें 'मुंगी आणि टोळ' हें गाणें गोड आवाजांत म्हणून दाखविलें. त्याचा अर्थ मनांत पक्का बाणला आहे. आपल्यालाहि वार्धक्याची–जीवनाच्या हिवाळ्याची–तरतूद अवश्य केली पाहिजे."

तिचें म्हणणें मला पटलें. तिच्या शहाणपणाबद्दल व दूरदृष्टीबद्दल मला पूर्वीपासूनच आदर होता. तो अधिक दृढ झाला.

मीं पुष्कळ विचार केला. पोटापुरता पैसा मला माझ्या धंद्यामध्ये मिळत होता. पण मनांत विशेष महत्त्वाकांक्षा नव्हती, म्हणून धडपडहि नव्हती. महत्त्वाकांक्षेची ठिणगी पडल्यावर माझ्या धंद्याचें क्षेत्र व्यापक झालें.

लोकांच्या दृष्टीने माझ्यामध्ये फार फरक पडला. माझी टापटीप, नियमितपणा, काळजीपूर्वक काम करण्याची हातोटी वगैरे गुणांचा प्रभाव पडूं लागला. धंद्याच्या वाढीला अवश्य असणारे गुण माझ्यामध्ये सुप्तावस्थेंत होते. ते प्रगट होऊं लागले. माझा अबोलका स्वभावहि मीं पुष्कळच बदलला.

गांवांतच गिरणीजवळ दवाखान्याची दुसरी शाखा उघडली. काळे चष्मे, पेटंट औषधें इ. चा संग्रह हळूहळू वाढविला. गरिबासाठी आयुर्वेदिक औषधांचा सांठाहि मीं ठेवला.

आठवड्यांतून दोन दिवस सडकेला लागून असलेल्या खेड्यांतून जाऊन तेथील रोग्यांना पाहण्याचा नवा उपक्रम मीं सुरू केला. धंद्याचें क्षेत्र वाढलें.

सौभाग्यवतीनें आपलें काम मजपेक्षाहि उत्तम केलें. संचयाचें प्रमाण पांच सहा वर्षांत पुष्कळ वाढलें. व्याजाने रकम कशी वाढते याचाहि नवा अनुभव आला.

गांवाबाहेर सडकेला लागून एक जागाहि मिळविण्याची मीं खटपट करून ती थोडक्यांत विकत घेतली. त्या ठिकाणीं मीं नवीन घर नुकतेंच बांधलें आहे. घराच्या मागच्या आंगणांत पारिजाताचीं झाडें प्रथम लावण्यांत आलीं. त्यांच्या सुगंधमय पुष्पांची खाली रास पडते. सौभाग्यवतीची प्रतिज्ञा आज पुरी झाली. माझ्या खिडकींतून सुगंधमय शीतल वायुलहरी येतात तेव्हां पत्नीच्या प्रतिज्ञेचें मला स्मरण होतें व मी म्हणतों—गृहलक्ष्मी नव्हे भाग्यलक्ष्मी !

× × ×

" कांहीं तरीच माझी स्तुती केली आहे झालं " पत्नी म्हणाली. " आपणच सारे कष्ट करून दुसऱ्याला श्रेय देण्याची आपल्याला खोडच आहे नाहीतरी. मीं आपल्याला पुष्कळ सांगितलं, पण आपण मनावर घेतलं म्हणूनच ना हे दिवस आले ? पण खरंच आज सासुबाई पाहिजे होत्या. म्हणजे त्यांना धन्य झालं असतं. त्यांनाच आपला वाद मिटविण्याचा खरा अधिकार होता. आतां आपलं भांडण हें शेवटपर्यंत असंच चालायचं ! "

कलादर्श.

एप्रिल, १९३७.

# चोखामेळ्याची विहीर.

( लेखकः—वि. वि. भागवत. )

दुपारीं बारा वाजण्याची वेळ. जवळच्या खेड्यांत महात्माजींचा ग्रामोद्योग व हरिजनांचा उद्धार या विषयांचा संदेश पोंचविण्याचें कार्य करून मी स्टेशनावर परत आलों होतों. गाडी यावयास एक तास अवकाश होता.

भर दुपारच्या वेळीं त्या लहानशा स्टेशनावर फारसे उतारू कोठले असणार ? स्टेशनचा सर्व प्लॅटफार्म त्यावेळीं उजाड व भकास असावयाचा. एखादा पोर्टर, कामावर असलेला मास्तर, एखादें उनाड कुत्रें आणि एखाददुसरा उतारू यांच्या हालचालीने स्टेशनचें आवार 'गजबजलेलें' असावयाचें. हा लहानशा स्टेशनाचा माझा—नेहमीचा अनुभव. पण आज स्टेशनचा भाग खरोखरच गजबजलेला होता.

त्या दिवशीं मेंटेनन्स खात्याचे १५ । २० मजूर रुळाखालची खडी उकरून दुसरी घालण्याचें काम करीत होते. त्यांनी आपले कपडे फलाटावर असलेल्या लाकडी कुंपणाला अडकवून ठेवले होते. कांही मजुराच्या शिदोऱ्याहि तिथेच टांगून ठेवल्या होत्या. चमच्याच्या आकाराची प्रशस्त फावडी घेऊन काम करणाऱ्या मजुरांच्या पिळदार स्नायूंची हालचाल बघण्यासारखी होती. त्यांच्या कभिन्न देहांतून घामाच्या धारा वाहत होत्या. खाकी पोषाख केलेला मुकादम त्यांच्यावर देखरेख करीत होता. साहेबी हॅट व खाकी हाफ पॅंट घातलेले P. W. I. साहेब आपल्या दुय्यम सहकाऱ्यां-बरोबर प्लॅटफॉर्मवरील निंबाच्या छायेखाली उभे राहून गप्पा मारीत होते व मुकादमाला मधून मधून सूचना देत होते.

मी बाकावर बसून हा सर्व बाजार पाहत होतों. स्टेशन ऑफिसच्या छपराजवळ खोपें करून राहिलेल्या व नेहमीच्या शांत वातावरणाला सवक-लेल्या चिमण्या आज चिंव चिंव करीत चाललेल्या धांदलीला आपली साथ देत होत्या. तारायंत्राची कटकट व टेलिफोनची घंटा मधून मधून वाजत

होती. कामकरी मजुरांची कामाची गडबड व फावड्यांची खडबड त्या आवाजांत भर घालीत होती.

इतक्यांत काम करणाऱ्या मजुरांची दुपारची सुट्टी झाली. ते न्याहारी करण्यासाठी पलीकडच्या फलाटावर गेले. त्यांची गडबड पुष्कळच कमी झाली. चिमण्यांची चिंव चिंव थांबली. टेलिफोनला किंवा तारायंत्राला मात्र खळ नव्हती. निर्जीव यंत्र तें. सभोंतालच्या वातावरणाशीं सहकार्य करण्याचें त्या यंत्राला कुठलें साधणार ?

मजूर न्याहारी करावयास बसलेले पाहतांच माझ्याहि पोटांत कावळे कोकलूं लागल्याचें माझ्या लक्षांत आलें. हात पाय स्वच्छ धुवून फराळ करण्याचें इराद्याने मी इकडे तिकडे पाहिलें. स्टेशनवर नळ नव्हते. म्हणून पोर्टरजवळ पाण्याचा तपास केला. शेजारीं विहीर आहे असें मला सांगण्यांत आलें.

स्टेशनच्या पाठीमागे जवळच एक लहानशी विहीर होती. रुळाच्या दोन तुकड्याला भोकें पाडून खराडीची योजना बहुधा रेल्वेनेच केलेली असावी. मी तिकडे गेलों. एक म्हातारा लहानशा बादलीने पाणी काढून एका लहान टिपांत भरीत होता.

मीं विहिरींत डोकावून पाहिलें. पाणी भरपूर व स्वच्छ होतें.

त्या म्हाताऱ्या मनुष्याचा टीप भरून होईपर्यंत मी कांहीं बोललों नाहीं. त्याच्या कृतीकडे मुकाट्याने पाहत होतों. त्याच्या चेहेऱ्यावरून तो एक गरीब व सालस स्वभावाचा मनुष्य असावा, असा मीं तर्क केला.

त्याच्या बादलीला कडी नव्हती. कडीबद्दल जाड तार लावून कडीचें काम भागविलें होतें. बादलीला बांधलेलें चऱ्हाट मात्र दिसत होतें.

म्हाताऱ्याचें टीप भरणें झाल्यावर दोराची गुंडाळी करून त्यानें तो बादलींत कोंबला. यावेळीं त्याच्याजवळ मी बादलीची मागणी केली.

म्हातारा आपल्या दोराचें गुंडाळें त्या बादलींत तसाच कोंबीत होता. जणू काय माझें बोलणें त्याच्या कानांत शिरलेंच नव्हतें. माझ्या क्षुल्लक मागणीला त्याच्यासारख्या वृद्ध गृहस्थाकडून असा नकार येईल, अशी माझी मुळीच कल्पना नव्हती.

माझें बोलणें त्याला ऐकूं गेलें नसावें असें वाटून मी पुनः जरा मोठ्या स्वराने त्याला म्हणालों, " म्हातारबुवा, जरा बादली देतां का ? मला फार भूक लागली आहे. हातपाय धुवून फराळ करीन म्हणतों. "

तरीहि तो म्हातारा शांतपणें आपला टीप डोक्यावर घेऊन तेथून जाण्याच्या उद्योगांतच गर्क होता. मी आश्चर्यानें व संतापाने त्या म्हाताऱ्याकडे पाहतच राहिलों. हा म्हातारडा मनुष्य आहे कीं हैवान आहे ? इतक्या क्षुल्लक गोष्टींतसुद्धा माणुसकी महाग व्हावी ना ? मनांतल्या मनांत दांत ओठ खाऊन शेंकडों शिव्या मीं त्याला मोजल्या. ती बादली त्याच्या हातांतून हिसकून घ्यावी, असाहि विचार-विद्युत्वेगाने चमकून गेला.

डोक्यावर टीप नीट घेतल्यावर तो म्हातारा माझ्याकडे पाहून म्हणाला, " तुमची विहीर त्या तिकडं पलीकडच्या वडाखाली आहे दादा. ही विहीर आमची चोखामेळ्याची आहे. "

म्हाताऱ्याच्या विचित्र वागणुकीचा एका क्षणांत मला नीट उलगडा पडला. माझ्या संतापाचा पारा एका क्षणांत शून्यावर आला. माझा चेहरा अगदी फोटो काढण्यालायख झाला होता.

[ अप्रकाशित. ]

# शरदृतूचें स्वागत.

आज आश्विन महिन्यांतील पहिली सुप्रभात ! आज नवरात्रीचा पहिला दिवस ! आज पहिली माळ देवीला अर्पण केली जाईल. आजपासून वर्षाकालाचें साम्राज्य संपलें ! काळ्या मेघांचें सैन्य, दुर्मिळ सूर्यदर्शन, विद्युल्लतेचा कडकडाट व चमचमाट, गढूळ जलप्रपात,पावसाची झिमाझिम, व रस्त्यांतील चिखल इत्यादि वर्षाकालाचीं चिन्हें यापुढे दृष्टीआड होणार !

आजपासून शरदाचें मंगल साम्राज्य सुरूं झालें ! निरभ्र आकाश, रमणीय चंद्रप्रकाश, मनोहर सृष्टिसौंदर्य व मधुर शीतकाल इत्यादि देणग्यांची लयलूट करीत शरदृतु प्राप्त झाला आहे. आज त्याच्या राज्यारोहणाचा पहिला दिवस! शरत्काला, तुझ्या राज्यारोहणाबद्दल तुझें स्वागत असो !

सीमोल्लंघन करणारी पराक्रमी विजयादशमी, व हिंदुमात्राला आनंदित करणारा दीपावलीचा मंगल महोत्सव यासुध्दा शरत्कालाच्याच देणग्या आहेत ! ये, शरदा ये, व तुझ्या मृदु आणि मधुर स्पर्शाने आमचें कष्टी जीवन आनंदमय करून टाक!

[ अप्रसिध्द. ]



# सुभाषबाबूंचें स्वागत.

[ आर्या. ]

स्वागत सुभाषचंद्रा, वीरेंद्रा तव मुखारविंदाचें ।
दर्शन पुनरपि झालें, मोदें जनमनमयूर हा नाचे ॥१॥
बंदिग्रहणामधुनी तेजस्वी चंद्रबिंब हें सुटलें ।
भारतमातेचें वा जनतेचें पुण्य अजि फळा आलें ॥२॥
तव वृद्ध जननि झाली, व्याकुल तुजला सवेंचि भेटाया ।
कौसल्यें राम जसा शान्तवि विरहव्यथा तिचा राया ॥३ ॥
गमसी चंद्रापरि तूं, स्वजना शीतल सदैव सुखकारी ।
सत्ताधीश समर्था भानूपरि तव प्रताप ताप करी ॥४॥
तुजसी सामोरी ये, सत्तेचा लेवुनी नवा साज ।
नोकरि मायाविनि परि, शूर्पणखेपरिस पावली लाज ॥५॥
भारत-संस्कृति-संमत स्वातंत्र्याचें रुचे तुला ध्येय ।
प्राण पणाला लावुनि, झटसी तूं उद्धरावया माय ॥६॥
स्थलबंदी, देशांतर साहुनि जरि व्याधिग्रस्त तव देह ॥
ध्येयाच्या सिध्दीस्तव कारागृह मानिलें तुवां गेह ॥७॥
तूं मेरू धैर्याचा अचल, किती वादळें जरी आलीं ।
वज्रासम तव निश्चय, क्रूर कृतांता कधीं न धी भ्याली ॥८॥
बंदीचें ग्रहण जरी सुटलें, तरि व्याधि क्लेश दुस्तर ते ।
परि प्रभु साहाय असतां, एकाकी नाव वादळीं तरते ॥९॥
व्याधिक्लेश हरावे, देहा आरोग्य शीघ्र लाभावें ।
भूमातेच्या कंठीं, कौस्तुभ पदकासमान शोभावें ॥१०॥

रचनाकाल.
२२।३।३७

महाराष्ट्र, नागपूर
लोकशक्ति, पुणें.
भारत, धुळे.

# एक निष्ठावंत कर्मवीर.

[लेखकः—वि. वि. भागवत.]

वीस वर्षे झालीं ! इ. सन १९१३ सालीं नगर जिल्ह्यांतील **पारनेर** नांवाच्या लहानशा गांवांत एक प्रवासी प्रवेश करता झाला. वय तिशीच्या आंतबाहेर. वर्ण मूळचा निमगोरा, पण उन्हातान्हांत भटकंती केल्यामुळे काळवंडलेला. शारिरिक कष्टामुळे त्याचें सुदृढ शरीर कृश झालेलें दिसत होतें. डोक्यात अनेक विचारांचा कल्लोल माजल्यामुळे त्याच्या मुद्रेवर गांभीर्य पसरलें होतें. डोळ्यांत तपश्चर्येने प्राप्त होणारें तेज विराजत होतें.

विरक्तवृत्ति, विनयशील वागणूक व साधा वेष या त्रयींमुळे गांवांत नवीनच प्राप्त झालेल्या त्या प्रवाशाविषयी गांवकऱ्यांची जिज्ञासा जागृत झाली. त्यांनी एकमेकांकडे प्रश्नार्थक मुद्रेने पाहिलें. एकदा वाटे, याला पूर्वी कोठें तरी पाहिला असावा. पण एकदम ओळख पटेना. पुढे ओळख पटली. परिचय वाढला. व हा प्रवासी गांवकऱ्यांच्या प्रेमादराचें स्थान बनला. शुद्ध अंतःकरण, मधुर भाषण, लोकहितचिंतन, आणि परमेश्वरस्मरण या गुणचतुष्टयाच्या जोरावर त्याला लोकप्रियता संपादन करतां आली. आज अखिल महाराष्ट्र याच प्रवाशाला **सेनापति बापट** या नांवाने ओळखीत आहे.

वर वर्णन केलेला प्रसंग **से. बापट** पांच वर्षांचा अज्ञातवास संपल्यानंतर पारनेरास राहावयास गेले, त्या वेळचा आहे. त्यावेळीं ते "सेनापति" नव्हते. मुळशी सत्याग्रहाचें नेतृत्व स्वीकारल्यापासून त्यांना '**सेनापति**' ही अन्वर्थक पदवी प्राप्त झाली.

से. बापट यांचें नांव महाराष्ट्रांत सर्वतोमुखीं असलें, तरी त्यांच्या उदात्त जीवनक्रमांतील ठळक प्रसंगाची माहिती पुष्कळ लोकांना नाही.

**श्री. लालजी पेंडसे** यांनी त्यांचें एक छोटेंसें चरित्र लिहिलें आहे. हा लेख लिहितांना त्या चरित्राचा मला बराच उपयोग झाला. पण त्याच्यापेक्षा संगतवार, सविस्तर व साधार माहिती देणारें चरित्र लिहिण्याचें कार्य त्यांच्या अंतेवासी शिष्यांनी अगर भक्तांनी हातीं घेतलें, तर महाराष्ट्रीय वाचकवर्गा वर फार उपकार होतील. कारण असामान्य बुद्धिमत्ता, अचाट धैर्य, अलौकिक स्वार्थत्याग, निर्मल चारित्र्य, व विलक्षण तत्त्वनिष्ठा इत्यादि महनीय गुणांमुळे देशभक्तांच्या मालिकेंत त्यांचा दर्जा फार उच्च आहे.

**से. बापट** यांची जीवनगंगा बाल्य, शिक्षण, परदेशगमन, आज्ञातवास, मुळशी सत्याग्रह व कष्टमय कारागृहवास इत्यादि प्रदेशांतून मार्ग आक्रमीत आलेली आहे. यापुढें तिच्या प्रशान्त व पवित्र प्रवाहाला कोणत्या प्रदेशांतून जावें लागेल हें कोणीं सांगावें? पण मृत्यूच्या महासागराला मिळण्यापूर्वी राष्ट्रस्वातंत्र्याच्या अत्यंत सुपीक, संपन्न व सुंदर प्रदेशाचें दुरूनतरी दर्शन घेण्याचें भाग्य,कर्तव्याच्या कड्यावरून लीलेने उडी घेणाऱ्या त्यांच्या जीवनौघाला लाभणार आहे काय? त्यांच्या चरित्रगंगेंत अवगाहन केल्याने उत्कर्षेच्छु पण अयशस्वी वाचकांच्या निराश मनाला खात्रीने प्रसन्नता प्राप्त होईल, आपल्या दौर्बल्याची लाज वाटेल, आणि पुन्हा प्रयत्न करण्याची प्रेरणा मिळेल.

**से. बापटांच्या** जीवनाकाशांत ध्येयाच्या ध्रुवताऱ्याचा उदय वयाचे बाविसाव्या वर्षी झाला. ही खरोखरीच नवलाची गोष्ट आहे. तोपर्यंत लो. टिळकांच्या पुण्यनगरींत विद्याभ्यास करीत असतांनासुद्धा देशाविषयीं आपलें कांही कर्तव्य आहे, याची त्यांना जाणीव नव्हती. त्यांचा स्वभाव बाळपणापासून खेळकर, खोडकर, प्रेमळ व परोपकारी असल्याने त्या स्वभावानुरूप खोड्या करण्यांत, आपल्या सहाध्यायांशीं दंगामस्ती करण्यांत किंवा आपला आवडता टेनिसचा खेळ खेळण्यांत, अथवा इतरांवर झालेल्या अन्यायाचा आपलेपणाने प्रतिकार करण्यांत ते दंग झाले होते. पण ध्येयदर्शन उशीरां झालें, तरी बिघडलें नाही. कारण ध्येय एकदां निश्चित ठरल्यावर त्याकरतां सर्वस्वार्पण करण्याची त्यांची सिध्दता होती. आपलें ध्येय आपणांस फार उशीरां समजलें म्हणून हळहळणाऱ्या लोकांना, सेनापतींच्या उदाहरणावरून पुष्कळच

धीर येईल.

**से. बापट** श्रीहरीचे निस्सीम उपासक आहेत. त्याच्या आदेशानुसार सत्य-सेवा करण्याचा त्यांचा संकल्प सुप्रसिद्ध आहे. पण श्रीहरीनें दिलेल्या अन्तःस्फूर्तीप्रमाणे राष्ट्रसेवा करण्याचा निश्चय त्यांनी ज्यावेळीं केला त्यावेळीं आत्मोन्नतीच्या मार्गावर असलेल्या सामान्य प्रवाशाप्रमाणे त्यांची अवस्था चमत्कारिक झाली होती.

" Life is dear to me, Love is dearer still; but I can give them both for liberty. "

याप्रमाणे प्रतिज्ञा करून राष्ट्रोद्धाराचें असिधाराव्रत स्वीकारतांना त्यांच्या मनांत विरोधी विचारांचें जें आंदोलन झालें, त्याचें वर्णन त्यांनी स्वतःच खालील आर्याबद्ध ओळींत केलें आहेः—

**बसलों होतों मीही विदित मला मोह तो रमायाचा ।**
**उठलों परि करकरिनें हरिनें दिन आणिला श्रमायाचा ॥**
**तो दिन हरिकरकरिनें कर जेव्हां लागले श्रमायाला ।**
**तो दिन सहज न आला, झाले बहुपरि मना वमायाला ॥**
**मन मनेंनें नमवीले, नमवीलें रूढ दुष्ट मत त्याचें ।**
**रमवीलें त्या कामीं जें करतां त्यांसि प्रथम बहु जाचें ॥**
**करकर नको नको ही, ऐसे माझ्या करांहि बहु केलें ।**
**परि अंतीं म्या-हरिनें-म्हणणें माझेंच शेवटां नेलें ॥**

ध्येयमंदिराच्या सोपानांवर पहिलें पाऊल ठेवतांना सर्वच लोकांना या कसोटींतून पार पडावें लागतें. व्यामोह उत्पन्न करणाऱ्या विचारांच्या धुक्यांतून बाहेर पडल्याशिवाय ध्येयाचा ध्रुवतारा स्पष्टपणे दिसत नाही. से. बापटांनासुद्धा ज्या प्रवेशपरिक्षेंतून उत्तीर्ण व्हावें लागलें, ती सामान्य मनुष्याला कशी टाळतां येईल ?

या पहिल्या चकमकींत यश आलें, तरी ध्येयनिष्ठ मनुष्याला अविरत प्रयत्नांची संततधार धरल्याशिवाय पूर्ण यशप्राप्ति होत नाही. **से. बापट**

म्हणतात, "याचना करून कसलीहि प्राप्ति व्हावयाची नाही. प्रत्यक्ष परमेश्वराजवळसुद्धा याचना करूं नका. कारण त्याची कृपा जो समर्थ व स्वावलंबी आहे त्याच्यावरच होते."

थोरपण नव्हे, भिकाऱ्याचें धन ।
जीवाचें त्या रान, करणें लागे ॥
होऊं नका दीन, देवाचेही पुढे ।
दैन्याने न जोडे, कृपा त्याची ॥
त्याची कृपा होई, समर्थाच्या वरी ।
देवाची ही परी, सुप्रसिध्द ॥

**से. बापट** यांचा मनोनिग्रह विलक्षण आहे. वैराग्यवृत्ति व अभ्यास या दोन साधनांनीच त्यांनी आपल्या भावनाप्रधान मनावर विजय मिळविला आहे. ते शिस्तीचे फार भोक्ते आहेत. 'शिस्त हेंच मी माझ्या जीविताचें प्रधानकार्य मानलें आहे' या मुसोलिनीच्या शब्दांतच **से. बापट** यांचें शिस्त-प्रेम व्यक्त करतां येईल. **से. बापट** यांचें तुरुंगांतील वर्तन नमुनेदार असतें, याचें बीज त्यांच्या शिस्तप्रेमांतच सांपडेल. मुळशी सत्याग्रहाचे वेळीं टाटा कंपनीच्या लोकांनी मावळी स्त्रियांवर जे अत्त्याचार केले, त्यावेळीं **से. बापट** यांनी सामसत्त्याग्रहाची दीक्षा घेतली असल्यामुळेच त्यांचे समर्थ बाहू व अभिजात वीरवृत्ति उठावणी करीत असतांनासुध्दा ते आपल्या अतुल मनोनिग्रहामुळेच शांत राहूं शकले. नाहीतर एडिंबरो येथे लष्करी शिक्षण घेतलेल्या या सेनापतीनें काय भीम–पराक्रम केला असता हें काय सांगावें ?


**से. बापट** हे स्वतंत्र बुध्दीचे लोकनायक आहेत. दीर्घ परिशीलनाने बनविलेल्या आपल्या मतांचा पुरस्कार करण्यांत व स्वतः आचरण्यांत ते सर्वांच्या पुढे असतात. **लो. टिळकांना** ते फार मानतात. व **महात्मा गांधींबद्दल** आपला प्राण पणाला लावून त्यांनी आपली प्रेमादरबुद्धि प्रगट केली आहे. पण ते कोणाचेहि अनुयायी नाहीत. त्यांची कार्यपध्दीत स्वतंत्र आहे. **लो. टिळक** स्वराज्य–शिष्टाईसाठी विलायतेस गेले, त्यावेळीं **से. बापट** स्वतः निर्भेळ स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते असल्यामुळे त्यांनी **लो. टिळकांना**

विरोध केला. त्यांना वसाहतीच्या स्वराज्याची कल्पनाहि असह्य होते. त्यांनी राजकारण हेंच आपल्या जीवितांतील प्रधानकार्य मानलें असलें, तरी **लो. टिळकांच्या** पिढींतील जहाल पुढाऱ्यांप्रमाणे सामाजिक सुधारणेविषयी औदासिन्य किंवा उपहासवृत्ति स्वीकारलेली नाही. स्त्रीशिक्षण, बालविवाह, विधवाविवाह, जातिभेद व अस्पृश्योद्धार इत्यादि सामाजिक प्रश्नांबद्दल त्यांनी सन १९१३ सालापासून प्रगट केलेलीं मतें कट्ट्या समाजसुधारकाला साजेशीं आहेत. सामाजिक व राजकीय क्षेत्रांत चाललेल्या आंदोलनांत ते आघाडीच्या तुकडींत प्रामुख्याने चमकत असतात. सत्याग्रह, अनात्त्याचार, अहिंसा, व अनासक्तियोग इत्यादि वादग्रस्त विषयांबद्दल **से. बापट** यांचा **महात्माजींशीं** असलेला मतभेद जगजाहीर आहे. या तात्त्विकचर्चेमुळे **से. बापट** यांच्या सूक्ष्म,समतोल, सर्वग्राही व विवेचक बुद्धिमत्तेचा वाचकांना चांगला परिचय होतो. विशेषतः आपल्या प्रतिपक्षांबद्दल योग्य आदरभाव दाखवून ज्या नम्रतेने त्यांनी आपल्या मतांचें समर्थन केलें आहे, ती विनय-शीलता मराठी वाङ्मयाच्या प्रांगणांत वाग्युध्द करण्यास सज्ज झालेल्या पंडितास निःसंशय अनुकरणीय होईल. **से. बापट** यांना **महात्माजीं**सारखी त्रिखंड कीर्ति व लोकप्रियता लाभली नसली, तरी घोर तपश्चर्या, निष्कलंक चारित्र्य विलक्षण तत्त्वनिष्ठा व तदनुसार आचरण इत्यादि गुणांमुळे ते **महात्माजींचे** प्रतिस्पर्धी असल्यामुळे त्यांच्या विचाराचें महत्त्व विशेष आहे.

अप्रतिम बुद्धिमत्ता, निस्सीम देशभक्ति, थोर परोपकारवृत्ति, अनुपम धैर्य, निरंतर लोकहितचिंतन, विशुध्द चारित्र्य व लोकोत्तर स्वार्थत्याग इत्यादि अनेक गुणांनीं अलंकृत झालेल्या या निष्ठावंत कर्मवीराचें जीवन कारागृहांत वर्षांनुवर्षे व्यर्थ जावें, हे विधि–लिखित विलक्षण नव्हे काय ? या चमत्काराबद्दल अनेक लोकांना हळहळ वाटते, वैताग येतो व त्या उद्वेगाच्या भरांत ते **से. बापट** यांना दोष देतात. पण हा दोषारोप त्यांच्यावर कितपत लागूं पडेल, हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. **से. बापटांचे** न्यू इंग्लिश स्कूलमधील सहाध्यायी **श्री० आण्णासाहेब भोपटकर** यांनी या प्रश्नासंबंधी जें मार्मिक विवरण केलें आहे, तें येथे उध्दृत करून या लेखाचा समारोप करतों.

" विचित्र परिस्थितीमुळे उकिरड्यावर पडलेल्या रत्नाप्रमाणे दे. बापट यांची स्थिति झालेली आहे ! त्यांच्या हातून याहूनहि जास्त भरीव कामगिरी नसल्याबद्दलचा दोष त्यांच्याकडे येत नसून तो सर्वस्वी हिंदुस्थानच्या पराधीन स्थितीच्या माथ्यावरच जाऊन पडत आहे ! जो पुरुष अनेक सद्गुणांच्या जोरावर स्वतंत्र राष्ट्रांत सर्वांचा जीव कीं प्राण निःसंशय झाला असता, तो आज एखाद्या दरवडेखोराप्रमाणे तुरुंगांत खितपत पडावा, यापेक्षा आपल्या राजकीय हीनतेची साक्ष दुसरी कोणती हवी ? तें कांहीहि असो, पण एवढें मात्र खचित कीं, महाराष्ट्राच्या भावी पिढ्या ज्या कांही थोड्या महाराष्ट्रीय देशभक्तांचा नामनिर्देश अभिमानाने, कौतुकाने व गौरवाने करतील, त्यामध्ये त्या से. बापट यांची हटकून गणना करतील ! "

‘ प्रबोध ’ ता. ३१।१२।१९३३.



# आजीबाईंचे आचार-विचार.

( कु. कमल भागवत. )

[ तरुण पिढीने उतावीळपणाला आळा घातला व जुन्या पिढीने समजूतदारपणा धरला तर त्या कुटुंबांत सुखासमाधानाला काय तोटा ? ]

दुपारीं बारा वाजण्याची वेळ. त्यांतून मी घरांत एकटी. पुस्तक वाचण्याचा कंटाळा आल्यामुळे मी समोरच्या आजीबाईंच्या घरीं बसावयास गेलें. आजीबाईंचा मुलगा गांवांतल्या हायस्कुलांत शिक्षक होता. आजीबाई दादा [ आजीबाईंचे यजमान ] व त्यांचे दोन मुलगे पुण्यास राहात. पुण्यास प्लेग झाल्यामुळे पुण्याचें सर्व कुटुंब येथे राहावयास आलें होतें.

आजीबाईंचें खरें नांव कोणालाच माहीत नव्हतें. मग तें मला तरी कसें माहीत असणार ? त्यांचे मुलगेसुद्धा त्यांना ' आजीबाई ' या नांवाने हाक मारीत. त्यामुळे सर्व गांवांत त्या आजीबाई म्हणूनच प्रसिद्ध झाल्या. त्यांचा स्वभाव मनमिळाऊ, बोलका व आनंदी असल्यामुळे मला त्यांच्याकडे जाणें आवडे. लहानापासून मोठ्यापर्यंत त्या मोकळेपणाने बोलत. त्यांची एकंदर वागणूक इतर वृद्ध स्त्रियांपेक्षा वेगळी दिसल्याने मी त्यांची मुद्दाम ओळख करून घेतली होती.

मी गेलें तेव्हां त्या जेवीत होत्या. त्यांची सून इंदिरा जवळच पाटावर बसून जेवीत होती. पण आजीबाई मात्र जमिनीवर बसल्या होत्या. तें पाहून मी म्हणालें.

" आजीबाई, तुम्ही जमीनीवरशा बसलात. पाट तर सोवळ्यांत-सुध्दा चालतो. "

" तसं नव्हे ग. आता आमचं म्हातारपण झालं. आम्हांला पाट न् थाट पाहिजे कशाला ? शिवाय आताशा दोन तीन वर्षांपासून मी सोवळं नेशीत नाहीं. ओवळ्यानेच जेवतें."

त्यांच्या बोलण्याचें मला आश्चर्य वाटलें व तें माझ्या मुद्रेवर प्रगट झालें. तें जाणून त्या म्हणाल्या--

" त्यांत कांही चमत्कारिक नको वाटायला. मी सासूबाईंच्या वेळीं पुष्कळ सोवळें केलें. या सोवळ्यापायीं मुलांचीसुध्दा नीट निगा ठेवतां आली नाही. लहानपणची एक गोष्ट आठवली म्हणून सांगतें. एकदा मामंजी जेवायला बसले नी मी वाढीत होतें. सासूबाईंना पिठी हवी होती म्हणून त्यांनी मला समोरच्या कोनाड्यांतल्या डब्यांतून घालायला सांगितली. मी ती काढायला कोनाड्यापाशीं गेलें. तों खाली एवढंसं सूत पडलं होतं. त्यावर माझा पाय पडला. ती वर्दी मामंजींनी सासूबाईंना दिली. त्यावेळीं मला त्या खूप बोलल्या. तेव्हां माझ्या लक्षांत ती चूक आली. त्या दिवशीं त्या अपराधासाठी मला उपास घडला. त्यावेळीं मी सारी बारा वर्षांची होतें. तेव्हांपासून मी मनाशीं निश्चय केला कीं, मी आपल्या सुनांना इतक्या कडकपणें वागवणार नाहीं.

" तेव्हांपासून तुम्ही आपल्या सोवळ्या ओवळ्याच्या कल्पना बदलल्यात वाटतं ? "

" नाही. तो एक पहिला प्रसंग म्हणून ध्यानांत राहिला इतकंच. त्यानंतर मीं त्याबद्दल पुष्कळ विचार केला. सोवळ्याचा मूळ उद्देश स्वच्छता आहे. व तो खरोखरच चांगला आहे. मी धडधाकट होतें, तोपर्यंत सोवळं केलं. पण आता वयामुळे दुसऱ्याची मदत घ्यावी लागते. समज, मी आतां अंथरुणाला खिळलें कीं, मला या सोवळ्यांनी घालतात कीं ओवळ्यांनी ? आता दिवस बदलले आहेत. सोवळ्याच्या कडकपणामुळे व घामटपणामुळे त्याच्याविषयी नवीन मुलींना कंटाळा आला आहे. असं व्हायचंच. म्हणून मी परावलंबी झाल्यापासून स्वतःच सोवळं सोडून दिलं. मी म्हणतें स्वच्छता ठेवलीत म्हणजे झालं. शिवाय मला तो सोवळ्याचा देखावा आवडत नाही. सोवळें सोवळें म्हणायचं नी मोलकरणीने घातलेलं लुगडं नेसायचं ! "

त्या नेहमी पांढरीं पातळें नेसत. तींसुद्धा अगदी साधीं व बिन-कांठाचीं. त्यामुळे आम्हां सर्वांना त्याबद्दल आश्चर्य वाटे. त्याबद्दलची कुणकुण त्यांच्या कानांवर गेली असावी. माझी नजर त्यांच्या पातळाकडे गेलेली पाहून त्या म्हणाल्या, "आता हीं मी पांढरीं पातळें नेसतें. लुगडीं नेसणें सोडून दिलं. याचं पुष्कळांना नवल वाटतं. इकडेसुद्धा पहिल्यानदां तें विशेष आवडलं नाही. पण आता म्हातारपणीं वस्त्राची, खाण्यापिण्याची लालसा कमी नको का करायला ? म्हणून मी हीं पांढरीं वस्त्रें नेसतें. आमची लक्ष्मी [ मोठी सून ] वारल्यापासून मी दागिने घालण्याचें सोडून दिलें."

आजीबाईंची सांपत्तिक स्थिति साधारणच होती. तरी घरांत स्वावलंबन, टापटीप, काटकसर, इकडे सर्वांचें लक्ष असल्यामुळे त्यांना दुसऱ्याकडे तोंड वेंगाडण्याचा प्रसंग कधी आला नाही. अशी त्यांची सून सांगत असे. घरांत शिस्त व स्वातंत्र्य यांच्या मर्यादा लहानांकडून व वडिल माणसांकडून उभयपक्षीं सांभाळल्या जात असल्यामुळे मुलांचा व त्यांचा खटका उडण्याचा प्रसंग क्वचित्च येई. सर्व घरांत आनंदाचें व विनोदाचें साम्राज्य नांदत असे. बदललेली परिस्थिति नीट जाणण्याइतकें शहाणपण व व्यापक दृष्टि वडील माणसांत असल्यामुळे व क्षुल्लक कारणासाठी वडिलांच्या भावना दुखवावयाच्या नाहीत, असा समजूतदारपणा मुलांत असल्याने वादाचें वितंडांत रूपांतर झालेलें कोणींच पाहिलें नाही.

आजीबाईकडे जाऊन मीं सहज प्रश्न केला कीं, "संसार सुखाचा होण्यास काय करावें ?" तेव्हां त्या हसून म्हणाल्या, "अग तुम्ही इतकीं पुस्तकं वाचतां आणि मला ग काय हा प्रश्न विचारतां ? मीं कांही फारसें वाचलें नाहीं. पण अनुभवाने चार गोष्टी सांगतें एवढेंच. मी म्हणतें कीं, काळाचा ओघ ओळखून वागा ! नाहीतर कष्टी व्हाल. आतां मी माझंच उदाहरण सांगतें:—

"आमचा आण्णा अमेरिकेला गेला होता. तिथली शेतीची परीक्षा देऊन आला. तेव्हां मला पुष्कळ लोक म्हणाले कीं, "आजीबाई, तुम्हांला मायाच नाही. आण्णाला इतक्या दूर कसा हो पाठवितां ? शिवाय तो तेथें बाटेल. खाऊं नये तें खाईल." तेव्हां मीं म्हटलें, "आता तो का लहान

आहे ? तो शिकण्यासाठी दूर जातो आहे. त्याला वेडया मायेने कां अडवून ठेऊं ? त्याची जबाबदारी तो जाणतो. मी कांही बोललें नाहीं. आनंदाने त्याला आशिर्वाद दिला. पण तोसुध्दा समजूतदार आहे. तिकडून आल्यावर प्रथम त्याने प्रायश्चित्त घेतलें व मग घरीं आला. मी जर त्याला तिकडे जाऊं दिलें नसतें, तर आज त्याची जी बढती झाली ती झाली असती कां ? "

"पंख फुटल्यावर पिलाला स्वैरसंचार करूं देऊन आपण घरट्यांतून त्याच्यावर प्रेमाची दृष्टि ठेवणें हेंच मादीचं काम. त्याला प्रेमानं अडवून जखडून ठेवलं तर तें दुबळें होईल. जर त्यावेळीं संधि असतांना तो अमेरिकेला गेला नसता, तर आजच्या कपातीच्या दिवसांत बेकारांच्या संख्येंत आणखी एक भर पडली असती. माझ्या मुलाने चारी खंडांत जाऊन कीर्ति करावी असं मला वाटतं." हें बोलतांना त्यांच्या डोळ्यांत मला अभिमानाची चमक दिसली.


"तसेंच तरुण मुलींना मला या तीन गोष्टींविषयी विशेष सांगावेंसें वाटतें, तें म्हणजे आरोग्य, उद्योग व काटकसर. आरोग्याच्या दृष्टीने पाहतां त्यांची स्थिति मलातरी समाधानकारक वाटत नाही. त्या नटतील, मुरडतील, फिरतील. पण खऱ्या आरोग्याचें तेज मला एकीच्याहि अंगावर दिसत नाही. जरासा झिम्मा नाही तर फुगडी खेळायला लागल्या, तर त्यांना दम लागतो. माझ्या अंगांत जो उत्साह व उरक आहे, तो त्यांच्यांत नाही. तसेंच नवीन पिढींत आळसं फार भरला आहे. आम्ही पहांटे ४ वाजल्यापासून उठून रात्रीं १० पुढे निजत असूं. एकसारखें कांही काम चाललेलें असावयाचें. आता लवकर उठण्याची फार आरोग्यदायक संवय नाहीशीं होत चालली आहे. तुम्हांला सर्व आयतें व बिनकष्टानें मिळायला पाहिजे. बाळाला औषध घालाल ते सुद्धा आयतें. घुटी उगाळण्याचा कंटाळा. दळण आयतें चक्कींतून दळून आणायचें. मग आपले चांगले गहूं व दुसऱ्याचे हलक्या प्रतीचे गहूं याचें मिश्रण होऊन व तापून सत्त्व निघून गेलेली कणीक पदरांत पडली तरी चालेल. त्यापेक्षा लवकर उठून स्वतः जात्यावर दळले तर ? तसेंच काटकसरीचें महत्त्व कमी होत चाललें आहे. वेळेची व पैशाची काटकसर करायला शिकल्याशिवाय मनुष्य मोठा होणारच नाही. आपल्याइकडे

श्रीमंतीच्या भपक्यापायीं डामडौलापायीं अनाठायीं खर्च कितीतरी होतो. 'बडा घर पोकळ वासा' ही म्हण प्रत्येक स्त्रीचा डामडौल पाहिला म्हणजे दिसून येईल."

"मला असं वाटतं कीं, पै पैशाकडे अगदी कडक नजर दिल्याशिवाय आपली स्थिति सुधारावयाची नाही. थोडक्या उत्पन्नांत टाकठीकीनं राहण्याची कलाच आता शिकावी लागेल. मी म्हणतें, आरोग्य असल्याशिवाय उद्योग करायला हुरूप नाही व पुष्कळ उद्योग केल्याशिवाय संचय होणें शक्य नाही व संचय झाल्याशिवाय स्वास्थ्य लाभणार नाही. असे आपले माझे वेडीचे विचार आहेत."

आजीबाईच्या म्हणण्यांत मला पुष्कळसें तथ्य वाटलें.

[ अप्रकाशित ]



# भरति–ओहोटी.

तो नेहमी दुर्मुखलेला व एकलकोंडा असे. मातृनिधनाच्या तीव्र शोकामुळे उत्पन्न झालेली औदासिन्याची सूक्ष्म छटा त्याच्या मुद्रेवर नेहमी दिसे. त्याला हसविण्याचा प्रयत्न करून आमच्या मित्रमंडळांत ओढण्याचा प्रयत्न आम्ही कितीवेळ तरी केला. पण म्हणावें तसें यश कधीहि आलें नाही.

पण आज त्याच्याहि आयुष्यकालांतील वसंतकाल सुरूं झाला असें आम्हांला वाटलें. ज्याच्या मुखावर हास्याची पुसटती लकेरसुध्दा आम्हांला कधीहि दिसली नाही, त्याच्याच विनोद-सागराला भरति येऊन हास्याच्या तुफान लहरी उसळल्या. त्याच्या जीवनांत विलक्षण क्रान्ति झाली.

\+ + + +

त्याच्या आनंदाचें कारण काय होतें बरें ? एखाद्या तप-स्व्याप्रमाणे सर्वदा गंभीर व आत्ममग्न असलेल्या त्याला, यौवनाच्या पहिल्या बहरांत एक अभिनव व दिव्य स्वप्न पडलें होतें. तें त्यानें आम्हांला मोकळ्या मनाने सांगितलें. त्याला स्वप्नांत दिसलेल्या मनोहर मूर्तीसाठी एक सुंदर मंदिर बांधण्याचें त्यानें ठरविलें. त्या देवालयाची बांधणी कशी करावयाची याचीहि त्याने आम्हांला विस्तारपूर्वक कल्पना दिली. इतकेंच नव्हे, तर त्या भव्य मंदि-राच्या महाद्वारावर कोणतें कवन लिहावयाचें तेंहि त्यानें आम्हांला सांगितलें. तें काव्यहि त्या मंदिराच्या सौंदर्याला साजेसें होतें.

प्रत्येक गोष्टीचा काटेकोर विचार करणाऱ्या त्याला, कल्पनेची भरारी मारण्याची ल्हर कशी आली कोण जाणे !

\+ \+ \+ \+

त्या मनोहर मूर्तीच्या सौंदर्याने तो मोहून गेला होता हें खरें, पण ती मूर्तिहि अगदी निर्दोष व अद्वितीय नाही, याची त्याला जाणीव होती. त्यापेक्षाहि अनेक सुंदर मूर्ति त्यानें पाहिल्या होत्या. पण या मूर्तीच्या मुखावर जो शांत, प्रसन्न व मंदस्मित दर्शविणारा भाव होता, तोच त्याच्या भक्तिपूर्ण कोमल हृदयाला फार आवडला. आपल्या भक्ताच्या क्षुल्लक चुकीमुळे एकदम कोपायमान होणाऱ्या देवतेची मूर्ति कितीहि सुंदर व तेजस्वी असती तरी त्याला आवडली नसती !

\+ \+ \+ \+

त्याला चित्रकलेचा फार नाद होता. इतकेंच नव्हे, तर त्याच्यावर काव्यदेवतेची कृपादृष्टि होती. कोणत्याहि रमणीय पण करुण प्रसंगाचें चित्र रंगशलाकेच्या किंवा शब्दमाधुर्याच्या साहाय्याने हुबेहूब वठवून देण्याचे कामीं त्याचा हातखंडा असे. कारण त्याच्या आनंदांतहि शोकाची मधुर छटा संमीलित झालेली दिसे. गायनवादनाचीहि त्याला आवड होती. पण वेणुवादनांत तो विशेष प्रवीण होता. गायनवादनांतहि प्रणयगीताच्या उत्तान सुरांपेक्षा विरहगीताचा करुण स्वरच त्याला प्रिय असे. पौर्णिमेच्या चंद्रप्रकाशापेक्षा वद्य पक्षांतील उत्तररात्रीं पडणाऱ्या अपुऱ्या चंद्राच्या शांत प्रकाशानेच तो अधिक मोहित होत असे. पूर्णतेची अपेक्षा पण उणीवेची जाणीव यांच्या विलक्षण मिश्रणामुळे या विश्वाचा

संसार अखंड चालत असल्यामुळे त्याला पौर्णिमेचें पूर्णत्व तितकें प्रिय होत नसावें !

\+ \+ \+ \+

त्या मूर्तीच्या पूजनांत त्याचे कांही दिवस फार आनंदांत गेले. विशेषत: त्या मूर्तीच्या मानसचिंतनांत त्याला स्वर्गीय आनंदाची प्राप्ति होत असे. त्या मूर्तीचें यथातथ्य आलेखन चित्रकलेच्या साहाय्याने करावें अशी त्याची फार इच्छा होती. ती मूर्ति रेखांकित करण्यासाठी त्यानें एकाग्र चित्ताने बरेच दिवस जिवापाड श्रम केले. व तें चित्रलेखन अगदी पूर्ण झाल्यावर त्या देवतेला अर्पण करण्याचा त्याचा विचार होता. हृदयाच्या अन्त:र्गाभाऱ्यांत ज्या मूर्तीवर अखंड प्रेमाभिषेक होत होता, ती मूर्ति आपल्या प्रेममय कटाक्षाने आपणांस एक दिवस पुनीत करील, अशी त्याला फार आशा होती. पण अलोट भक्ति हेंच देवतेला प्रसन्न करण्याचें एकमात्र साधन या कलियुगांत असूं शकते काय ? त्याच्या दुर्दैवाने तिची कृपादृष्टि त्याच्याकडे वळली नाही. कारण त्या मूर्तीला जे कांचनाचे, मौक्तिकाचे व रत्नांचे अलंकार प्रिय होते, त्यांचें उपायन या निस्सीम पण निष्कांचन भक्ताला कसें देतां येणार ? त्या देवतेला कांचनगिरीवर चढविणारा तिचा भक्तच तिला प्रिय झाला. तें चित्र तसेंच अपूर्ण राहिलें. त्याच्या विनोदसागराला कायमची ओहोटी लागली. त्याच्या हृदयाकाशांत उगवलेल्या आशाचंद्रालाच दुर्दैव–राहूनें कायमचें ग्रासून टाकलें. त्याच्या महत्त्वाकांक्षी व ध्येयवादी आयुष्याला लागलेल्या प्रणयभंगाच्या ग्रहणांतून त्याची मुक्तता कधी तरी होणार आहे काय ?

# गहाळ झालेली भेट.

[ ले. त्रि. त्रि. भागवत. ]

“श्री, आज गांवांत येणार ना? तुझं ‘प्रॅक्टिकल’ संपल्यावर जाऊं. पांच वाजतां आटोपेल?”

“आज गांवांत काय काम आहे रे चंद्रा? शिवाजी मंदिरांत आज व्याख्यानाचा कार्यक्रम दिसतो आहे सहा वाजतां. आपण नाहीं बुवा येणार तिकडे. या पुण्याच्या वक्त्यांना नुसती बडबड करायला सांगा. कृतीच्या नांवाने पूज्य!”

“पुण्याच्या वक्त्यांवर कां बुवा एवढा गहजब? पण आज कांही मला मंदिरांत नाही जायचं. त्या दादासाहेब गुपचुप्यांचा भेटीचा डबा पोचविण्याची कामगिरी आहे आज.”

“वाः! ती कामगिरी शेवटीं तुझ्या माथीं बसली तर! पत्ता बित्ता तरी नीट दिला आहे ना बरोबर?”

“अरे, घर नंबर मी नीट विचारून घेतला आहें. आणि पेठहि माहीत आहे.”

“भले महाराज! आपण पुणं हें काय आपलं सारंगपूर समजतां वाटतं? नुसत्या घर नंबरावरून पुण्याला घर नेमकं शोधून काढणं हें एक मोठं दिव्य आहे दिव्य. गडकऱ्यांनी सांगितलेल्या ‘मानापमानाच्या पदांचा अन्वयार्थ लावणें, सदर्न मराठ्याच्या तिसऱ्या वर्गांतून प्रवास करणें’ या शिक्षेच्या जोडीला बसण्याइतकीच पुण्याला घर नंबर हुडकून काढण्याची कामगिरी दुस्तर आहे बरं का? पण तूं ही गुपचुप्यांची भेट पोचविण्याची नसती ब्याद कशाला लावून घेतलीस पाठीमागं?”

“अरे, आण्णासाहेब स्वतः घेऊन मजकडे आले, तेव्हां मला तोंडावर नाही म्हणवेना. मलासुद्धा भारी राग आला होता म्हाताऱ्याचा!”

' मागे एकदा त्यांनी त्यांच्या नारोपंताला पाठविला होता माझ्याकडे पत्र देऊन. त्यांचे ते जावई असतात ना इथे सोमवार पेठेंत ? त्यांना आपली खुशाली कळवावी अशी आण्णांना भारी तळमळ लागली होती ! सोमवार पेठेचा पत्ता पाहिल्यावर मला अगदी संताप आला. हें पत्र पोचविण्याला मला वेळ होणार नाही असं मीं त्या नारोपंताला पुष्कळ सांगून पाहिलं.पण आण्णांच्या तालमींत तयार झालेले, व तांबड्या पैशाला प्राणापलीकडे जपणारे त्यांचे चिरंजीव आपली चिकाटी सोडीनात. ते म्हणाले, " केव्हांहि द्या हो हें पत्र. आपली कांही घाई थोडीच आहे ? तसं आमचं महत्त्वाचं व तातडीचं काम कधी नसतंच बरं का ! तें सगळं तुमच्यासारख्याकडे ! "

" या लेकांना कांही कल्पना असते का रे शहरांतील अंतराची ? कुठं फर्ग्युसन कॉलेज व कुठं सोमवार पेठ ! तूं त्यांना म्हणावंस कीं जर महत्त्वाचं पत्र नाही, तर देताच कशाला आमच्याबरोबर ? आमचा हेलपाटा तरी वाचेल ! "

" छे बुवा ! त्यावेळीं मला वादविवाद करण्याचा अगदी वीट आला. मीं सरळ त्या नारोपंताला सांगितलें कीं, तुम्हांला सध्या सवड नसेल, तर हा एक आणा मी देतों. तुम्ही स्वतःच तिकीट लावून तें पत्र हलक्या हाताने पेटींत टाका ! इतकं खोचून बोलल्यावर स्वारी वरमली व रागाऊन चालती झाली. "

" अरे, तो नाऱ्या म्हणजे आपल्या बापाची सुधारून वाढविलेली द्वितीय आवृत्ति आहे. पै वाचविण्याकरितां दुसऱ्याला वाटेल तो त्रास देईल. बरं ते कांही कां असेना. त्यांच्या नांवाने शंख करीत आज सदाशिव पेठेला प्रदक्षिणा घातली पाहिजे खरी ! मग आज पांच वाजतां येशील ना माझ्या खोलीवर ? "

" अच्छा. तुला एकट्याला भटकंती करावी लागूं नये, म्हणून मी येईन बरोबर. नाहीतर आज बरेच दिवसांनी टेकडीवर फिरायला जाण्याचा विचार होता आज ! "

वरील संवाद फर्ग्युसन कॉलेजच्या वसतिगृहांतील माझ्या खोलींत श्रीधर व मी ( भालचंद्र ) यांचेमध्ये चालला होता. आम्ही दोघेहि एकाच

गांवचे. सारंगपूरच्या हायस्कुलांतून दोघेहि मॅट्रिक पास झालों होतों. श्रीधर हा इंटर सायन्सच्या वर्गांत होता व मी यंदाच प्रिव्हीयसच्या वर्गांत दाखल झालों होतों. दिवाळीची सुट्टी संपून आम्ही नुकतेच कॉलेजच्या दुसऱ्या सहामाहीसाठी पुण्यास आलों होतों.

ठरल्याप्रमाणे आम्ही दोघेहि मित्र दादासाहेब गुपचुप्यांना भेटीदाखल आण्णासाहेबांनी दिलेला डबा घेऊन सदाशिव पेठेंत दाखल झालों. पण नेमक्या नंबरचें घर शोधून काढणें हें भुलभुलय्यांतून बाहेर पडण्यापेक्षासुध्दा किती कठीण आहे, याचा प्रत्यय आम्हांला ताबडतोब आला. एका बाजूच्या घरनंबराचा पाठलाग करीत जावें, तों जरा गल्ली आडवी वळली कीं, पुढल्या नंबराचा पत्ता लागू नये! नवीनच नंबर सुरू व्हावा. बरें, समोरचे घर-नंबर पाहावे, तर अगदीच वेगळे. वाळवंटांतून प्रवास करणाऱ्या तृषार्त मनुष्याची मृगजळ पाहून जी फसवणूक होते, तसाच अनुभव आम्हांला आला. बरें, कोणांला विचारावें, तर त्यानें म्हणावें, " घर नंबर विचारूं नका बुवा. पण तुमचं घर नागनाथाच्या पाराजवळ आहे कीं, हौदाजवळ आहे का पेरूच्या गेटाजवळ आहे, अशी कांहीतरी खूण सांगा." आम्ही घर नंबर आणला असल्याने बाकीचा पत्ता विचारण्याची जरूर आम्हांला वाटली नाही. त्यामुळें खास पुणेकरांच्या ओळखीचें असें जवळचें ठिकाण आम्हांला सांगतां येईना.

अशा रीतीनें पुष्कळशी भटकन्ती केल्यावर व आण्णासाहेबांच्या नांवाचा अनेकवार उद्धार केल्यावर सायंकाळीं दिवेलागणीच्या सुमाराला एकदाचा आम्हांला हवा असलेला घर नंबर सांपडला. नोव्हेंबर महिन्याचे दिवस असल्यामुळे दिवस लवकर मावळण्याच्या बेतांत होता.

एखाद्या धनलोभी माणसाला भूमिगत द्रव्य अचानक सांपडावें, तसा आनंद आम्हांला झाला. दाराच्या चौकटीवर नंबर नीट पाहिल्यावर आम्ही दारांत शिरलों, तों आंगण वगैरे दिसेना. समोरच वरच्या मजल्यावर जाण्यासाठी जिना होता. दाराच्या उजव्या बाजूला पानपट्टीचें दुकान होतें. ग्यासबत्तीच्या दिव्याच्या प्रकाशांत दुकानांतील मालाची मांडणावळ मोहक वाटली. दुकानांत बसलेला पोऱ्या अडकित्त्याने सुपारी कातरीत कवालीची तान घेत

होता. आमच्याकडे त्याने किंचित् मिस्किल व आश्चर्यचकित दृष्टीने पाहिलें, असा मला भास झाला.

श्रीधरच्या मागे भेटीचा डबा हातांत घेऊन मी शिस्तींत जिना चढत होतों. जिन्याच्या वरच्या तबकडींत चढतांच डाव्या बाजूला एक रंगीबेरंगी पडदा लावलेली खोली होती. उजव्या हाताला प्रशस्त दिवाणखाना होता.

दिवाणखान्यांत उंची गालिच्याची बैठक असून भरपूर उजेड देणारा ग्यासचा दिवा लावलेला होता. दिवाणखान्याच्या कोपऱ्यांत नानाप्रकारचीं वाद्नाचीं आयुधें गवसण्या घालून ठेवलीं होतीं. दिवाणखान्यांत चार पांच श्रोते बसले असून सिगारेटच्या वासाने वातावरण भरून गेलें होतें. इतक्यांत सारंगीच्या सुरेल साथीबरोबर गोड जनानी कंठांतून ' राधे कृष्ण बोल मुखसे ऽ ऽ ' या पदाची सुरवात झालेली आमच्या कर्णपथावर आदळली.

तो चमत्कारिक व अनपेक्षित देखावा पाहून आम्ही अगदी भांबावून व घाबरून गेलों. पण भालचंद्राने घाईने माझा हात ओढून एकदम पवित्रा फिरवला. व आम्ही जिन्याच्या खालच्या पायरीवर कसे आलों तें आम्हांलासुद्धा सांगतां येणार नाही. इतकेंच नव्हे तर, त्या दारापासून दहा पांच घरें पलीकडे असलेल्या गल्लींत शिरेपर्यंत आमच्या जिवांत जीव नव्हता. क्रूर श्वापदाने पाठलाग केलेल्या हरिणाप्रमाणे आम्ही धूम ठोकीत पळत होतों.

या धावपळीच्या गडबडींत भेटीचा डबा जिन्यांत कोठे उडाला, याची कांही शुध्द मला राहिली नाही. रस्त्यांत जो पहिला टांगा दिसला, त्यांत आम्ही जवळ जवळ उडी मारून बसलों. व " फर्ग्युसन कॉलेज " असें घोगऱ्या आवाजांत फर्माविलें.

आमची धांवपळ पाहून त्याची काय कल्पना झाली असेल, तें कांही सांगतां येत नाही. पण तो जरा बेपर्वाईच्या उद्धत स्वरांत म्हणाला," साहेब, बारा आणे पडतील! घोडं सोडण्याचा वखत झाला आहे. "

" अच्छा! जलदी चलो! " आम्ही दोघेहि ओरडलों.

आमची मान्यता दिसतांच टांगेवाल्याने चाबूक फडकारला. आमच्यामागे काय गडबड झाली असेल, तें परमेश्वराला माहीत. आम्ही खोलींत पोचतांच एकमेकांच्या हातांवर टाळ्या देऊन पोटभर हसलों.

घर नंबराचा घोटाळा कसा झाला, यांचें मला राहून राहून नवल वाटलें. माझ्याजवळ नारोपंतांनी पत्ता लिहिलेलें पाकीट होतें. त्यावर आम्ही भेट दिलेल्या घराचा नंबरच लिहिला होता. म्हणून खात्री करण्यासाठी आण्णासाहेबांनी दादासाहेब गुरुचुप्यांचा दिलेला पूर्ण पत्ता मी डायरींत लिहून घेतला होता, तो शोधून काढला. त्यावेळीं त्यांनी दिलेल्या पत्त्याच्या नंबरामध्ये व नारोपंतांनी पाकिटावर लिहिलेल्या घरनंबरामध्यें फक्त शंभराचा फरक आहे, असें मला आढळून आलें.

धांदरट नारोपंतांनी पत्त्याच्या नंबरामध्ये शंभराची चूक करून आमची सोळा आणे फजिती केली.

आम्ही त्यांचा डबा न पोचविल्याबद्दल व निदान रिकामा डबा परत न केल्याबद्दल आण्णासाहेबांनी आमच्या नांवाने खूप खडे फोडले. आम्ही सर्व मित्रमंडळींसह डब्यांतील लड्डूंवर मुद्दामच हल्ला करून सर्व माल फस्त केला, अशी त्यांची ठाम समजूत आहे. भालचंद्राने नारोपंताची पुष्कळ खरडपट्टी काढली. त्यानंतर मात्र त्यांचेकडून पुन्हा कोणत्याहि भेटीची ब्याद मजकडे आली नाही. बारा आण्याच्या भुर्देडाबद्दल मिळालेली ही भरपाई काय थोडी आहे ?



# चुकामूक.

पत्रांच्या चुकामुकीचा अनुभव कोणास नाही ? बऱ्याच दिवसांत आपल्या घराकडचें किंवा प्रिय मित्रांचें पत्र न आल्यामुळे त्या चिंतातुर मनस्थितींत आपण त्यास सविस्तर पत्र तातडीने टपालांत टाकावें व टाकून घरीं येतो, तों त्यांचेंच पत्र कोणीतरी आपल्या हातांत आणून द्यावें ! खरोखर त्या चुकामुकीचा किती संताप येतो ! ही चुकामूक अगदी थोड्या अवकाशाने झाली असेल तर त्याची चुटपूट जास्तच लागून राहते !

महत्त्वाच्या व तातडीच्या कामासाठी आपण एखाद्याला भेटावयास जावें व पांच मिनिटांपूर्वीच तो बाहेर गेलेला असावा. त्यावेळीं आपल्या मनाची किती चमत्कारिक स्थिति होते ?

खूप धावपळ करूनसुध्दा ‘ लोकल ’ चुकली, व स्टेशनावर तब्बल अर्धातास थांबण्याचा कंटाळवाणा प्रसंग प्राप्त झाला, किंवा घरून वेळापत्रकाप्रमाणे पांच मिनिटें आगाऊ प्लॅटफार्मावर यावें व ‘ सन्डे टाइम ’ ची पाटी दिसून आखलेले सर्व कार्यक्रम फिरकटावे म्हणजे मुंबईकरांची जी संतप्त पण शोचनीय स्थिति होते, तिचें वर्णन कसें करावें ?

पण या आयुष्यांत प्रेम व त्याची पूर्ति, ध्येय आणि सिध्दि मानवी आशा व देवाची इच्छा यांची जर अशीच चुकामूक होणार असेल तर ? ज्यांच्या आयुष्यांतील अत्यंत महत्त्वाच्या प्रसंगांत अशी चुकामूक होत नसेल, ते खरे भाग्यवान् ! पण अशा भाग्यवानांची संख्या किती असेल ?

परंतु सामान्यतः अशा चुकामुकीचा अनुभव आलेले लोक किती तरी आढळतील ! दिगंत कीर्ति करून गेलेल्या इतिहास-

प्रसिध्द लोकांच्या चरित्रांतसुध्दा असे प्रसंग नाही कां आढळत ? वाटर्लूच्या लढाईत नेपोलियनचा पराभव कां झाला ? तर त्याच्या दुय्यम सेनापतीच्या सैन्याची व त्याची अपरिहार्य चुकामूक ! पण याचा परिणाम काय झाला ? टुलरीजच्या भव्य राजवाड्यांत नंदनवनासारखीं सुखें भोगणारा हा नरेंद्र आयुष्याच्या उत्तर-कालांत सेंट हेलीना बेटांतील एक सामान्य बंदिवान् झाला ! हा सर्व भयंकर परिणाम कशाचा ? केवळ मानवी अपेक्षा व दैवाची इच्छा यांची चुकामूक !

तो रशियन लोकांच्या गळ्यांतला ताईत झालेला ट्रॉट्स्की पाहा ! दैवाने दगा दिल्यामुळे आज देशोदेशीं भटकतो आहे ! जर्मनीच्या महत्त्वाकांक्षी कैसरचें उदाहरण डोळ्यांपुढे आणा ! सर्व जगावर स्वामित्व गाजविण्याच्या अचाट महत्त्वाकांक्षेने प्रेरित होऊन अखिल जर्मन राष्ट्र ज्यानें युध्दाला सज्ज केलें, ज्याच्या एका शब्दाने महायुध्दाचा प्रचंड वणवा पेटला, तोच कैसर दैवाच्या दुर्विलासामुळे आज केवळ सामान्य नागरिकाचें जीवन कंठीत आहे ! हा सर्व खेळ कशाचा ? मानवी प्रयत्न व परमेश्वराची कृपा यांची चुकामूक !

केवळ ‘ चुकामूक ’ या शब्दावरून माझ्या मनांत विचारांचा केवढा पसारा उत्पन्न झाला ? कांही वेळा आपलें मन एखाद्या तंतुवाद्याप्रमाणे इतकें नाजूक व परिणामक्षम झालेलें असतें कीं, एखादा सूक्ष्म आघातहि विचारांची अनेक वर्तुलें निर्माण करण्यास समर्थ होतो ! पण त्या मध्यबिंदूंत व शेवटच्या वर्तुलांत केवढें तरी अंतर असतें ! तसाच प्रकार वरील विचार-तरंगाचा झाला नाही काय ? कोठे पत्रांची चुकामूक व कोठे महत्त्वाकांक्षी पण दुर्दैवी कैसर !

# अनुतापाचे अश्रू.

( ले. वि. वि. भागवत. )

"गोपाभाऊ, मला मारत आहेत रे हे ! धाव ! दुष्टा, मला मारतोस हं ! "

मी माझ्या ओसरींत विचार करीत सचिंत बसलों असतां ओट्यावर असलेल्या माझ्या वृद्ध मावशीने तार स्वराने मारलेली ही आरोळी मीं ऐकली. मनाला वाईट वाटलें. ही आरोळी ऐकल्यावर कोणीहि धावून आलें नाही. कारण माझी मावशी सत्तरीच्या घराला पोचली असून तिला भ्रम झालेला होता. त्या अवस्थेंत ती अशा हाका नेहमी मारीत असल्यामुळे तिचा आवाज सर्व आळीच्या पूर्ण परिचयाचा झाला होता. ती दिवस रात्र वाटेल तसे ओरडे, हाका मारी, गाणी गाई भजन करी. त्यामुळें तिच्या ओरडण्याचें लोकांना कांहीच वाटत नसे. तिचें वय सत्तरीच्या घेताला असलें, तरी आवाज मात्र खणखणीत होता. तिच्या रात्रीच्या आरडाओरडीने मात्र आळींतील सर्व लोकांना पराकाष्ठेचा त्रास होई. पण त्या आळींतील प्रत्येक कुटुंबाला माझ्या परोपकारी व कष्टाळु मावशीने थोडें तरी साहाय्य केलें असल्यामुळे सर्वांना तिची करुणा येई. वृद्धापकालांतील या तापदायक आपत्तीबद्दल जो तो मनापासून हळहळे.

मी घाईने उठलों. ओट्यावर येऊन पाहतों तों ती आपल्या अंगावरील पांघरूण दूर करण्याची धडपड करीत स्वतःला अधिकच गुरफटून घेत होती. तिचा देह केवळ अस्थिचर्म झाला होता. म्हातारपणामुळे सर्व अंगावर सुरकुत्या पडल्या असून काळ्या निळ्या शिरा स्पष्ट दिसत होत्या. मूळचे घारे डोळे मात्र अधिक पाणीदार व उग्र झालेले होते. तिला कपड्यालत्त्याची शुध्द नसे. आल्यागेल्याची ओळख नसे. स्वतःच्या स्मृतींत साठलेल्या विसं-

गत स्मृतिशेषांच्या विचित्र जगांत तिचें मन गुंतलेलें असे. तिला तशा विचित्र वेषांत पाहून लहान मुलें तर घाबरतच, पण मोठी माणसेंहि प्रथम दर्शनी दचकत असत. कारण कोणीहि दृष्टीसमोर आल्याबरोबर खड्या सुरांत तिच्या प्रश्नाची उलटी सुलटी फैर झडल्याशिवाय राहत नसे.

मी जवळ आलेला पाहिल्याबरोबर तिनें माझें धोतर जोराने पकडलें. व पांघरुणाचा बोळा आपल्या अंगावर एका हाताने कसाबसा ओढून घेत ती म्हणाली, " अरे मला जाळ. आग लाव. आधी आग लाव. विस्तव आण जा लवकर ! " मी तिच्याजवळ बसून तिला शांत बसण्याची हाताने खूण केली. पण ती अधिकच रागावली व म्हणाली, " मला गप्प बसवतोस काय ? जा, लवकर. विस्तव आण !......अरे सोन्याबापू, हा मला मारतो आहे ! चांडाळा थांब. " असें म्हणून ती उठून बसली व मला मारण्याचा प्रयत्न करूं लागली. तिने माझ्या मुलींना हाका मारण्याचा सपाटा चालविला " चंद्रे, शांते, प्रभे ! आहेस कीं मेलीस ! "

तिची अशी अवस्था होऊन आज दीड वर्ष झालें होतें. तिच्या झोपेच्या–गुंगीच्या–वेळाखेरीज ती सारखी बडबडे. कधी कधी अपशद्बांचा इतका भडिमार करी कीं, विचारतां सोय नाही. आजपर्यंत उभ्या आयुष्यांत जिने दुसऱ्याला उद्देशून अपशब्द तर काय पण कठोर शब्दहि उच्चारला नसेल, तीच मावशी या म्हातारपणीं अगदी अभद्र शिव्या देते हें पाहून मन अगदी उद्विग्न होई.

तिला जेवायला घालणें खरोखर एक दिव्य होतें. तिच्या मनात असलेल्या कल्पनांचा आरोप ती ताटांतील पदार्थांवर करी. ती घट्ट तूप मागे. परंतु तें वाढलें तरीहि त्याला भातच समजून ती ओरडे. " भिकारड्या, भाजी कां नाही केलीस ? हात मोडले होते होय ? तुमच्याकडे मिळणार आहे काय खायला ! दळिद्री रांडेचे ! "

पण अजूनहि तिच्या जिभेला रुचि चांगली असे. ताटांतले सर्व पदार्थ मिठासुद्धा एकत्र कालवून ती त्याचा एक काला करीत असे. व जेवण खारट झालें म्हणून शिव्या देई.

कधी कधी मात्र तिच्या मनांत इतका सुसंगत व तर्कशुध्द विचार येई कीं, आम्हांला फारच आश्चर्य वाटे ! पण मेंदूची ही सावधानता फार अल्प

काळ टिके. एके दिवशीं आमच्या शेजारच्या बिऱ्हाडांतील पाहिलटकरीण आपल्या लहान बाळकाला मागे ठेवून दोषी तापाला बळी पडली. ही हकीकत मावशीला आम्हीं सांगितली नाहीं. पण समोरच प्रेतयात्रेची तयारी चालू असल्यामुळे तिला ती गोष्ट कळली. तेव्हां आश्चर्य, दुःख व राग यांनी मिश्रित अशा स्वराने ती म्हणाली, "काय मेला यम तरी आहे! डोळे फुटले त्याचे! येवढ्या लग्न झालेल्या मुलीला घेऊन गेला! पण इतक्या जवळ आला तरी मी कशी त्याला दिसलें नाहीं?"

पण असे प्रसंग फार थोडे.

मावशीच्या भेटीला व समाचाराला पुष्कळ लोक येत. त्यावेळीं हळहळून जो तो म्हणे, "आजीबाई लवकर जातील तर सोन्याहून पिवळं होईल. पण देवाला अजून दया येईना. काय मागच्या जन्मींचं पाप आडवं येतंय कुणास ठाऊक!"

बालपणीं आई वारल्यापासून मावशीनेंच माझें संगोपन केलें होतें. मजकरतां नानाप्रकारचे कष्ट करून तिनें मला शिक्षणहि दिलें होतें. अर्थात् तिच्या शुश्रूषेला मी कधींच कंटाळलों नाहीं. पण तिचे शारिरिक भोग मला पाहवेनात.

तिच्या भ्रमिष्टावस्थेला वर्ष दीड वर्षांचा अवधि लोटला. दररोज दुपारीं ऑफिसांतल्या आंकडेमोडीच्या नोकरीचा त्रास व घरीं मावशीची सारखी बडबड. घरांत पत्नी व मुली यांखेरीज दुसरें कोणीहि वडील माणूस नव्हतें. व तसे बोलावून येण्यासारखे निकटचे अनुभवी व मेहेनती आप्त कोणीच नव्हते. त्यामुळे घरांत त्यांनाहि पराकाष्ठेचा शारिरिक त्रास व मानसिक उद्वेग होई. अशा स्थितींत मी जवळजवळ दीड वर्ष शांत चित्त ठेवून काढलें. सौभाग्यवतीनेंहि सासूबाईंची सेवा मनःपूर्वक केली. मुलींनीहि आजीच्या शुश्रूषेला दुरून हातभार लावला.

अशावेळीं आमच्या ऑफिसांतल्या वरिष्ठाची बदली झाली. त्यांच्या जागीं दुसरे तडफदार व तापट गृहस्थ आले. व मंदीच्या काटकसरीची झळहि आमच्या ऑफिसला लागली. ऑफिसांतले दोन कारकून कमी करण्यांत येऊन त्यांचें काम राहिलेल्या कायम नोकरांत वाटून देण्यांत आलें. त्यामुळे माझ्यावरील कामाचा बोजाहि वाढला.

घरांतल्या व बाहेरच्या अशा दुहेरी कात्रींत सांपडल्यामुळे माझें चित्त-स्वास्थ्य पार बिघडून गेलें. क्षुल्लक कारणावरून मी संतापून जात असें माझा स्वभाव चिडखोर झाला आहे, असें माझे स्नेही मला म्हणत. ऑफिसच्या कामांत दररोज रात्रीं होणाऱ्या जागरणामुळे चुका होत, व साहेबांच्या शेलक्या विशेषणांचा अहेर स्वीकारण्याचा प्रसंग वारंवार येत असे. रोजच्या दगदगीने सौभाग्यवतीची प्रकृतिहि खालावली होती.

माझ्या मनांत अलीकडे विलक्षण विचार येत. विलक्षण स्वप्नें पडत. मला नेहमी असें वाटे. मावशीच्या जीवनाची नदी वार्धक्याच्या उतारावरून घसरत शेवटी मृत्यूच्या महासागराला मिळणार. व्याधीच्या व वार्धक्याच्या दोन वेगवान् प्रवाहांमुळे उत्पन्न झालेल्या आवर्तांत सांपडलेली मावशीची जीवन–नौका मृत्यूच्या तळाशीं कधीतरी जाणार! तिच्या आयुष्याचा दिवा मृत्यूची झुळूक लागून कधीतरी विझणार!.........पण त्याला कालगति किती लागेल? तिची अशी विटंबना थांबविण्यासाठी मला कांहीच करतां येणार नाही काय?

या विचारांनी माझें मन अस्वस्थ होई. मावशीचा मृत्यु लवकर कसा आणतां येईल हा विचार माझ्या मनांत तरी कां यावा? किती कृतघ्नपणा आहे हा! माझें मन किती नीच कोटीला जात आहे, याची मला खंत वाटे! पण दुसरें मन म्हणे—आतां मावशीला मृत्यु हाच आधार. तोच तिचा खरा हितकर्ता. त्याच्याच कृपेने तिला चिरशांतीचा लाभ होईल. या दारुण अपेक्षेतून व करूण विटंबनेंतून तिची सुटका करावयाला दुसरा कोण समर्थ आहे?

यावेळीं कवि यशवंताची '**मृत्यूस**' ही कविता माझ्या अगदीं ओठांवर असे.

"जीवास सखा तूंच, खरा आश्रयदाता कीं प्रेमळ माता.
कां घोळ असा घालिसि? ये धावत मृत्यू! घाली न हुतूतू."

एके दिवशीं रात्रीं ऑफिसचें काम घरीं आणून तें मी करीत बसलों होतों. त्या दिवशीं तर तिच्या बडबडण्याचा व दांडगाईचा कहर झाला. मी जवळ जाऊन तिला शांत करूं लागलों. तिनें माझ्या खाडकन् थोबाडींत मारली. त्यामुळे मी चांगलाच रागावलों. तिच्याजवळ जाऊन तिचे दोन्ही

हात मी घट्ट पकडून ठेवले. म्हणून ती रागाने माझ्या तोंडावर थुंकली. मी अगदी अनावर झालों. मी तिचे हात सुताच्या जाड दोरीने बांधले व बळेंच ओढून आणून तिला अंथरुणावर निजविले. तिची बडबड सुरू होती. व माझेवर एकसारख्या शिव्यांचा भडिमार चालला होता.

तिचें त्या दिवशींचें वागणें मला फार त्रासदायक झालें. माझें डोकें संतापाने फिरून गेलें. मी दांत ओठ खात मनांत म्हटलें, " मावशी, झाली एवढी शोभा पुरे झाली. यापुढे तुला माझ्या घरांतील शांतीचा व मानासिक स्वास्थ्याचा भंग करण्याचा काय अधिकार आहे ? जा. लवकर मर जा. तूं ज्या दिवशीं मरशील, तो दिवस मला सणासारखा वाटेल. त्या दिवशीं तुझी व माझी दोघांचीहि विटंबना एकदाची संपेल. माझ्या पाठीशीं लागलेलि ग्रह-दशा पुरी होईल. पण तो दिवस लवकर येईल, अशी खटपट मला केली पाहिजे. मी ती करणार. पापपुण्य मी कुच जाणत नाहीं.........तुझा मृत्यु लवकर आणणें हेंच खरें पुण्यकर्म आहे ! संतापाने डोक्याच्या शिरा उडत होत्या. डोक्यांत विकाराने थैमान घातलें होतें. मीं तिला मृत्यूच्या स्वाधीन करण्याचा दांत ओठ खात निश्चय केला.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं मी जरा उशीरानेच उठलों. त्या रात्रीं मला कितो तरी स्वप्नें पडलीं. गुप्त हेरांच्या चातुर्याच्या गोष्टी मी पुष्कळ वाचल्या होत्या. त्यामुळे खुनी लोकांनी केलेल्या मनुष्य हत्येचे किती तरी प्रकार माझ्या स्वप्नसृष्टींत पिशाच्च्याप्रमाणे नाचत होते. सकाळीं आठ साडे-आठाच्या सुमारास पत्नीनें मला घाबऱ्या घाबऱ्या जागें केलें.

" हें पाहा, लवकर जाऊन डॉक्टरांना घेऊन या. सासूबाई अगदी निपचीत पडल्या आहेत. रोज त्या लवकर जाग्या होतात. पण आज नुसत्या हूं हूं करीत एकसारख्या कण्हत आहेत. त्यांना अर्धांगाचा दुसरा झटका आला वाटतं ! त्यांच्या चेहेऱ्याच्या अर्ध्या भागावरून वारा गेल्यासारखा दिसतो. काल रात्रीं आपण कां त्यांच्या हाताला दोरी बांधली होती ? आज सकाळीं मीं ती सोडली. त्यांच्या हातावर कितीपण काळेनिळे वळ उठले आहेत ! "

सौभाग्यवतीचें बोलणें मी शून्य दृष्टीने ऐकत होतों. तिचें बोलणें माझ्या डोक्यांत शिरतच नव्हतें.

" उठायचं ना ? " सौभाग्यवती म्हणाली. " आज डोळे किती पण लाल झाले आहेत ? आपल्या प्रकृतीची भारी हेळसांड चालली आहे. मला तर सासूबाईंचा कित्येक वेळां अगदी राग येतो. जीव वैतागून जातो. पण आपली प्रेमळ शुश्रूषा व सोशीकपणा पाहून धीर येतो. सगळे लोक म्हणतात —आपण होता म्हणूनच इतकी सेवाचाकरी केलीत. नाहीतर प्रत्यक्ष आई-कडे ढुंकून न पाहणारे हरीचे लाल काय थोडे आहेत ? सासुबाईंचें भाग्य खरेंच थोर ! "

मी शांतपणें उठलों. मावशी एका कुशीवर अगदी निपचित पडली होती. तिच्या अर्ध्या अंगाची शक्ति पार नाहीशी झाल्याचें मला आढळून आलें. तिचे डोळे उघडे होते. पण भान मुळीच नव्हतें. ती बोलण्याचा प्रयत्न करी, तेव्हां तिची जीभ आंतल्या आंत लडबडे.

तिची ती अवस्था पाहतांच माझ्या नेत्रांत चटकन् अश्रु उभे राहिले. काल रात्रींच्या सैतानी विचारांबद्दल माझी मलाच भयंकर घृणा आली. मी तिला हलवून पाहत " मावशी, ऊठ. " अशी करुणामय वाणीने विनवणी करूं लागलों.

मी डॉक्टरांकडे जातांनाच मनांत समजलें कीं, मावशी थोड्या तासांची सोबती आहे. त्यांनीहि तोच अभिप्राय दिला.

दुपारीं बाराच्या आंतच सर्व ग्रंथ आटोपला.


मी मावशीची फारच चांगली सेवा शुश्रूषा केली म्हणून जगाने माझी फार स्तुति केली. पत्नीचि तशीच कल्पना आहे. पण शेवटच्या रात्रीं माझ्या मनाचें तारूं किती तुफान भडकलें होतें, याची कोणाला तरी कल्पना आहे काय ? विकाराच्या वावटळींत सांपडल्याने माझ्या मनांत जो सैतानी विचार आला, त्या पापाला कोणतें प्रायश्चित्त घेतलें म्हणजे माझ्या मनाला शांति प्राप्त होईल ? माझ्या कृतघ्नपणाचा व अधमपणाचा पर्वत इतरांना कसा दिसणार ? त्याच्या ओझ्याने मी तळमळत असतों. माझ्या अविरत अश्रुधारा पाहून लोक मला हळवा म्हणतात. माझ्या निस्सीम प्रेमाची स्तुति करतात. पण माझ्या मनावरचें दडपण दूर व्हावें म्हणून माझ्या अनुतापाच्या अश्रूंची ओळख मी जगाला करून देत आहें !

( अप्रकाशित )

# वाढदिवस.

इंग्रजी कालगणनेप्रमाणे आज माझा वाढदिवस. वाढदिवसाचा उत्सव सर्वत्र मंगल व आनंददायक समजला जातो. पण आज माझें मन उल्हासित कां असूं नये ? परमेश्वरी इच्छेने या जगांत जीवनाचा अनुभव आज इतकीं वर्षे घ्यावयास मिळाला हा भूतकाल जरी मला ज्ञात असला,तरी विस्मृतीच्या धुक्याने त्यांतील बराचसा भाग आच्छादित असल्यामुळे तो अज्ञाताच्या सदरांत दाखल होण्यास हरकत नाही. त्यांतील कांही महत्त्वाचे प्रसंग मात्र समुद्रांत दूरवर असलेल्या जहाजांच्या उंच डोलकाठ्यांप्रमाणे स्मृतीच्या दृष्टिपथांत नित्याचे राहतील. पण हे संस्मरणीय प्रसंग सर्वच सुखदायक आहेत काय ? आज त्या सर्व प्रसंगाचें स्वाभाविकच सिंहावलोकन झालें. या गत आयुष्यांत जें कांही अनिर्वचनीय आनंदाचे प्रसंग अनुभवावयास मिळाले, त्यांच्या स्मरणाने पुन्हा आनंदाश्रू आले. पण त्याचबरोबर पुन्हा असले प्रसंग येतील कीं नाही, या शंकेने मन व्याकुल झाल्याशिवाय राहिलें नाही. म्हणजे आनंद झाला खरा; पण चंद्राभोवतीं खळें असावें त्याप्रमाणे चिंतावलयाने वेष्टिलेला होता. जे दुःखाचे किंवा संकटाचे प्रसंग भोगण्याचे नशिबीं आले होते, त्यांच्या आठवणीने दुःख झालें.या जगांत आनंद मात्र संमिश्र असावा,व दुःख तेवढे निर्भेळ असावें हा एक विलक्षण चमत्कार नाही काय ?

हा भूतकाल माझ्या पाठीशीं उभा आहे. पण समोर असलेला अज्ञात भविष्यकाल कोणकोणत्या देणग्या अगर दुःखें देणार आहे, याची मला आज कल्पना तरी करतां येईल काय ? भविष्यकालांतील घटनांचें आपणांस आगाऊ ज्ञान व्हावें म्हणून मानवाचे प्रयत्न अखंड चालले आहेत ! ज्योतिषशास्त्र हा त्याच्या प्रबल जिज्ञासेचाच परिणाम आहे. पण परमेश्वरानें कृपाळू होऊन अज्ञाताचा हा पडदा फाडून टाकला, व भविष्यकाल हा भूतकालाइतका मानवजातीला आगाऊ समजला, तर मानवाच्या सुखाची वृध्दि होईल काय ? नाहीं मुळीच नाहीं ! त्याची जिज्ञासा, उत्कंठा व आज्ञा यामुळे पूर्ण मारली जाईल ! भावी आशेच्या जोरावर मनुष्य गतकालांतील दुःखें विसरतो, व आपल्या ईप्सिताच्या साध्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करीत असतो ! हा त्याच्या आशेचा तंतु त्याच्या जीवनतंतू इतकाच महत्त्वाचा आहे. जर हा तुटला, तर सारें आयुष्य हें एक रसहीन काव्य होऊन बसेल ! मला वाटतें, अज्ञात भविष्यकाल ही मानवजातीला परमेश्वराची अत्यंत थोर देणगी आहे !



# आयर्लंडचा स्वातंत्र्यवीर

## इमॉन डी व्हॅलेरा.

[ अनुवादकः–वि. वि. भागवत. ]

आयर्लंडचें नांव उच्चारलें, कीं डी व्हॅलेराचें नांव मनश्चक्षूंसमोर येणार नाहीं असा सुशिक्षित वाचक विरळा. कारण आयर्लंड व डी व्हॅलेरा यांची जोडी अभेद्य आहे. अर्वाचीन आयर्लंडचा तो निर्माता आहे व प्रजासत्ताक स्वतंत्र आयर्लंडचें स्वप्न पाहणारा तो द्रष्टा आहे !

**जन्मानें अमेरिकन पण आयर्लंडचा अध्यक्ष.**

आश्चर्याची गोष्ट अशी, कीं ज्या आयर्लंड देशाचा इमॉन डी व्हॅलेरा आज अध्यक्ष आहे, त्या आयर्लंड देशाचा नागरिक म्हणून तो जन्मलेला नाहीं. किंबहुना, चालू युगांतील विश्वविख्यात व्यक्तींपैकीं बहुतेकांचा इतिहास असाच आहे. जर्मनीचा सर्वाधिकारी हिट्लर हा मूळ ऑस्ट्रिया देशाचा रहिवासी. पोलंडचा पिलसुडस्की हा मूळचा पोलिश नव्हे, तर लिथुआनिअन रशियाचा सत्ताधारी स्टॅलिन याच्या बोलण्यांत जॉर्जिअन हेल येतात ही गोष्ट सुप्रसिद्ध आहे. मुस्ताफा केमालपाशा ग्रीस देशांतील सालोनिकांत जन्मलेला. ऑस्ट्रियाचे चॅन्सलर डॉ. फर्टव्हॉन श्युसनिग यांचा जन्म इटालींत रिवा भागांत झाला आहे.

या चमत्कृतीचें कारण हेंच कीं महायुद्धापासून प्रत्येक देशाची सरहद्द सारखी पालटलेली आहे. केमालपाशाच्या बालपणीं सालेनिका हा तुर्कस्थान

देशाचा भाग होता. श्युसनिग शाळेंत जात असतां रिवा हा भाग ऑस्ट्रि-याच्या आधिपत्याखालीं होता. डी व्हॅलेराची जन्मभूमि मात्र त्याच्या आजच्या राजधानीपासून तीन हजार मैल दूर असून मध्यें विस्तीर्ण सागर पसरला आहे.

हिटलर हा ऑस्ट्रियन असल्यामुळें त्याच्या कार्यांत अडथळा आला. पण डी व्हॅलेरा हा अमेरिकन असल्मुळेंच आज आयर्लंडचा अध्यक्ष होऊं शकला. ईस्टरची बंडाळी केल्याबद्दल सन १९१६ सालीं डी व्हॅलेरा व त्याचे सहकारी पकडले गेले. सर्वांना ब्रिटिशांच्या लष्करी कोर्टानें देहान्त शासन दिलें. पण डी व्हॅलेरा जन्मानें अमेरिकन असल्यामुळें त्याचे प्राण वाचले. कारण त्यावेळीं ब्रिटिशांना एका अमेरिकन नागरिकाला गोळीं घालून अमे-रिकेची सहानुभूति गमावणें इष्ट नव्हतें. या वेळीं डी व्हॅलेरा वाचला हा केवळ दैवयोग ! त्याचा जन्म न्यूयार्क शहरीं सन १८२२ सालीं झाला आहे. त्याचा बाप स्पॅनिश असून आई आयरिश आहे. ती त्यावेळीं नुकततीच अमेरिकेंत गेली होती.

## डी व्हॅलेराचें टोंपण नांव 'डेव्ह'

डिसरायली किंवा रूझवेल्ट यांच्याप्रमाणेंच डी व्हॅलेरालाहि लोक प्रेमळ टोंपण नांवानें ओळखतात. 'डेव्ह' हें त्याचें टोंपण नांव. यावरून त्याच्या लोकप्रियतेच्या रहस्याची थोडीफार कल्पना येते. आयरिश लोकांत टोंपण नांव देण्याची विशेष प्रथा नाहीं. मि. कॉसरेव्ह यांना टोंपणनांव नव्हते. सर्व राष्ट्राकडून टोंपण नावांनें ओळखलें जाण्याला विशेष आत्मी-यता व आदर असावा लागतो. हजारों मतांपेक्षांहि या लोकमान्यतेची किंमत अधिक आहे. केवळ लोकछंदानुवर्तित्वानें किंवा आयुष्यांत अपूर्व यश मिळ-विल्यानें टोंपणनांवाचा लाभ होत नाहीं. हिटलर किंवा वुड्रो विल्सन यांना कधींहि प्रेमदर्शक जाहीर नांव प्राप्त झालें नाहीं. परंतु थिओडोर रुझवेल्ट हे 'टेडी' किंवा 'टी. आर.' मि. लॉइड जॉर्ज हे 'एल्. जी.' या नावानें

ओळखिले जात. केमालपाशा किंवा मुसोलिनी यांना टोंपणनांव ठेवण्याला त्यांच्या देशांत कोणीच धजत नाहींत. पण आयर्लंडमध्यें डी व्हॅलेरा डेव्ह' या नांवानेंच विशेष प्रसिद्ध आहेत.

पण त्याच्यासमक्ष फारच थोडे लोक त्याला 'डेव्ह' म्हणतात. फक्त त्याची पत्नी व निकटचे लोक त्या नावानें त्याला संबोधतात. लिमरिक कौंटींतील त्याच्या आईचे नातेवाईक त्याला 'एडी' या नावानें ओळखतात. त्याचे मित्र किंवा सहकारी त्याला बहुधा "चीफ" म्हणतात. पण त्याच्या माघारीं सर्वजण त्याला 'डेव्हच' म्हणतात.

सुमारें दहाबारा वर्षांपूर्वी ज्यावेळीं तो सरकारविरोधी पक्षाचा प्रमुख होता, त्या वेळीं त्याल 'प्रजासत्तात्मक आयर्लंडचा अध्यक्ष (President of the Republic) म्हणत असत. त्या वेळीं कॉसग्रेव्ह पक्षानें त्या वेळच्या कार्यकारी मंडळाचा अध्यक्ष मि. कॉसग्रेव्ह याच्याखेरीज इतर कोणालहि 'प्रेसिडेंट' म्हणून संबोधणें हा गुन्हा ठरवावा असा ठराव डेल इरेनमध्यें आणला. त्या ठरावाचा निरोध करण्यासाठीं डब्लिनमध्यें जाहीर सभा झाली.त्यास सभेपुढें भाषण करतांना व्हॅलेरापक्षीय कौंटेस मार्कोव्हीज या म्हणाल्या, 'यापूर्वी मी प्रजासत्ताक आयर्लंडच्या अध्यक्षाला 'डेव्ह' म्हणत असे. पणं यापुढें मी असें जाहीर करतें, कीं, 'डेव्ह' ला प्रेसिडेंट' याच नांवानें संबोधावें.' या सभेनंतर डेलमधील ठराव परत घेण्यांत आला.

## अखंड व उदंड उद्योग.

पुष्कळशा एकमार्गी लोकांप्रमाणें डी व्हॅलेरा हा सपाटून काम करतो. बहुधा सरकारी इमारतींल त्याच्या कचेरींत तो ९॥ ते १० च्या दरम्यान येतो. त्याच्या हाताखालीं असलेल्या सर्व खात्यांच्या प्रमुखांचा अभिप्राय तो जातीनें ऐकतो. अगदीं किरकोळ गोष्टीकडे सुद्धां त्याचें बारीक लक्ष असतें. घरीं फराळाकरितां येऊन तो फराळ झाल्यावर तावडतोब पुन्हा कचेरींत जातो. सहा वाजेपर्यंत काम केल्यावर तो चहाला घरीं जातो व रात्रीं

बहुधा नेहमींच ऑफिसमध्यें येऊन कामाला लागतो. प्रेसिडेंटच्या कचेरींत मध्यरात्रींपर्यंत दिवा नाहीं असें होंत नाहीं. जेवणाच्या वेळीं तो रोटी व लोणी खातो. आजारीपणाखेरीज तो कधीं रजा घेत नाहीं.

## भव्य व कणखर शरीरयष्टि.

त्याची शरीरयष्टि भव्य व कणखर आहे. तरुण असतांना रजर खेळ खेळण्यांत त्याचा हातखंडा असे व अजूनसुध्दां घोड्यावर बसून रपेट करण्याचा त्याला फार नाद आहे. डोंगरकडे चढणें व रानावनात भटकणें त्याला आवडतें. दर रविवारीं डब्लिनपासून दहा मैलांवर असलेल्या टेकडींतील खिंडींत फिरतांना तो तुम्हांला दिसेल. फक्त संरक्षक हेर असलेली त्याची मोटार हळुहळु पुढें चालत असते. 'डेव्ह' तिच्यामागून टोपी हातांत घेऊन खूप जलद चालतो. त्याचे कपडे त्या वेळीं सुध्दां काळेच असतात. तो फार जलद चालत असल्यानें त्याच्या कुटुंबांतील मंडळींना त्याच्याबरोबर चालणें फार जड जातें. त्याच्यामागें आठ शरीरसंरक्षकांचें एक पथक नेहमीं असतें.

## मद्यपान व धूम्रपानापासून अलिप्त.

आयर्लेंड किंवा इंग्लंडमध्यें असतांना तो कोणत्याहि मद्याला कधींहि शिवत नाहीं. अतिरिक्त भरमसाट मद्यपान हा तो स्वदेशाला मोठा शाप समजतो. पण युरोपांत असतांना तो कधींकधीं दारू किंवा बीअर घेतो. जिनेव्हा किंवा झूरिचमधील एकाद्या 'कॅफे'मध्यें बसून बीअरचा पेला पीत पीत लोकांचें निरीक्षण करणें त्याला विशेष आवडतें. तो सध्यां धूम्रपान करीत नाहीं. १९१६ पर्यंत तो पक्का तंबाखुभक्त होता. त्याविषयीं अशी एक आठवण सांगतात, कीं ईस्टर बंडानंतर शिक्षा भोगण्यासाठीं त्याची तुरुंगांत रवानगी होत असतां वाटेवर त्यानें आपली आवडती पाइप पेटविली, पण तो एकदम थांबला व 'तुरुंगांत माझ्या या सुखाचा अपहार करण्याची संधि मी त्यांना देणार नाहीं.' असें म्हणून त्यानें हातांतली पाइप फेंकून दिली. त्या दिवसापासून धूम्रपान करण्याचें त्यानें अजिबात सोडून दिलें.

## गणितांत हातखंडा.

व्यायामाव्यतिरिक्त त्याला बुद्धिबळें खेळण्याचा, रेडिओ ऐकण्याचा व विशेषतः गणित विषयाचा फार नाद आहे. त्याचे डोळे खराब होण्यापूर्वी तो विलक्षण वाचीत असे. शेक्सपीअर व गॅलिक लेखक यांचा त्यानें विशेष व्यासंग केला आहे. तो आयरिश भाषेंत शुद्ध व अस्खलित बोलतो. पण त्याची बुद्धि जर कशांत रमत असेल तर ती गणितांत. एकदां रोमला जातांना त्यानें आपल्या सेक्रेटरीला क्वार्टर्नरी थिअरम समजून सांगण्यांत तब्बल बारा तास खर्च केले. त्यावेळीं भलता उकाडा होत होता व त्याच्याच दिमतीचे सर्व लोक सुस्त पडले होते. त्या प्रसंगीं त्याची बौद्धिक करामत विशेष व्यक्त झाली. इन्स्टेन थिअरीचा अभ्यास करण्यांत तो तुरुंगांतील बराच वेळ घालवीत असे.

## कौटुंबिक जीवन.

त्याची पत्नी जेनी ओ फ्लॅनेगन ही शाळेंत एक अध्यापिका होती. गॅलिक लीगमध्यें त्यांची ओळख झाली व १९१० सालीं त्यांचा विवाह झाला. त्यांना सात मुलें आहेत. ब्रिआन नांवाचा एक मुलगा फिनिक्स पार्कमध्यें घोड्यावरून पडून मरण पावला. त्याचा सर्वांत वडील मुलगा व्हिव्हिअन हा आयरिश राष्ट्रीय विद्यापीठाचा एम्. एस्सी. असून डब्लिनच्या युनिव्हर्सिटी कॉलेजमध्यें डेमॉन्स्ट्रेटर आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक दलांत त्याला लेफ्टनन्टचा हुद्दा आहे. त्याच्याहून लहान मुलें कॉलेजांत व शाळांत शिक्षण घेत आहेत.

डी व्हॅलेराची पत्नी तरुणपणीं सुंदर दिसे. तिचे सोनेरी केंस आतां रुपेरी होऊं लागले आहेत. पतीप्रमाणेंच लोकांत मिळूनमिसळून वागण्याचा तिचा स्वभाव नाहीं. सरकारी मेजवान्यांखेरीज डी व्हॅलेराच्या कुटुंबाला सामाजिक जीवन नाहीं म्हटलें तरी चालेल. ज्या वेळीं व्हॅलेरा अध्यक्ष तिवडला गेला, त्या वेळीं त्याची पत्नी विनोदानें म्हणाली कीं, ' सरकारी मेज-

वानीसारख्या प्रसंगीं उपयोगी पडणारी एकादी दरबारी पत्नीहि सरकारनं त्याला दिली असती, तर बरं झालं असतं. '

क्रॉस ॲव्हे न्यूवरील छोट्याशा घरांत व्हॅलेराचें कुटुंब रहातें. त्यांच्याकडे फक्त एक मोलकरीण नोकर आहे. पण १९३२ पूर्वी त्यांच्याकडे एकहि नोकर नव्हता व यापेक्षांहि छोट्याशा घरांत तें कुटुंब रहात असे. मिसेस डी. व्हेलेराच सर्व काम करीत असे. तिची स्मरणशक्ति चांगली आहे. त्यांचीं छोटी मुलें विशेष हुशार असून ब्लॅक रॉक भागांत फार लोकप्रिय आहेत.

## मित्रांचा परिवार.

राजकारणी पुढारी म्हणून डी व्हॅलेराच्या भेटीला कोणालाच मज्जाव नाहीं. दररोज तो अनेक लोकांना भेटी देतो. पण वर्तमानपत्रांच्या बातमीदारांविषयीं तो फार दक्ष आहे. प्रत्येक मुलाखत कागदावर लिहून खालीं त्याची पसंतिदर्शक सही झाल्याशिवाय तिला प्रसिद्धि द्यावयाची नाहीं असा त्याचा दंडक आहेत. त्याला पुष्कळ मित्र आहेत. त्यांपैकीं एक श्रीमंत शेतकरी व डॉक्टर असून त्याचें नांव फारनन आहे. डी व्हॅलेरा पुष्कळ वेळां त्याला रात्रीं खूप उशिरां भेटतो. व दोघेहि लांब लांब फिरावयास जातात. दुसरी कॅथलिन ओकोनेल नांवाची स्त्री त्याची चिटणीस आहे. आज जवळजवळ वीस पंचवीस वर्षे त्यांचा परिचय आहे आणि त्याची काम करण्याची पद्धत व मनोभूमिका याची तिला पूर्ण माहिती आहे. डी व्हॅलेरा स्त्रियांना फार मोहक वाटतो; पण तो त्यांच्याकडे कधींच लक्ष देत नाहीं. प्रत्येक समारंभाच्या वळीं त्यांचा घोळका त्याच्याभोंवतीं जमतो. तो हंसतमुख व कमी बोलणारा असून उद्धटपणा न करतां त्यांच्यामध्यें असा एक प्रकारचा आदर निर्माण करतो, कीं त्याच्याशीं विशेष लगट करणें कोणालाच शक्य होत नाहीं.

## स्वभावविशेष.

पैशाच्या बाबतींत तो निरिच्छ आहे. तो अध्यक्ष निवडला गेल्याबरोबर त्यानें आपला पगार २५०० पौंड होता, तो १५०० पौंड केला.

त्याला दुसरें उत्पन्न कोणतेंच नाहीं. त्याच्या आवडीनिवडी अगदीं साध्या असून ऐषआरामाचा त्याला यत्किंचितहि शोक नाहीं. त्याला संगीताची आवड आहे. त्याचें कलाविषयक विचार अजून अज्ञात आहेत. तो फार धार्मिक आहे. पण त्याचें धर्मप्रेम दांभिक नाहीं. तो स्वतः कॅथॉलिक असला तरी त्याचे कित्येक मित्र प्रॉटेस्टंट आहेत. ज्या दिवशीं वेळ सांपडतो, त्या दिवशीं तो चर्चमध्यें सामुदायिक प्रार्थनेला अवश्य जातो. त्याच्या एका सहकाऱ्यानें म्हटल्याप्रमाणें 'त्याचं सर्व आयुष्य हीच एक अखंड प्रार्थना आहे.'

त्याची विनोदवृत्ति फारशी परिणत झालेली नाहीं. त्याला विनोद विशेषसा प्रिय नाहीं. तो स्वतः कधींच विनोद करीत नाहीं. पण गमतीदार विनोदी प्रसंग त्याला आवडतात. अशा प्रसंगीं तो खूप मोठ्यानें व मनापासून हंसतो. एकदां भाषण चालू असतां त्याला एनिस येथें पकडण्यांत आलें. एका वर्षानंतर तो तुरुंगांतून सुटला तो तडक एनिसला गेला. त्या वेळीं त्यानें आपल्या भाषणात खालील वाक्यानें आरंभ केला— 'ज्या वेळीं माझ्या भाषणाला अडथळा आला त्या वेळीं मी असें म्हणत होतो कीं,...'

## वैयक्तिक गुणांचें अधिष्ठान.

त्याचे वैयक्तिक गुणविशेष सहज दृष्टींत भरण्यासारखे आहेत. विलक्षण मनोनिग्रह, आयर्लेंडबद्दल असलेल्या स्वतःच्या कर्तव्याविषयीं विलक्षण श्रद्धा, गंभीर मनोवृत्ति, सांसरिक गोष्टींकडे दुर्लक्ष, उपदेशपर बोलण्याची प्रवृत्ति, हट्टीपणा व परोपकारवृत्ति. सार्वजनिक आयुष्यक्रमांत फक्त एकदांच त्याची शांत वृत्ति क्षुब्ध झाल्याचें लोकांनीं पाहिलें आहे. आयरिश प्रेस बांड बिलाबद्दल वादविवाद झाला त्यावेळीं तो रागावलेला दिसला. त्याप्रमाणेंच तो भावनावश झाल्याचे प्रसंग त्याच्या मित्रमंडळीलाहि क्वचित्च आढळले आहेत. सन १९२१ सालीं ज्या वेळीं तह सात मतांनीं मंजूर करण्यांत आला त्या वेळीं तो उभा राहिला व म्हणाला, 'गेल्या चार वर्षांत आपण

भावाभावाप्रमाणं एका जागीं एकजुटीनं काम केलं आणि...' इतकेच शब्द त्याच्या रुद्ध कंठांतून कसेबसे बाहेर पडले. नंतर तोंडांतून शब्द बाहेर उमटेना. तो खालीं बसला व दोन्ही हातांच्या पंजांत त्यानें आपलें तोंड झांकून घेतलें.

त्याचा मुलगा ब्रिआन याच्यावर त्याचा विशेष जीव होता. परंतु त्याच्या अपघाती मृत्यूनंतर तो लागलीच आपल्या पक्षाच्या एका सभेला उपस्थित झाला. त्या वेळीं त्याची वृत्ति शांत होती. ज्या वेळीं तो एखाद्या सार्वजनिक जागीं जातो, त्या वेळीं तो स्मित हास्य करीत नाहीं किंवा जनसंमर्दाच्या अभिवादनाला मान हालवून त्याचा स्वीकार करीत नाहीं. तो गंभीर मुद्रेनें आपल्या आसनावर सरळ जाऊन बसतो आणि समोर अफाट जनसमुदाय आहे याची जाणीवच आपल्याला नाहीं असें भासवितो.

## सार्वजनिक जीवनाला प्रारंभ.

प्रथमपासून डी व्हॅलेरा ज्वलज्जहाल पुढारी होता. त्यामुळें इ. स. १९१६ सालीं आयरिश प्रजासत्ताक राज्याचा जो जाहीरनामा पीअर्स, मॅकडोनोफ, मॅकडरमार्ट यांनीं काढला त्याला त्यानें अनुमति देणें स्वाभाविकच होतें. तें एक आततायीपणाचें साहसच होतें, तें कार्य यशस्वी होणें अशक्य होतें व ती एक आत्मघातकी योजना होती असें त्या वेळचे शांत डोक्याचे मुत्सद्दी म्हणत होते. पण ती त्यांची चूक होती. तें बंड यशस्वी झालें असेंच समजलें पाहिजे असें डी व्हॅलेरा म्हणतो. कारण त्या बंडाच्या वणव्यांतून व रक्तपातांतून कित्येक दुःखदायक वर्षांच्या खडतर तपश्चर्येनंतर आज डी व्हॅलेरा ज्याचा अध्यक्ष आहे त्या फ्रीस्टेटचा जन्म झालेला आहे.

## ईस्टरचें बंड व व्हॅलेराचें युद्धकलानैपुण्य.

ईस्टर बंडाच्या प्रत्यक्ष हालचाली ज्यांनीं केल्या, त्या सेनापतींपैकीं डी व्हॅलेरा हा एक होता. आयरिश रिपब्लिक सैन्यांतील एक संघटनाचतुर नेता अशी त्याची ख्याति पूर्वी होतीच. बोलंड्स मिल्स नांवाच्या डब्लिन

शहराच्या बाहेर असलेल्या जागीं या चतुर गणित्याच्या हाताखालीं मूठभर सैन्य ठेवण्यांत आलें होतें. ही जागा विशेष नाक्याची होती. त्या जागीं डी व्हॅलेराच्या तुकडीनें फार बहारीची कामगिरी केली. डब्लिनमधील बंड मोडलें तरी शरण जाण्याचा डी व्हॅलेराचा विचार नव्हता. पण वरिष्ठांची आज्ञा त्यानें शिस्त म्हणून मान्य केली. तो शरणागति पत्करून बोलंड मिल्स या जागेंतून बाहेर आला व म्हणाला, ' मला पाहिजे तर गोळी घालून ठार मारा, पण माझ्या माणसांच्या केसालाहि धक्का लागतां कामा नये. '

## विलक्षण दैवयोग.

लष्करी कोर्टानें त्याला देहांन्त शासनाची शिक्षा सुनावली होती; पण हा पुढारी जन्मानें अमेरिकन आहे असें समजतांच ती शिक्षा जन्मठेपेची करण्यांत आली. कारण अमेरिकेनें दोस्तांच्या बाजूनें युध्दांत पडावें. अशी ब्रिटिशांची उत्कट इच्छा होती. आयरिश–अमेरिकन लोकांची भावना व मतें यांना त्यावेळीं फार महत्त्व होतें. त्यानें फक्त एक वर्षच डार्टमूरच्या तुरुंगांत काढलें. सन १९१७ सालीं राजक्षमा जाहीर करण्यांत येऊन सर्व राजबंदी सुटले. त्या वेळीं बहुतेक सर्व प्रमुख व वजनदार रिपब्लिकन पुढारी ठार मारण्यांत आले असल्यानें सिनफेन पक्षाच्या अध्यक्षत्वाची माळ त्याच्या गळ्यांत पडली. सिनफेन पक्षातर्फें तो क्लेअर परगण्यांतून पार्लमेंटचा सभासद म्हणून निवडण्यांत आला.

## लिंकन तुरुंगांतून पलायन.

१९१८ सालीं लिंकन तुरुंगांतून तो कसा निसटला याची माहिती सुप्रसिद्ध आहे. आपल्या कल्पकतेमुळें व बाहेरच्या मित्रांच्या सहाय्यानें त्याच्या कोठडीच्या कुलुपाच्या किल्लीचा मेणाचा ठसा त्यानें बाहेर पाठविला. तशी किल्ली एका मोठ्या केकमध्यें छपवून आंत पाठविण्यांत आली व एका प्रातःकालीं डी व्हॅलेरा लिंकनच्या तुरुंगांतून निसटून बाहेर पडला.

त्याच्या शोधासाठीं सरकारनें जंग जंग पछाडले. मँचेस्टरला तो एका धर्मोपदेशकाच्या घरांत लपला होता. तेथून तो प्रथम लिव्हरपूरला जाऊन

नंतर महत्प्रयासानें आयर्लंडांत परत आला असें सांगतात, कीं ज्या वेळीं गुप्त पोलीस त्याच्या शोधासाठीं प्रत्येक जहाजाची कसूनझडती घेत होते, त्या वेळीं त्यांच्या समोरच खलाशाच्या वेशांत तो जहाजावर डेक घांसून धुण्याचें काम करीत होता. दुसरी एक आख्यायिका अशी आहे, कीं त्याच्या मित्रानें त्याला बटाट्याच्या ढिगांत लपविलें होतें व झडती होऊन जाईपर्यंत त्याला त्या ढिगांत अक्षरशः बुडून रहावें लागलें.

## नववे आश्चर्य!

नंतर तो अमेरिकेला गेला. 'स्टोकर' च्या वेषांतरांत त्याचें न्यूयार्कमध्यें प्रगट होणें हें नववें आश्चर्य होतें! कारण यावेळीं पोलीस त्याच्यासाठीं सबंध आयर्लंड देश पालथा घालीत होते. अमेरिकेंतील प्रमुख ठिकाणीं त्यानें व्याख्यानाचें दौरे काढले, आयर्लंडसाठीं फंड जमा केला आणि स्वतंत्र आयर्लंडचा एकमेव पुढारी असा दर्जा संपादन केला.

## विलक्षण प्रसंगावधान.

त्यानंतर अनेक संकटांशीं सामना देत व पोलिसांची नजर चुकवीत तो आयर्लंडला परत आला. तो केल्टिक बोटीनें प्रथम लिव्हलपूरला आला, नंतर एका छोट्या बोटीच्या अधिकाऱ्याला शंभर पौंड देऊन त्यानें वश करून घेतलें. अधिकाऱ्यानें किनारा आल्याबरोबर त्याला जमिनीवर सुरक्षित पोंचविण्याचें वचन दिलें होतें. पण किनाऱ्यावर उतरल्याबरोबर तो अधिकारी सपाटून पिऊन बेहोष पडला व परतच आला नाहीं. डी व्हॅलरा त्याच्या केबिनमध्यें दडून बसला होता, गलबत हांकारण्याची वेळ झाली तरी तो अधिकारी परत आला नाहीं. गलबताचा कप्तान तावातावानें त्या अधिकाऱ्याचा शोध करण्यासाठीं त्याच्या केबिनमध्यें आला. डी व्हॅलेरानें प्रसंगावधान राखून जणू कांहीं तो स्वतःच खूप दारू पिऊन झिंगून गेला आहे असा बहाणा केला. कांहीं क्षणाच्या विलक्षण अस्वस्थेनंतर त्या कप्तानानें तो त्या ऑफिसरचा एक दारुड्या पण निरुपद्रवी स्नेही असेल असें समजून व्हॅलेराला बाहेर हांकलून दिलें आणि जहाज चालू केलें. अशा रीतीनें तो पुन्हा सन १९१९ सालीं आयर्लंडमध्यें परत आला.

## कौन्सिलमधील कार्याची परिणति.

१९१९ ते १९२१ चा इतिहास भयंकर घालमेल व रक्तपात यांनीं भरलेला आहे. डी व्हॅलेराला डेल इरेनचा अध्यक्ष निवडण्यांत आलें. पण त्यानें व त्याच्या अनुयायांनीं राजनिष्ठेची शपथ घेण्याचें नाकारलें. देशांत पुन्हा यादवी सुरू झाली. ही यादवी १९२१ मध्यें इग्लंडशीं तहाची वाटाघाट सुरूं झाल्यामुळें थांबली. पांच महिने ही वाटाघाट होऊन आयरिश तहावर सह्या झाल्या. या तहानें आयर्लंडला वसाहतीचें स्वराज्य मिळालें व आयरिश फ्री स्टेट अल्स्टरपासून अलग करण्यांत आलें. डी व्हॅलेराला हा तह मान्य झाला नाहीं. म्हणून त्यानें तहाला विरोध सुरू केला. पुन्हा देशांत तहवाले व तहविरोधी असे दोन पक्ष निर्माण झाले व भयंकर यादवी माजली.

दोन्ही पक्षांचा भयंकर शक्तिपात झाल्यावर यादवी थांबली. आणि सन १९२२ सालीं शांततेता काळ प्रस्थापित झाला. डी व्हॅलेराचा पक्ष अल्पमतवाला होता. झालेला आयरिश तह हा लॉईड जार्जच्या दमदाटीनें राष्ट्रावर लादलेला आहे असें त्यांनीं जाहीर करून 'डेल' मधील सभासद जोंपर्यंत राजनिष्ठेची शपथ घेत आहेत, तोंपर्यंत 'डेल' मध्यें बसण्याचें नाकारलें. १९२७ च्या जून महिन्यांत कॉसग्रेव्हच्या अधिकारारूढ पक्षानें डेलसाठीं उभे रहाणारे सभासद निवडून आल्यास त्यांनीं आपल्या जागा भरल्याच पाहिजेत असा ठराव पसार केला. यामुळें डी व्हलेरा व त्याचे ४३ अनुयायी डेलमध्यें आले. नवीन निवडणुकींत त्यांची संख्या ५७ पर्यंत गेली. अखेर १९३२ सालीं मजूर पक्षाशीं सहकार्य केल्यामुळें त्यांना मताधिक्य प्राप्त झाले आणि कॉसग्रेव्हला अध्यक्षाची जागा सोडावी लागली. १९३३ सालीं डी व्हॅलेराच्या पक्षाचेंच बहुमत झालें.

## व्यक्तिदर्शन.

डी व्हॅलेरा त्याच्या फोटोपेक्षां कमी उग्र दिसतो. त्याचें लांब नाक व चेहऱ्यावरील खोल रेषा हें त्याचें वैशिष्टय आहे. तो पंचावन वर्षांचा असेल,

असें त्याच्या चेहऱ्यावरून वाटत नाहीं. तो फार चलाख, चौकस व आदरातिथ्य करणारा आहे. चिकाटी, बुद्धिमत्ता, धाडस, प्रसंगावधान इत्यादि गुणांखेरीज त्याच्या सामर्थ्याचा मुख्य झरा आयरिश लोकांच्या मनोभूमिकेशीं तो पूर्णपणें ऐकमत्य करून आहे हा होय. सीनेट रद्द केल्यापासून त्याची जागा सर्वाधिकाऱ्यासारखी आहे. परंतु तो लोकशाहीचा खरा पुरस्कर्ता आहे. त्याचा जनतेवर विश्वास आहे. व जनतेची त्याच्यावर पूर्ण श्रद्धा आहे. ‘ लोकशाहीसाठीं मी केव्हांहि प्राणार्पण करीन ’ असें तो म्हणतो.

त्याला वैयक्तिक महत्त्वाकांक्षा मुळीच नाहीं. आयरिश लोकांचें स्वयंशासित राज्य व ऐक्य ही त्याची महत्त्वाकांक्षा. तो मुलाखतींत एकदां म्हणाला, ‘ मला काय पाहिजे हा प्रश्न नाहीं. आयर्लंडला काय पाहिजे हा प्रश्न आहे. ’

## इंग्लंडबरोबर आर्थिक युध्द.

डी व्हॅलेरा अध्यक्ष झाल्यापासून डेलनें राज्यनिष्ठेची शपथ रद्द केली आहे, गव्हर्नरजनरलचे हक्क व सत्ता पुष्कळच संपुष्टांत आणली आहे, आयरिश सुप्रीम कोर्टानंतर प्रिव्हिकौन्सिलकडे अपील करण्याचा हक्क नाकबूल केला आहे; व जमिनीचें वर्षासन ( Land Annuity ) देण्याचें तहकूब केलें आहे. हें वर्षासन जवळ जवळ ५० लाख पौंडांचें आहे. ब्रिटननें आयर्लंच्या मालावर विशेषतः गुरें, लोणी व दूध यावर जबर जकात बसवून आयर्लंडचा प्रतिकार चालविला आहे. या लढ्यामुळें आयर्लंडच्या आर्थिक जीवनांत डी व्हॅलेराला अमूलाग्र फरक करावा लागला. त्यानें आयांत कमी केली असून साखरेचे कारखानें स्थापन केले आहेत. कातडी कमावण्याचा नवा उद्योगधंदा मोठया प्रमाणावर सुरू केला आहे. अशा रीतीनें आयर्लंडला स्वावलंबनाचा मार्ग स्वीकारणें भाग पडलें आहे. आयर्लंड स्वयंपूर्ण करण्याचें कार्य कितपत यशस्वी होईल हें इतक्यांत सांगणें कठीण आहे; पण त्याचा उद्योग प्रचंड आहे, चिकाटी प्रशंसनीय आहे यांत शंका नाहीं.

## जीवनध्येय.

डी व्हॅलेराचें संपूर्ण जीवन एका कल्पनेनें वा ध्येयानें प्रेरित झाले आहे. अखंड व स्वतंत्र आयर्लंड हेंच त्याचें जीवनकार्य. तें त्याला अजून साधलें नाहीं. फ्री स्टेट हें ब्रिटिश कॉमनवेल्थमध्यें असलें तरी तो त्याचा भाग नाहीं. फ्री स्टेट हें प्रजासत्ताक राज्य व ब्रिटिश राज्य यातील तडजोड आहे. दीर्घ काल्पर्यंत डी व्हॅलेरानें त्या तडजोडीचा निशेध केला. आज तीच तडजोड त्यानें स्वीकारली आहे. त्याची भावना अशी आहे, कीं मानवजातीच्या आयुष्याचा विचार करतां या ध्येयाच्या सिद्धीसाठीं एक पिढी हा काळ कदाचित् अपुरा असेल आणि फ्री स्टेटचा पुढें योग्य तो विकास होईल. त्याच्या एका मित्रानें सांगितल्याप्रमाणें त्याला फक्त दोन गोष्टींची आवश्यकता आहे—

**अवकाश व शांतता.**

( इंग्रजी मासिकावरून अनुवाद ).

मनोहर आगस्ट १९३७.

# समाप्त.